# कृषीवल

रायगड, रविवार, दि. ३० जून २०२४

किंमत ४ ₹


## नीट पेपरफुटीचे धागेदोरे बीडपर्यंत?

**लातूर :** नीट फेरफुटीचे धागेदोरे लातूरपर्यंत असल्याचं म्हटलं जात होतं. पण, आता पोलिसांच्या तपासाचे केंद्र लातूर ऐवजी आता बीड झाले आहे. मिळालेल्या माहितीनुसार, आरोपींकडे सापडलेल्या १४ प्रवेशपत्रांपैकी आठ प्रवेशपत्र बिहारमधील आहेत. त्यात एक लातूरचा, तर सात बीडचे विद्यार्थी आहेत. सापडलेल्या प्रवेशपत्रांपैकी सर्वाधिक संख्या ही बीडच्या विद्यार्थ्यांची असल्याचे उघड झाले आहे. त्यामुळे पोलिसांचे लक्ष आता बीडकडे वळाले आहे. सीबीआयकडे पेपरफुटीचा तपास वर्ग केल्यापासून या प्रकरणात दररोज नवनवीन माहिती समोर येत आहे. आता बीड कनेक्शन पुढे आल्याने चौकशी करण्यात येत आहे.


Required Teacher
TUKARAM RAMA PATIL PUBLIC SCHOOL
At- valap village. Tal- panvel, Dist Raigad.
Standard 3rd and 4th. All subject
Qualification - H. S. C. Ded. With fluency in spoken English.
Prefered by location -Near by panvel New panvel, Taloja.
Contact- 8879498842


### वे|ध|क

## महामार्गाला तलावाचे स्वरुप

**सुकेळी :** गेल्या काही दिवसांपासून सुरू असलेल्या संतधार पावसामुळे मुंबई-गोवा महामार्गाचे तीनतेरा वाजल्याचे चित्र पहावयास मिळत आहे. महामार्गावर अनेक ठिकाणच्या रस्त्यावरती पाणी साचल्यामुळे तलावाचे स्वरुप आले आहे. त्यामुळे वाहनचालकांना वाहने चालवताना अक्षरशः तारेवरची कसरत करावी लागत आहे. दरवर्षीप्रमाणे पावसाळा सुरु झाला की मुंबई-गोवा महामार्गाची होणारी दयनीय अवस्था ही परंपरा यावर्षीच्या पावसातदेखील कायम राहिली आहे. त्यामुळे या महामार्गाबद्दल पुन्हा •> पान २ वर

## सीबीआयची छापेमारी

**मुंबई :** सीबीआयकडून मुंबई आणि नाशिक परिसरात एकूण ३३ ठिकाणी छापेमारी करण्यात आली आहे. सीबीआयने पासपोर्ट अधिकाऱ्यांवर आणि दलालांवर एकूण बारा गुन्हे दाखल केले आहेत. पासपोर्ट सेवा केंद्रामध्ये मोठ्या प्रमाणामध्ये भ्रष्टाचार झाल्याचा सीबीआयचा दावा असून, या पार्श्वभूमीवर ही कारवाई करण्यात आल्याचे समजते. मुंबईतील परेल, मालाड परिसरात सीबीआयकडून मोठी छापेमारी करण्यात आली आहे. सीबीआयने आता या प्रकरणासंदर्भात अनेक एफआयआर नोंदवले आहेत.

## अनधिकृत होर्डिंगविरोधात

# कठोर कायदा करा

### आ. जयंत पाटील यांनी सरकारला धरले धारेवर

| दिलीप जाधव |
| मुंबई |

**सरकारच्या करोडो रुपयांच्या जमिनीवर अनधिकृत होर्डिंग उभारून लाखो रुपये कमावणाऱ्यांच्या विरोधात कडक कारवाई करण्यासाठी सरकारने कठोर कायदा करावा, अशी मागणी शेतकरी कामगार पक्षाचे आमदार जयंत पाटील यांनी शनिवारी (दि. २९) विधान परिषदेत केली. याबाबत त्यांनी प्रश्न उपस्थित करून सरकारला धारेवर धरले.**



कोणीही उठतो, वाटेल तिथे होर्डिंग लावून शहर विद्रुप करतात. त्यांच्यावर मोठ्या रकमेचे दंड आकारले पाहिजे, असेही जयंत पाटील यांनी सरकारला सुनावले.

घाटकोपर येथे झालेल्या होर्डिंग दुर्घटनेचे पडसाद शनिवारी विधान परिषदेत उमटले. यावर उद्योगमंत्र्यांनी होर्डिंग धोरण ठरविण्यासाठी माजी न्यायमूर्ती दिलीप भोसले यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती गठीत करण्यात आलेली आहे. यात आमदार आणि या विषयातली जाणकार मंडळी सदस्य म्हणून असतील. आपल्या काही सूचना असतील तर त्या लेखी स्वरूपात दिल्यास त्या सूचनांचा धोरणात समावेश केला जाईल, असं सांगितलं. यावर आमदार जयंत पाटील यांनी आक्षेप घेत म्हणाले की, फक्त मुंबई शहरातील आमदारासोबत एमएमआर रिजनमधील आमदारांना या समितीवर सदस्य म्हणून घेतले पाहिजे. कारण, अनधिकृत होर्डिंगचा विषय नुसता मुंबईपुरता मर्यादित नसून, संपूर्ण राज्यभराचा विषय आहे.

शिवसेनेचे वरळीचे आमदार सुनील शिंदे यांनी •> पान २ वर

# ‘लाडकी बहीण’ वादात

- श्रेयवादामुळे सभागृहाच्या अधिकाराचा भंग
- विजय वडेट्टीवार यांचा आरोप

| मुंबई | प्रतिनिधी |

‘मुख्यमंत्री लाडकी बहीण’ योजनेवरुन हंगामा झाला आहे. गुरुवारी विधिमंडळात अंतरिम अर्थसंकल्प सादर करताना उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी ‘मुख्यमंत्री लाडकी बहीण’ योजना जाहीर केली. ऐन विधानसभा निवडणुकांच्या तोंडावर ही योजना मतदारांना आकर्षित करण्यासाठी केली असल्याचा आरोप विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी केली आहे.

सरकार या योजनेतून मतदारांना आकर्षित करीत आहे, असे काँग्रेसने म्हटले आहे. मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्र्यांमध्ये असलेल्या श्रेयवादाच्या लढाईत हा प्रकार झाला असून, हा सार्वभौम सदनाचा हक्कभंग आहे, असा आरोप विधानसभा विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी केला. याविरोधात विधिमंडळात हक्कभंग प्रस्ताव मांडणार असल्याचे ते म्हणाले.



अर्थमंत्री आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी कालच विधिमंडळात अतिरिक्त अर्थसंकल्प सादर केला. येत्या १ जुलैपासून महिला लाभार्थ्यांना ही योजना लागू होणार असल्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी जाहीर केले. त्यानंतर महिलांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना राखी बांधून त्यांचे आभारही मानले आहेत. या प्रकरणावरुन विरोधी पक्षांनी टीका केली आहे. हा अर्थसंकल्प सादर केल्यानंतर त्यावर साधक-बाधक चर्चा होऊन विधिमंडळाला हा अर्थसंकल्प मंजूर •> पान २ वर

### सरकारलाच तीर्थक्षेत्रावर जाण्याची वेळः पटोले

राज्यातील ज्येष्ठ नागरिकांना तीर्थस्थळांचे दर्शन घडविण्यासाठी मुख्यमंत्री तीर्थदर्शन योजना सुरू करण्यात येणार असल्याची घोषणा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी शनिवारी (दि. २९) विधानसभेत केली. यावरुन आता या सरकारला तीर्थक्षेत्रावर जाण्याची वेळ आली आहे. महाराष्ट्राच्या जनतेने या सरकारला आपली जागा दाखवली आहे, अशी टीका काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी केली. काल अर्थसंकल्प सादर केला, घोषणा केल्या, पण पैसे कुठून आणणार? याचे उत्तर सरकारकडे नाही. घोषणांचे पालन पूर्णपणे शून्य आहे. सरकार आता खोटं बोलून नेरेटिव्ह सेट करत आहे, असेही ते म्हणाले.

## विद्यार्थिनीचा सर्पदंशाने मृत्यू

### नेरळ येथील वसतिगृहात राहून घेत होती शिक्षण

| नेरळ | प्रतिनिधी |

नेरळ येथील आदिवासी वसतिगृहात राहून शिक्षण घेणाऱ्या वंदना बाळू पारधी ह्या दहावीमध्ये शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थिनीचा सर्पदंश झाल्याने मृत्यू झाला. आपल्या घरी आई एकटी असल्याने मागील काही दिवस वंदना ही आपल्या घरातूनच वसतिगृहात येऊन शिक्षण घ्यायची. दरम्यान, आपल्या घरी बेडीसगाव येथे शुक्रवार •> पान २ वर



> वंदना पारधी ही विद्यार्थिनी आपल्या आईला शेतीच्या कामात मदत करण्यासाठी मागील काही दिवस घरी ये-जा करून शिक्षण घेत होती. ती नववीपासून आमच्या वसतिगृहात राहून शिक्षण घेत आहे. त्यामुळे वसतिगृहात राहात असती, तर अशी दुर्दैवी घटना घडली नसती.
> – चंद्रकांत घोडके, अधीक्षक, आदिवासी वसतिगृह

## शिक्षकांना आश्चर्याचा धक्का

### तारखेच्या दोन दिवस अगोदरच वेतन जमा

| अलिबाग | प्रतिनिधी |

विद्यार्थ्यांना घडविणाऱ्या शिक्षकांना वेतन वेळेमध्ये मिळत नसल्याची ओरड कायमच राहिली आहे. मात्र, रायगड जिल्हा परिषदेच्या शिक्षकांना ई-कुबेर प्रणालीने आश्चर्याचा धक्काच दिला आहे. या प्रणालीद्वारे पाच हजार ९१६ शिक्षकांच्या खात्यात एक तारखेच्या दोन दिवस अगोदरच ४४ कोटी ४९ लाख ६१ हजार ९७५ इतके वेतन जमा झाल्याची माहिती जिल्हा परिषद •> पान २ वर

#### अशी आहे ही प्रणाली

जिल्हा परिषदेकडून कोषागार कार्यालयात शिक्षकांची यादी खाते क्रमांकानुसार दिली जाते. त्यानंतर ई-कुबेर प्रणालीद्वारे शिक्षकांचे बँक खाते क्रमांक व आयएफसी कोड नंबरची पडताळणी ऑनलाईन पद्धतीने केली जाते. त्यानंतर तातडीने शिक्षकांच्या खात्यात एका क्लीकवर वेतन जमा केले जाते.

> “पूर्वी वेतनासाठी दहा ते पंधरा दिवस वाट पाहावी लागत होती. आता मात्र जिल्हा परिषदेच्या माध्यमातून ई-कुबेर वेतन प्रणाली सुरु केली आहे. ही प्रणाली लाभदायक असून, ती कायमच ठेवण्यात यावी. एक तारखेला होणारे वेतन आता दोन ते चार दिवस अगोदरच झाल्याचा आनंद आहे.”
> – प्रमोद भोपी, अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक संघ, अलिबाग तालुका

## कार्लेखिंड-वडखळ रस्ता गेला खड्ड्यात

### पिंट्या ठाकूर यांचा आंदोलनाचा इशारा

| रायगड | खास प्रतिनिधी |

पावसाळा सुरू होऊन अवघे १५ दिवसच झाले आहेत. असे असताना कार्लेखिंड ते वडखळ या मार्गाची खड्ड्यांमुळे प्रचंड दुरवस्था झाली आहे. लवकरात लवकर या महामार्गावरील खड्डे भरा अन्यथा तीव्र जनआंदोलन करण्यात येईल, असा इशारा शिवसेना (उबाठा) चे युवा जिल्हा प्रमुख अमीर उर्फ पिंट्या ठाकूर यांनी दिला आहे. याबाबतचे निवेदन त्यांनी कार्यकारी अभियंता, राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण, पनवेल यांना दिले आहे.

अलिबाग-कार्लेखिंड-वडखळ हा रस्ता राष्ट्रीय महामार्गाला जोडणारा आहे. २४ कि.मी. लांबीचा हा रस्ता •> पान २ वर




# एनडीआरएफची आपत्तीप्रवण गावांना भेट




- नैसर्गिक आपत्तीप्रसंगी बचावासाठी जनजागृती
- प्रात्यक्षिकाद्वारे पूर्वतयारी

**। रायगड । खास प्रतिनिधी ।**

राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दलाकडून (एनडीआरएफ) दरडप्रवण गावांना भेटी देण्यात आल्या. ग्रामस्थांमध्ये पाऊस आणि अतिवृष्टीच्या कालावधीत सतर्क राहण्याबाबत त्यांच्याकडून जनजागृती करण्यात येत आहे. तसेच महाड व परिसरामध्ये आलेल्या नैसर्गिक आपत्ती, यापूर्वी आलेल्या महापुराच्या पार्श्वभूमीवर दरड, अतिवृष्टी व पूरस्थितीप्रसंगी बचावासाठी जनजागृती आणि प्रात्यक्षिकाद्वारे पूर्वतयारी केली जात आहे.

महाड व पोलादपूर तालुक्यातील दरडग्रस्त गावांमधून एनडीआरएफच्या पथकाने आपल्या भेटी सुरू केल्या असून, शहराजवळ असलेल्या चांभारखिंड व विविध गावात एनडीआरएफच्या पथकाने भेट दिली. दरडग्रस्त गावात भेट देऊन गावातील नागरिक व शासकीय कर्मचारी यांच्याबरोबर संभाव्य असणाऱ्या धोक्यासंदर्भात जनजागृती करण्यात येत आहे. यातील काही जवानांनी मागील वर्षे महाडमध्ये मदत कार्यात काम केले आहे. या एनडीआरएफच्या पथकामध्ये कमांडंट निरीक्षक दिलीप कुमारसह ३१ जवान असून, २८ पुरुष व दोन महिला जवानांचा समावेश आहे.

### सावित्री नदीपात्रामध्ये बोट चालविण्याचे प्रात्यक्षिक

**संभाव्य पूरपरिस्थितीचा सामना करण्याच्या दृष्टीने महाड तालुक्यामध्ये दादली पूलनजीक सावित्री नदीपात्रामध्ये बोट चालविण्याचे प्रात्यक्षिक घेण्यात आले. महाड उपविभागीय अधिकारी डॉ. ज्ञानोबा बाणापुरे यांच्या मार्गदर्शनाखाली नगर परिषद, महसूल, पोलीस तसेच इतर संबंधित विभाग यांच्यासह आपदामित्र यांनी यशस्वीरीत्या प्रात्यक्षिक आयोजित केले.**

## शिक्षक पालक संघाची सभा

**। आगरदांडा । प्रतिनिधी ।**

हिंदू एज्युकेशन सोसायटी संचलित ओंकार विद्या मंदिर मुरुड येथे शिक्षक पालक संघाची सभा नुकतीच ट्रस्टी दिपाली जोशी यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली.

यावेळी सचिव सुनील विरकुड, कार्यकारिणी सदस्य मनिषा फाटक, उषा खोत आदींसह पालक वर्ग उपस्थित होते. प्रास्ताविक करताना मुख्याध्यापिका प्रविता गार्डी म्हणाल्या की, मार्च २०२४च्या एसएससी पहिल्या बॅचचा निकाल १०० टक्के लागला असून, सन २०२४-२५ मध्ये ११ वी विज्ञान शाखेत २७ विद्यार्थ्यांचे प्रवेशही झाले आहेत. या सभेत वार्षिक कामकाजाचे नियोजन करण्यात आले. शिक्षक पालक संघात उपाध्यक्ष सागर राऊत, तर सहसचिव म्हणून वैष्णवी गायकर यांची निवड करण्यात आली. इ. ५ वी ते १० वीपर्यंत वर्गनिहाय पालक प्रतिनिधीही निवडण्यात आले. सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन श्रेया माळी यांनी केले.

# स्वच्छतागृहाअभावी गैरसोय

**। माथेरान । वार्ताहर ।**

शहराच्या मध्यवर्ती भागात असलेल्या नगरपरिषदेच्या वीर हुतात्मा भाई कोतवाल या शाळेतील नादुरुस्त स्वच्छतागृहाचे काम अद्यापही पूर्ण करण्यात आलेले नसल्याने याचा शालेय विद्यार्थ्यांना प्रचंड त्रास सहन करावा लागत आहे. सर्वसामान्य कष्टकरी लोकांची मुले या शाळेत शिकत असून, पावसाळ्यात लहान-लहान मुलांना स्वच्छतागृहाच्या दुरुस्तीच्या कामामुळे याचा वापर करता येत नसल्याने पावसातून सार्वजनिक शौचालयाकडे धाव घ्यावी लागत आहे.

डिसेंबर महिन्यापासून सुरू असलेले स्वच्छतागृह दुरूस्तीचे काम अजूनही अपूर्ण अवस्थेत आहे. नगरपरिषदेच्या अखत्यारीत सर्व कामगार यंत्रणा कार्यरत असतानादेखील शाळेसारख्या महत्त्वपूर्ण क्षेत्रामध्ये अपूर्ण कामांत दिरंगाई केली जात असल्याने पालकवर्गात तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. त्यातच सभागृहात लोकप्रतिनिधी नसल्याने शाळेतील समस्यांकडे दुर्लक्ष होत आहे. संबंधित अधिकारी वर्गाने लवकरच शाळेतील विद्यार्थ्यांना भेडसावत असणाऱ्या प्रश्नांची उकल लवकरात लवकर करावी, अशी पालकवर्गासह स्थानिकांमधून मागणी होत आहे.





> स्वच्छतागृहाची कामे अद्यापही पूर्ण झाली नसल्याने लहान मुलांना शौचास जाण्यासाठी सार्वजनिक शौचालयाचा वापर करावा लागतो. स्वच्छतागृहांची ताबडतोब दुरुस्ती करण्यात यावी यासाठी संबंधित अधिकारीवर्गाची आम्ही पालक वर्ग दोन दिवसांत भेट घेणार आहोत.
>
> – ज्योती सुरेश शिंदे, अध्यक्षा, शाळा शिक्षण समिती, नगरपरिषद शाळा माथेरान

## शिक्षिका शारदा पाटील यांचे निधन

**। भाकरवड । वार्ताहर ।**

अलिबाग तालुक्यातील ग्रामपंचायत कुसुंबळे हद्दीतील पिटकिरी गावच्या रहिवासी निवृत्त शिक्षिका शारदा नारायण पाटील यांचे वयाच्या ७४ व्या वर्षी शुक्रवार, दि. २८ जून रोजी अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या निधनाची बातमी कळताच संपूर्ण पिटकिरी गावावर शोककळा पसरली. त्या प्राथमिक शिक्षिका होत्या. त्यांनी हेमनगर, वाघविरा या शाळांमध्ये ३५ वर्षे सेवा केली. त्यानंतर मेढेखार येथे सेवानिवृत्त झाल्या. शारदा पाटील यांना नाट्य, सामाजिक, शैक्षणिक, आध्यात्मिकतेची आवड होती. आपल्या शैक्षणिक कारकीर्दीत अनेक विद्यार्थी, विद्यार्थिनी घडवून ते चांगल्या हुद्द्यावर कार्यरत आहेत. त्यांच्या पार्थिवावर ज्येष्ठ नागरिक संघटना कुसुंबळे, ग्रामस्थ पिटकिरी, नाट्य मंडळ यांच्या वतीने पुष्पहार अर्पण करण्यात आला, तर उपस्थित सर्वांच्या वतीने विजय पाटील गुरुजी यांनी भावपूर्ण श्रद्धांजली वाहण्यात आली. त्यांच्या पश्चात मुलगा सुधीर पाटील, सुनील पाटील, एक मुलगी रेखा, सुना, नातवंडे असा मोठा परिवार आहे. त्यांचे उत्तरकार्य दहावा ओंकारेश्वर मंदिर पेझारी येथे रविवार, दि. ७ जुलै रोजी तर तेरावे बुधवार, दि. १० जुलै रोजी राहत्या घरी पिटकिरी येथे होणार आहेत.



## एलएसपीएम महाविद्यालयामध्ये योग दिन



**। अलिबाग । वार्ताहर ।**

लोकमान्य शिक्षण प्रसारक मंडळाच्या कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागांतर्गत २१ जून रोजी आंतरराष्ट्रीय योग दिन हा कार्यक्रम उत्साहात साजरा करण्यात आला.

या कार्यक्रमात योगाभ्यास व प्राणायामचे प्रशिक्षण देण्यासाठी सिद्धी वाकडे यांची उपस्थिती लाभली होती. तसेच महाविद्यालयाच्या प्राचार्या प्रा. लीना पाटील, आय. क्यू. एस. सी कॉर्डिनेटर प्रा. श्रद्धा पाटील उपस्थित होत्या.सुरुवातीस प्रशिक्षिका सिद्धी वाकडे, महाविद्यालयाच्या प्राचार्या, आयक्यूएससी कॉर्डिनेटर यांचे राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने गुलाब पुष्प देऊन स्वागत करण्यात आले आणि प्रशिक्षणास सुरुवात करण्यात आली. महाविद्यालयाच्या प्राचार्य यांनी सुरुवातीस विद्यार्थ्यांना योग दिन साजरा करण्याची पार्श्वभूमी समजावून दिली. संस्थेचे अध्यक्ष रवींद्र ठाकूर, उपाध्यक्ष प्रमोद पाटील, कार्यवाह राजेंद्र ठाकूर यांनी विद्यार्थ्यांना कार्यक्रमात शुभेच्छा दिल्या. प्राचार्य लिना पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली रा.से.यो. कार्यक्रम अधिकारी प्रा. सचिन गोंधळी, प्रा. प्रवेश पाटील यांनी कार्यक्रम यशस्वीपणे साजरा केला.कार्यक्रमात महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी, महाविद्यालयातील विद्यार्थी तसेच रा.से.यो. विभागाचे स्वयंसेवक उपस्थित होते. कार्यक्रमाचे नियोजन सुरक्षा स्थळे, पियुष वर्तक यांनी केले.

## सोनाराला १३ लाखाला लुटले

**पनवेल :** सोनाराला स्वस्तात सोने देतो असे सांगून त्याला १३ लाखाला लुटल्याची घटना खारघर वसाहतीमध्ये घडली आहे. सोनार रवींद्र चौधरी यांना राज नावाच्या व्यक्तीने रवींद्र यांचे मित्र सुनील इंगळे यांना स्वस्तात सोने देतो असे सांगून गळाला लावले होते. त्यानुसार इंगळे यांनी रवींद्र यांनाही स्वस्तातील सोन्याबद्दल माहिती दिली. त्यानुसार रवींद्र चौधरी, सुनील इंगळे, रतनसिंग राठोड व इतर एकजण कारने खारघरला आले. त्या ठिकाणी कारमधून आलेल्या पाच व्यक्तींनी पोलीस असल्याचे सांगून पैशाची बॅग घेऊन थांबलेल्या रतनसिंह राठोड यांना जबरदस्तीने कारमध्ये बसवून नेले. चौधरी व राठोड यांचा संपर्क झाला असता आपल्याला लुटले गेल्याचे त्यांच्या लक्षात आले.

# सव्वापाच लाखांची वीजचोरी उघडकीस

- सहा वीजचोरांविरुद्ध गुन्हा दाखल

**। कल्याण । प्रतिनिधी ।**

महावितरणच्या वाडा उपविभागातील वीजचोरांविरुद्ध धडक मोहीम निरंतर सुरू आहे. कारवाईनंतर वीजचोरीच्या देयकाचा मुदतीत भरणा न करणाऱ्या सहा जणांविरूद्ध वीज कायदा २००३ च्या कलम १३५ नुसार जव्हार पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या आरोपींकडील पाच लाख १९ हजार रुपयांची वीजचोरी उघडकीस आली आहे.

सुधाकर कराळे, दिलीप पाटील (शिवाजीनगर), दिलीप भानुशाली (भानुशाली आळी), शिवाजी फुलवडे (समर्थनगर), आतिश पाटील (किरवली), राजु गुरोडा (पाली) अशी गुन्हा दाखल करण्यात आलेल्या आरोपींची नावे आहेत. उपकार्यकारी अभियंता अविनाश कटकवार यांच्या नेतृत्वाखाली वाडा उपविभागात वीजचोरी शोधमोहीम सातत्याने सुरू आहे. या मोहिमेत संबंधित आरोपींकडून वीज मीटरकडे येणाऱ्या केबलला टॅपिंग करून वीजचोरी सुरू असल्याचे आढळून आले. या सर्वांना वीजचोरीचे देयक व तडजोड रक्कम भरण्याबाबत नोटीस बजावण्यात आली. परंतु, विहीत मुदतीत सदर रकमेचा भरणा न झाल्याने त्यांच्या विरोधात पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पान १ वरून

## कठोर कायदा करा

तर महानगर पालिकेचे कर्मचारी या होर्डिंगची किती काळजी घेतात. कारण, त्यांना महिन्याच्या महिन्याला पाकीट मिळते, मुंबईतल्या फिनिक्स मिलच्या जवळ नऊ होर्डिंग्ज आहेत. ही होर्डिंग रेल्वेच्या भिंतीला लागून आहेत. दक्षिण मुंबईत जवळपास ४५ होर्डिंग्ज ही अनधिकृत आहेत. यावर महानगरपालिका कुठलीच कारवाई करत नाही. ते रेल्वेकडे बोट दाखवून आपली जबाबदारी झटकून टाकतात. दक्षिण मुंबईत या होर्डिंगचे महिन्याला १० ते २० लाखांचे उत्पन्न मिळते, असे सांगितले. उद्योगमंत्री उदय सामंत उत्तरादाखल म्हणाले की, घाटकोपर होर्डिंग दुर्घटनेत मृत्यू पावलेल्यांच्या वारसाना ११ लाख रूपये, तर ८१ जखमींा आर्थिक मदत देण्यात आली आहे. महानगर पालिकेच्या नियमानुसार, ४०X४० च्या होर्डिंगला २ लाख १७ हजार रूपये आकारले जातात. मात्र, घाटकोपर दुर्घटना झालेली होर्डिंग ही १२०X१२० इतकी मोठी होती. यात रेल्वेचे आयपीएस अधिकारी कैसर खालिद यांना निलंबित केलेले आहे.

## ‘लाडकी बहीण’ वादात

करण्याचा अधिकार असतो. त्यानंतर विनियोजन विधेयकाला राज्यपालांची मंजुरी मिळते. त्यानंतर अर्थसंकल्पातील निधी खर्च करण्यास मान्यता मिळते आणि शासन निर्णय काढता येतो, असे विजय वडेट्टीवार यांनी म्हटले आहे. या निर्णयात ही प्रक्रिया डावलली आणि मंत्रिमंडळाची बैठक घेऊन ‘मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण’ योजनेचा सरकारने शासन निर्णय काढला. हा सार्वभौम सदनाचा हक्कभंग आहे, असे वडेट्टीवार यांनी म्हटले आहे.

विधानसभेत हक्कभंगाचा प्रस्ताव आणल्यानंतर त्याची माहिती वडेट्टीवार यांनी विधिमंडळाबाहेर पत्रकारांशी संवाद साधताना दिली. वडेट्टीवार पुढे म्हणाले की, मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेचा जीआर काढून या सरकारने महिलांची फसवणूक केली आहे. कारण, जर अर्थसंकल्पाला अजून मान्यताच मिळाली नाही, तरीदेखील हा जीआर काढला गेला. एकमेकांवरील कुरघोडीच्या राजकारणामुळे घाईगडबडीत हा जीआर काढला आहे. अध्यक्ष महोदयांनीदेखील हा शासन निर्णय वाचून दाखविला. त्यांनीदेखील कायदेशीर बाबींची शहानिशा करणे आवश्यक होते, असे विजय वडेट्टीवार यांनी सांगितले.

**मुख्यमंत्र्यांची कुरघोडी?**

या घोषणेचे श्रेय अर्थमंत्री अजित पवार यांना घेऊ द्यायचे नव्हते म्हणून मुख्यमंत्र्यांनी ही कुरघोडी केली काय, असा सवाल राष्ट्रवादीचे नेते जयंत पाटील यांनी केला आहे. अर्थसंकल्प काल फक्त मांडलेला आहे, त्याला अजून मंजुरी मिळालेली नाही. विधेयक मांडून त्यावर मतदान होते. राज्यपाल सही देतात, मान्यता देतात, मग सगळी प्रक्रिया होते. मुख्यमंत्र्यांची श्रेयवादाची लढाई दिसून येत आहे. हा हक्कभंग होतो आणि हक्कभंग दाखल झाला पाहिजे, अशी आमची मागणी असल्याचे जयंत पाटील म्हणाले.

## कार्लेखिंड-वडखळ रस्ता गेला खड्ड्यात

असून, अनेक ठिकाणी मोठ मोठे खड्डे पडले आहेत. गेल्या सात ते आठ वर्षांपासून प्रवाशांना खड्डेमय रस्त्यानेच प्रवास करावा लागत आहे. मध्यंतरी काही काळ या रस्त्याची डागडुजी करण्यात आली होती. परंतु, आता पुन्हा या रस्त्यावर खड्डे पडले आहेत. अलिबागमध्ये मोठ्या संख्येने पर्यटक आपापली वाहने घेऊन येतात. खड्ड्यांमुळे अपघाताच्या घटनाही घडत आहेत. तरीही रस्त्यावरील खड्डे भरण्यासाठी अधिकारी तयार नाहीत, असा सूर जनतेमधून उमटत आहे.

अलिबाग शहराला जोडणाऱ्या वडखळ-अलिबाग महामार्गाची सध्या मोठ्या प्रमाणात दुरवस्था झाली आहे. या रस्त्याच्या दुरुस्तीकडे राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाचे दुर्लक्ष होत आहे. त्यामुळे वाहनचालकांना मनस्ताप सहन करावा लागत असून, वाहतूक कोंडीची समस्याही निर्माण होत असल्याचे अमिर ठाकूर यांनी सांगितले. अलिबाग हे जिल्ह्याचे मुख्यालय आणि प्रमुख पर्यटन स्थळ असल्याने येथे दररोज येणाऱ्या वाहनांची संख्या मोठी आहे. त्यामुळे येथे सातत्याने वर्दळ सुरु असते. याशिवाय अवजड वाहतूक मोठ्या प्रमाणात होत असते. यामुळे रस्त्यावरून हजारो वाहने ये-जा करत असतात. तिनविरा ते पोयनाड तसेच धरमतर ते वडखळ परिसरात रस्त्याला भरमसाठ खड्डे पडले आहेत. त्यामुळे कार्लेखिंड ते वडखळ रस्त्याची झालेली दुरवस्था, त्यामुळे होणारे अपघात व जनतेला होणाऱ्या त्रासामुळे या रस्त्याची तातडीने दुरूस्ती न झाल्यास आम्हाला रस्त्यावर उतरावे लागेल, असा इशारा ठाकूर यांनी दिला आहे.

## शिक्षकांना आश्चर्याचा धक्का

शिक्षण विभागाकडून देण्यात आली आहे.

रायगड जिल्ह्यात जिल्हा परिषदेच्या पहिली ते आठवीपर्यंतच्या दोन हजार ५६५ शाळा आहेत. या शाळांमध्ये सुमारे एक लाखांहून अधिक विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. विद्यार्थ्यांना शिकविण्याबरोबरच निवडणूक व इतर शासनाच्या योजनांची कामे जिल्हा परिषदेचे शिक्षक करतात. शाळांमध्ये वेगवेगळे उपक्रम राबवून त्या उपक्रमांतून विद्यार्थ्यांचा बौद्धिक व शारीरिक क्षमता वाढविण्यातदेखील शिक्षकांचा मोलाचा वाटा आहे.

दर महिन्याच्या एक तारखेला शिक्षकांना जिल्हा परिषदेमार्फत त्यांचे वेतन दिले जाते. मात्र, पूर्वी वेतन मिळताना शिक्षकांना दोन ते पाच दिवस प्रतीक्षा करावी लागत होती. त्यामुळे महिन्याच्या खर्चाचा ताळमेळ जुळविताना अडचणी येत होत्या. त्यामुळे जिल्हा परिषद व कोषागार विभागाच्या समन्वयाने हा प्रश्न कायमचा सोडविण्यात आला आहे. जिल्हा परिषदेच्या शिक्षकांचे वेतन थेट त्यांच्या खात्यात तारखेच्या अगोदरच देण्यासाठी ई-कुबेर प्रणाली सुरु करण्यात आली आहे. रायगड जिल्हा परिषदेच्या पाच हजार ८७६ शिक्षकांचे व ४० केंद्रप्रमुखांचे वेतन ई-कुबेर प्रणालीद्वारे खात्यात जमा करण्यात आले आहे. एक जुलैला होणारे वेतन जून महिन्याच्या शेवटच्या आठवड्यात दोन दिवस अगोदरच करण्यात आले आहे. जिल्हा परिषदेच्या माध्यमातून ई-कुबेर प्रणालीद्वारे शिक्षकांच्या खात्यात तारखेच्या अगोदरच वेतन जमा झाल्याने त्यांना आश्चर्याचा धक्का दिला आहे.

## विद्यार्थिनीचा सर्पदंशाने मृत्यू

सायंकाळी वंदना हिला सर्पदंश झाला. त्यात तिचा मृत्यू झाला.

कर्जत तालुक्याच्या शेवटच्या टोकावर असलेल्या शेलू ग्रामपंचायतीमधील बेडीस गाव येथील कोतेरीवाडी येथील वंदना बाळू पारधी ही विद्यार्थिनी मागील वर्षापासून नेरळ येथील आदिवासी वसतिगृह येथे राहून शिक्षण घेत होती. नववीमध्ये शिक्षण घेण्यासाठी नेरळ येथे राहण्यास आलेली वंदना यावर्षी दहावीला गेली होती. या आदिवासी वसतिगृहाच्या बाजूला असलेल्या विद्या विकास मंदिर शाळेत ती शिकत होती. मात्र, काही दिवस ही विद्यार्थिनी शाळेतून थेट आपल्या घरी आपल्या आईला मदत करण्यासाठी बेडीसगाव येथे जाता होती.शेतीच्या कामात मदत करण्यासाठी घरी जाऊन शिक्षण घेत असलेल्या वंदना हिची आदिवासी वसतिगृहात जागा निश्चित होती. शुक्रवारी आपल्या घरी पोहोचलेली वंदना ही सोमवारपासून वसतिगृहात पूर्णवेळ राहण्यासाठी येणार होती. त्यासाठी आपल्या घरी असलेली सर्व कागदपत्र घेऊन येते असे सांगून गेलेली वंदना पुन्हा वसतिगृहा परतली नाही. सायंकाळी घरी शेतात कामे करून परतलेली वंदना हिला सर्पदंश झाला. त्याची माहिती होताच तिच्या आईने आजूबाजूच्या तरुणांना सांगितले. त्यानंतर तरुणांनी लगेच वांगणी येथे रुग्णालयात नेण्यासाठी धावपळ केली. मात्र, दुर्दैवाने यातून वंदना वाचू शकली नाही. वंदनाच्या मृत्यूने तिच्या आई आणि भावावर मोठे संकट कोसळले आहे. वंदना शिक्षणात हुशार होती आणि त्यात चुणचुणीत असल्याने सर्व शिक्षकांची लाडकीदेखील होती. त्यामुळे तिच्या आकस्मिक जाण्याने शाळेचेदेखील नुकसान झाले आहे, असे मुख्याध्यापिका शैलजा निकम यांनी सांगितले.

## महामार्गाला तलावाचे स्वरुप

एकदा नाराजीचे सूर उमटत आहेत. दरम्यान, मुंबई-गोवा महामार्गावरील रस्त्याचे काम हे अद्यापपर्यंत पूर्ण झालेले नसून, जे काही काम झाले आहे, ते अत्यंत निकृष्ट दर्जाचे होत असल्यामुळे प्रवासी व वाहनचालकांमधून ऐकावयास मिळत आहे. ज्या ज्या ठिकाणी रस्त्याचे काम पूर्ण झाले आहे, त्या ठिकाणच्या रस्त्यावरील काही ठिकाणी योग्यरित्या काम न झाल्यामुळे त्या ठिकाणी पाणी साचल्यामुळे महामार्गाला तलावाचे स्वरुप आले आहे. याचचे एक उदाहरण म्हणजे, वाकण पुलानजीक रस्त्यावर पूर्णतः पाणीच पाणी झाल्यामुळे वाहनचालकांना वाहने चालवताना मोठ्या प्रमाणात कसरत करावी लागत आहे. महामार्गावरील रस्त्याचे काम करताना ज्या साईडपट्ट्यांचे काम अत्यंत निकृष्ट दर्जाचे केल्याचा आरोप करण्यात येत आहे.

## मुर्बी शाळेत ग्रंथालयाची स्थापना

**। पनवेल । वार्ताहर ।**

आज रोटरी खारघर मीडटाऊनतर्फे खारघरच्या शासकीय मुर्बी शाळेत लायब्ररी-ग्रंथालय स्थापित करण्यात आले. रोटरी खारघर मीडटाऊन आणि एमपीरियान शाळेतल्या इनट्रॅक क्लबच्या मुलांनी १०० - १२५ पुस्तके दिली. रोटरी खारघर मीडटाऊनचे अध्यक्ष रो. अनुप गुप्ता यांचे मार्गदर्शन आणि शाळेच्या अध्यापिका श्रीमती म्हात्रे यांच्या सहयोगाने ही ग्रंथालय स्थापित करण्यात आली. यावेळी रो. सेक्रेटरी डॉ. रवी किरण, न्यू जनरेशन डायरेक्टर रो. अनामिका, रो. शुभांगी, रो. दीपा पटेल, शाळेतले सर्व शिक्षक, मुले व स्टाफ उपस्थित होता.

# अवैध पार्किंगसंदर्भात पोलिसांच्या सूचना

**। पनवेल । वार्ताहर ।**

आशिया खंडातील सर्वात मोठे स्टील मार्केट म्हणून कळंबोली स्टील मार्केटची ओळख आहे. मात्र, याच परिसरात होत असलेल्या अवजड वाहनांच्या अवैध पार्किंगमुळे मोठी वाहतूक कोंडीची समस्या निर्माण होते. या अनुषंगाने नवी मुंबई वाहतूक पोलीस उपायुक्त तिरुपती काकडे यांच्या आदेशानुसार कळंबोली वाहतूक शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक हरिभाऊ बानकर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक पांडुरंग साठे यांनी बिमा कॉम्प्लेक्स, स्टील मार्केट येथे स्टील मार्केटमधील ट्रक, कंटेनर, ट्रेलर, मिक्सर आदि अवजड वाहनचालकांची बैठक घेतली. यावेळी स्टील मार्केटमधील पार्किंगच्या गंभीर समस्येबाबत वाहनचालकांना सूचना देण्यात आल्या.

तळोजा, मुंब्रा, शीळफाटा, कल्याण, भिवंडी, बदलापूर परिसरात जाण्यासाठी पनवेलहून कळंबोली सर्कल येथून जाणे सोयीचे ठरते. कळंबोली सर्कल येथील वाहतूक कोंडीतून वाट काढण्यासाठी वाहनचालक स्टील मार्केटमधील सर्विस रोडचा मार्ग अवलंबतात. मात्र, स्टील मार्केटमधील रस्त्यावर होणार्या दुहेरी, तिहेरी अवैध पार्किंगमुळे वाहनचालकांच्या मोठ्या रांगा लागतात आणि परिणामी कळंबोली सर्कलच्या वाहतूक कोंडीवर आणखीनच भर पडते. या धर्तीवर वाहन पार्किंग करताना एकेरी पार्किंगव्यतिरिक्त कोणीही स्टील मार्केटमधील सर्विस रोड व इतरत्र रोडवर कुठेही आपली वाहने दुहेरी अथवा तिहेरी पार्किंग करणार नाहीत याबाबत कळंबोली वाहतूक पोलिसांनी वाहनचालकांना सक्त ताकीद दिली. तसेच असे करताना कोणी आढळून आल्यास सदर वाहनांवर गंभीर कारवाई करण्यात येईल, असा इशारा यावेळी देण्यात आला. तसेच सर्व वाहनचालकांनी वाहतुकीचे नियम तंतोतंत पाळण्याबाबत प्रबोधन करण्यात आले. यावेळी वाहन चालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# चार नव्या मार्गिकांच्या विकसित कामाला सुरूवात

## वाहतूक कोंडी होणार दूर

**। पनवेल । वार्ताहर ।**

नवी मुंबई आंतराष्ट्रीय विमानतळाचे काम अंतिम टप्प्यात आले आहे. याच दृष्टीने विमानतळाला जोडणारी दळणवळण व्यवस्था आणखी सुखकर करण्यासाठी राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण आणि एमएसआरडीसी यांच्या माध्यमातून पनवेलजवळील कर्नाळा स्पोर्ट्स परिसरात खांदा गावाजवळ चार नव्या मार्गिका विकसित करण्याच्या कामाला सुरुवात झाली आहे. या नव्या मार्गिकांमुळे विमानतळ गाठणे विनावाहतूक कोंडी शक्य होणार आहे.

राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाच्या माध्यमातून केले जाणारे हे काम एमएसआरडीसीच्या देखरेखीत केले जाणार आहे. कर्नाळा स्पोर्ट्स अकादमी परिसरात नवी मुंबई विमानतळाचे प्रवेशद्वार असणार आहे. याठिकाणी या चार मार्गिका तसे इतरही कामे केली जाणार असून, याकरिता सुमारे ५१२ कोटींचा खर्च येणार आहे. एका वर्षात हे काम पूर्ण होणार असून, १ मार्च २०२५ ही या कामाची डेडलाईन असणार आहे. नव्याने उभारल्या जाणार मार्गिकेमध्ये नवी मुंबई आंतराष्ट्रीय विमानतळ ते कळंबोली, जेएनपीटी ते विमानतळ, कळंबोली ते कर्नाळा स्पोर्ट्स आणि कर्नाळा स्पोर्ट्सवरून थेट विमानतळ अशा मार्गिका असणार आहेत.

कर्नाळा स्पोर्ट्स अकादमी परिसरात पनवेल महापालिकेचे स्वराज्य नामक मुख्यालयदेखील उभे राहात आहे. भविष्यात लोकप्रतिनिधींसह सर्वसामान्य नागरिकांची वर्दळ या मुख्यालयात वाढणार असल्याने या नव्या मार्गिकेचा फायदा या पनवेल महापालिकेच्या मुख्यालयात येण्यासाठीदेखील होणार आहे. पनवेल शहरातून जाण्यासाठी सायन पनवेल महामार्गावरून ये-जा करावी लागते. या राष्ट्रीय महामार्गावर मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी होत असते. या नव्या मार्गिकांमुळे सायन-पनवेल महामार्गावरील वाहतुकीचे ताण कमी होणार असून, भविष्यात कार्यान्वित होणारे नवी मुंबई आंतराष्ट्रीय विमानतळ गाठणे सहज शक्य होणार आहे.

## नवीन फौजदारी कायद्यांबद्दल जनजागृती

**पनवेल :** ब्रिटिशकालीन फौजदारी कायदे बदलून केंद्र सरकारने तीन नवे कायदे संसदेत मंजूर केले होते. हे ३ कायदे १ जुलैपासून लागू करण्यात येणार आहेत. त्या कायद्यांबद्दल सामाजिक जनजागृती व्हावी तसेच त्याचा समाजाकडून अंमल व्हावा या उद्देशाने आम्ही उलवेकर मित्र मंडळ आणि महिला मंडळ यांच्या वतीने सिद्धिविनायक गणपती मंदिर सेक्टर १७, उलवे येथे, सामाजिक जनजागृती आणि मार्गदर्शन शिबीर आयोजित करण्यात आले होते. उलवे येथील रहिवासी तसेच उलवे नोडमधील रहिवासी आणि संघटना यांना भारतीय न्याय संहिता (द्वितीय सुधारणा) (एनबीएस-२०२३), भारतीय नागरिक सुरक्षा संहिता (द्वितीय सुधारणा) (बीएनएसएस-२०२३) व भारतीय साक्ष (द्वितीय सुधारणा) (बीएस-२०२३) या १ जुलैपासून लागू होणाऱ्या नवीन कायद्यांबद्दल वरिष्ठ पोलीस निरीक्षक अंजुमन बागवान यांनी मार्गदर्शन केले. यावेळी अध्यक्ष सचिन राजे येरुणकर, रविशेठ पाटील (संस्थापक, अध्यक्ष साई मंदिर वहाळ), सचिन घरत (उपसरपंच), विदाश्री भांगे (डिजिटल फॉरेन्सिक व सायबर गुन्हे विशेषज्ञ), राजेंद्र घरत, राकेश घरत, विनोद थोरात, संदीप पाटील, निलेश पाटील आदी उपस्थित होते.

# अपघातात एक ठार

**। पनवेल । वार्ताहर ।**

टाटा टेम्पोवरील चालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटल्याने त्याने अज्ञात वाहनाला ठोकर दिली. यात शेख यासीनभाई अहमदभाई याचा मृत्यू झाला. या अपघाताप्रकरणी पनवेल तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

यातील टाटा टेम्पो क्र. जिजे ३१ टी ६९७० यावरील चालक शेख यासिनभाई अहमदभाई (४८, रा. गुजरात) हे त्यांच्या ताब्यातील वाहन घेऊन मुंबई-पुणे द्रुतगती मार्गाने पुणे बाजूकडे वेगात चालवीत घेऊन जात असताना किमी ९.८०० (कोनजवळ) येथे आले. त्यांचे गाडीवरील नियंत्रण सुटल्याने टेम्पोच्या पुढे जात असलेल्या अज्ञात वाहनास जोरदार ठोकर मारून अपघात घडला आहे. या अपघातात चालक शेख यासीनभाई यांच्या तोंडाला, डोक्याला, छातीला, गंभीर दुखापत झाल्या असून, त्यांना अपघात स्थळी हजर असलेल्या आयआरबी रुग्णवाहिकेमधील डॉ. मंगेश भगत यांनी तपासून मृत घोषित केले. अपघाताच्या ठिकाणी पळस्पे मोबाईलवरील स्टाफसह आयआरबी स्टाफ, देवदूत टीम, पनवेल तालुका पोलीस ठाणे पीएसआय हर्षल राजपूत व स्टाफ उपस्थित होते.

**निवडक**

## खोपोलीत कारचा अपघात

**खोपोली :** पुणे-मुंबई महामार्गावर ढेकू गावानजिक उताराच्या रस्त्यावर कार चालकाने रस्त्याच्या परिस्थितीकडे दुर्लक्ष करून कार अतिवेगान चालवु समोर थांबलेल्या कंटेनरला धडक देऊन अपघात केला. या अपघातात चालकासह कारमधील एक प्रवासी गंभीर जखमी होऊन दोघेजण जागीच ठार झाले आहेत. तसेच, दोन्ही वाहनांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. याबाबत खोपोली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास पोसई अभिजित व्हरांबळे हे करीत आहेत.

## राहत्या घरातून चोरीचा प्रयत्न

**पनवेल :** व्यवसायाची बोलणी करण्याच्या निमित्ताने वळवली येथील धनश्री प्रवीण पाटील यांच्या घरामध्ये येऊन कपाटातील किमती वस्तू चोरी केल्याचा प्रयत्न केल्याप्रकरणी प्रियंका नंदकिशोर पंडित (वसई), सिद्धार्थ जयदीप राणा (अंधेरी) यांच्या विरोधात खांदेश्वर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दरम्यान, धनश्री या बाहेर गेल्या असता आरोपींनी बेडरूममधील कपाटात उचकटून चोरी करण्याचा प्रयत्न करताना दिसले. त्यानंतर धनश्री यांनी पोलिसांना फोन करून मदत मागितली.

## मारहाणीसह चाकूने वार

**पनवेल :** जुन्या भांडणाच्या रागातून चाकूने व लाथाबुक्याने मारहाण केल्याप्रकरणी वसिम लुंगी यांच्या विरोधात कळंबोली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. यापूर्वी वसीमने इमरानला मारहाण केली होती. त्यामुळे त्याच्या विरोधात पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली होती. त्याचा राग मनात धरून वसीम यांनी टॅक्सीने जात असलेल्या इमरान यांना शिवीगाळ करण्यास सुरुवात केली. टॅक्सीतून उतरून इमरान यांनी शिवीगाळ न करण्याबाबत सांगितले असता वसीमने लाथा बुक्क्याने मारहाण करत पोटावर चाकूने केले.

## मोटारसायकलची चोरी

**पनवेल :** आशिष यादव यांनी आपली मोटरसायकल खारघर रेल्वे स्टेशन समोरील सिडको पार्किंगमध्ये पार्क केली होती. त्यानंतर ते हैदराबादला गेले होते. हैद्राबादवरून परतल्यावर मोटरसायकल पार्क केलेल्या ठिकाणी आढळून आली नाही. या पार्किंगचे मॅनेजमेंट बघणारे अविनाश चौधरी यांच्याकडे विचारपूस केली असता त्यांनी काहीही माहिती दिली नाही. खारघर येथे पार्किंगमध्ये पार्क केलेली मोटरसायकलची चोरी केल्याप्रकरणी अविनाश चौधरी यांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## कामोठ्यात घरफोडी

**पनवेल :** कामोठे येथील योगेंद्र कुमार वार्षणीय यांनी मुख्य दरवाजा आत मधून बंद करून ते झोपले होते. सकाळी उठले असता त्यांना मोबाईल सापडला नाही. तसेच, रेग्झिनची बॅग आणि १९ हजार रोख रक्कम ही नसल्याचे आढळून आले. यावेळी मुख्य दरवाजाही उघडलेला दिसला. चोरट्याने स्लाइडिंग खिडकी मधून हात घालून बंद दरवाजाची कडी उघडली आणि त्यातून घरात प्रवेश करत चोरी केली असल्याचे निदर्शनास आले. या प्रकरणी कामोठे पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# योजना करा, पण शेतकऱ्यांना चिरडू नका!

### ■ जलजीवन मिशन योजनेची धक्कादायक माहिती समोर



**। पेण । प्रतिनिधी।**

**पेण तालुक्यात जवळपास १०६ जलजीवन मिशन अंतर्गत योजना सुरू आहेत. त्यातील जेमतेम दहा ते बारा योजना पूर्ण झाल्या आहेत. पूर्ण झालेल्या योजनांमध्येदेखील अनेक त्रुटी आहेत. अनेक योजना ठेकेदाराच्या अकार्यक्षमतेमुळे अपुऱ्या स्थितीत आहेत. काही योजना कागदावरच आहेत. तर काही ठिकाणी योजना पूर्ण व्हाव्यात म्हणून स्थानिक शेतकऱ्यांना विश्वासात न घेता अतिक्रमण करून बांधकाम केले आहे. अशीच एक योजना आमटेम ग्रामपंचायतीच्या कार्यक्षेत्रात दिव वाडी, पाचआंबा, लांगी वाडीमध्ये सुरू आहे. बेजबाबदार अधिकाऱ्यांच्या व गाव नेत्यांच्या जोरावर ठेकेदार सुशील निकम या ठेकेदाराने काम सुरूच ठेवले आहे. काम तातडीने बंद न झाल्यास शेतकऱ्यांनी आमरण उपोषणाचा इशारा दिला आहे.**

याबाबत हकीकत अशी की, शेतकरी जगदीश मोकल आणि रवींद्र मोकल यांच्या मालकीच्या जागेवर कोणतीही पूर्वसूचना न देता या योजनेचे काम सुरू केले असून, शेतकरी काम थांबवायला गेल्यास त्यांच्यावर ठेकेदाराच्या माणसाने हल्ला चढवून उलट ठेकेदाराने शेतकऱ्यावरच पोलीस ठाण्यात तक्रार नोंदविली आहे. अधिकारी वर्गाला ठेकेदाराकडून धनलक्ष्मीचा दर्शन होत असल्याने कोणतीच कागदपत्र तपासत नाहीत, असा शेतकऱ्यांचा आरोप आहे. नियमानुसार जागा मालकाचे संमतीपत्र व दाखला घेणे गरजेचे होते; परंतु अधिकाऱ्यांनी काही न पाहता काम सुरू करण्याची परवानगी दिली. साधारणतः हे काम १ कोटी ७ लाख रूपये किमतीचा असून, याचा ठेकेदार सुशील गोरख निकम बीड येथील आहे. तसेच, या ठेकेदाराने काम घेताना ९ टक्के बिलो (कमी) ने घेतला आहे. त्याला काही झाले तरी कसेही काम पूर्ण करायचे आहे. त्यामुळे तो गाव नेत्यांनादेखील लक्ष्मी दर्शन घडवत आहे, अशी चर्चा आहे. अधिकारी आणि गाव नेते मिळून शेतकऱ्यावर अन्याय करत आहेत. शेतकरी जगदीश मोकल आणि रवींद्र मोकल यांनी २० मे रोजी रितसर वकिलामार्फत नोटीसदेखील दिली आहे. त्यामध्ये उल्लेख केला आहे की, जगदीश मोकल आणि रवींद्र मोकल यांच्या मालकीचा सर्व्हे नं. ८१/०१/ब/०२ मध्ये अनधिकृत बांधकाम सुरू असल्याने तात्काळ काम बंद करावे, अशी मागणी करण्यात येत आहे.

> **टाकीचे बांधकाम आमच्या जागेत आहे. काम सुरू होताच त्यावर आम्ही हरकत घेऊन काम बंद करण्यास सांगितले होते. आमची जागा नसेल तर बांधकाम करण्यास आमचा अडथळा नाही. परंतु, ही जागा आमची आहे, त्याठिकाणी बांधकाम आम्ही होऊ देणार नाही. जर दडपशाहीने बांधकाम केले, तर आम्ही सर्वजण तहसील कार्यालयासमोर आमरण उपोषणाला बसू.**
> **– जगदीश मोकल, शेतकरी**

> **आम्ही तातडीने काम बंद केले आहे. नक्की जागा कुणाची आहे हे निश्चित झाल्याशिवाय काम सुरू केले जाणार नाही.**
> **– आर.एन. राठोड, शाखा अभियंता**

> **मी ग्रामपंचायतीला रितसर पत्र दिलेले आहे. तसेच आमचे शाखा अभियंता यांनादेखील त्यामध्ये लक्ष घालायला सांगितले आहे. कुणावर अन्याय होऊन देणार नाही.**
> **– आर.जे. पाचपोर, उपअभियंता, ग्रामीण पाणीपुरवठा विभाग**

## ऐन पावसाळ्यात नेरळमध्ये पाणीटंचाई

**। नेरळ । वार्ताहर ।**

ऐन पावसाळ्यात नेरळ टेपआळी येथील ग्रामस्थांना पिण्याच्या पाण्यासाठी संघर्ष करावा लागत असल्याने येथील महिलांनी शक्रवारी नेरळ ग्रामपंचायतीत धडक दिली. परंतु, कार्यालयात सरपंच, ग्रामसेवक नसल्याने आपला रोष या महिलांनी कात्रीत सापडलेल्या सदस्यांवर काढला. मात्र, यावेळी सदस्यांनी ग्रामस्थांच्या समस्यांचे निवारण करून देऊ या आश्वासनावर आक्रमक झालेल्या महिला शांत झाल्या.

कर्जत तालुक्यातील नेरळ ग्रामपंचायत ही नेहमी वादात राहिली आहे. येथे सत्ताधारी यांचे नियोजन फसल्यानेच सामान्य नागरिकांना याचा नाहक त्रास सहन करावा लागतो. नेरळ ग्रामपंचायत परिसरात ग्रामस्थांना अनेक समस्यांना तोंड द्यावे लागत असताना ऐन पावसाळ्याच्या दिवसात नागरिकांना पाणीटंचाईला सामोरे जावे लागत आहे. काही ठिकाणी पाणी मिळते, तर ते अशुद्ध मिळत आहे, त्यामुळे अशा पाण्याने काही ग्रामस्थ आजारी पडलेत. त्यातच कायम शांत असलेला नेरळ ग्रामपंचायतमधील टेपआळी वॉर्ड हा यावेळी ग्रामपंचायत विरोधात आक्रमक झालेला पहायला मिळाला.



## नुकसानग्रस्त कुटुंबाला आर्थिक मदत

### ■ अतुल म्हात्रे यांनी प्रत्यक्ष भेट घेऊन केले सांत्वन



**। पेण । प्रतिनिधी ।**

पेण येथील कणे गावात गणेश दिनकर म्हात्रे यांच्या घरावर वीज पडून त्यांच्या घराला आग लागली व त्यांचे प्रचंड नुकसान झाले. याची माहिती मिळाल्यानंतर त्यांचे व त्यांच्या कुटुंबाचे सांत्वन करण्यासाठी व त्यांच्या कुटुंबाला मदतीचा हातभार लावता यावा यासाठी पेण तालुक्यातील शतकरी कामगार पक्षाचे उच्च शिक्षित नेतृत्व अतुल म्हात्रे यांनी गणेश दिनकर म्हात्रे यांची व त्यांच्या कुटुंबियांची भेट घेतली. यावेळी त्यांनी कुटुंबियांना पंचवीस हजारांची मदत देऊन त्यांचे सांत्वन केले.

यावेळी अतुल म्हात्रे यांच्यासोबत शेकापचे कार्यकर्ते भास्कर पाटील, नागाजी पाटील, बळीराम पाटील, अनंत पाटील, रविकांत पाटील, धीरज पाटील, महेंद्र ठाकूर, शेखर शेळके, नरहरी पाटील आदी कार्यकर्ते व कणे व इतर गावातील ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## केंबुर्ली गावात बिबट्याची दहशत

### वनखात्याच्या कामगिरीवर ग्रामस्थांची नाराजी

**। महाड । वार्ताहर ।**

केंबुर्ली गावात बिबट्याच्या दहशतीमुळे ग्रामस्थ भयभीत झाले असून, बिबट्याने कुत्र्यांना व पाळीव प्राण्यांना लक्ष केल्याने ग्रामस्थांना रात्र जागून काढावी लागत आहे. याबाबत वनखात्याला वारंवार निवेदन देऊनदेखील वन खाते मात्र कोणतीच दखल घेत नसल्याने ग्रामस्थ कमालीचे त्रस्त झाले आहेत.

महाडजवळील केंबुर्ली गावात गावात १३ मे रोजी अचानक पडलेल्या पावसामुळे वीज प्रवाह खंडित झाला होता. त्यावेळेला याच गावातील विलास कांबळे यांच्या घराजवळील कुत्र्यावर बिबट्याने हल्ला करून ठार केले. यावेळी गावातील पोलीस पाटील यांनी २० मे रोजी वन खात्याला निवेदन दिले होते, तरीदेखील वन खात्याने कोणतीच कारवाई केली नाही. त्यामुळे केंबुर्ली गावातील ग्रामपंचायतीने अखेर ४ जून रोजी पुन्हा एकदा वनखात्याला निवेदन देऊन बिबट्याचा बंदोबस्त करण्याची मागणी केली. मात्र, वनखाते कोणतेही लक्ष देण्यास तयार नसल्याने ग्रामस्थ कमालीचे त्रस्त झाले आहेत. या घटनेनंतर गावात पुन्हा एकदा गावातील जयदास पवार यांचा कुत्रा त्यांच्या घरातील टेरेसवर बांधला असताना बिबट्याने रात्रीच्या वेळेस कुत्र्यावर हल्ला करून त्याला ठार मारले.

## चाकरमान्यांची कोंडी...



● पनवेल-सायन महामार्गावर खारघर टोलनाका येथे सकाळी दहाच्या सुमारास मुंबईच्या दिशेने मोठी वाहतूक कोंडी झाल्याने वाहनचालक त्रस्त झाले होते. दरम्यान, कामावर जाणाऱ्या चाकरमान्यांचे मोठे हाल झाले.
(छायाचित्र : राजेश डांगळे)

## रेल्वे स्थानकातील लिफ्ट बंद

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

मध्य रेल्वेवरील नेरळ रेल्वे स्थानकातील प्रवाशांच्या सेवेसाठी असलेले उद्‌वाहन (लिफ्ट) मागील चार दिवसांपासून बंद आहे. उद्‌वाहन बंद झाल्याने प्रवाशांची गैरसोय झाली आहे. दरम्यान, माथेरान येथे येणाऱ्या पर्यटकांची गैरसोय होऊ नये यासाठी रेल्वे प्रशासनाकडून तात्काळ उद्‌वाहन सुरु करण्याची कार्यवाही व्हावी, अशी सूचना नेरळ रेल्वे प्रवासी संघटनेचे अध्यक्ष संदीप म्हसकर यांनी केली आहे.

नेरळ हे मध्य रेल्वेवरील महत्त्वाचे जंक्शन स्थानक आहे. या स्थानकातून माथेरान या पर्यटनस्थळी मिनीट्रेन जात असते. त्यामुळे देश विदेशातील पर्यटक हे माथेरान येथे जाण्यासाठी नेरळ रेल्वे स्थानकात येत असतात. प्रवाशांचे मोठी गर्दी नेरळ रेल्वे स्थानकात असते आणि त्यासाठी नेरळ स्थानकात प्रवेशनाच्या सोयीसाठी उद्‌वाहन तसेच सरकता जिना बनविण्यात यावा, अशी मागणी नेरळ प्रवासी संघटना यांच्याकडून सातत्याने केली जात आहे. सध्या नेरळ स्थानकात फलाट दोनवर असलेले उद्‌वाहन मागील चार दिवसांपासून बंद आहे. त्यामुळे पावसाळी सुट्टीसाठी येणाऱ्या जिन्यावरून चढत जाताना आपल्या बॅगा सांभाळत जावे लागत आहे.



प्रवाशांची गैरसोय

## हाडांची घनता तपासणी शिबिरास उत्स्फूर्त प्रतिसाद



**। आगरदांडा । प्रतिनिधी ।**

रायगड मेडिकल असो. व जंजिरा मेडिकल असो. मेयर कंपनी यांच्या संयुक्त विद्यमाने मुरुड कल्याणी हॉस्पिटलमध्ये संगणकाव्दारे मोफत अस्थि खनिज घनत्त्व तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी १३० नागरिकांनी व डॉक्टरांनी या तपासणीचा लाभ घेतला.

यावेळी जंजिरा मेडिकल असो.चे अध्यक्ष डॉ. संजय पाटील, रायगड मेडिकल असो.चे अध्यक्ष डॉ. निशिगंध आठवले, डॉ. राज कल्याणी, डॉ. मयूर कल्याणी, डॉ. अमित बेनकर, डॉ. हितेश जैन, डॉ. सुनील पटेल, मंगेश पाटील, रवींद्र नामजोशी, वसीम पेशिमाम आदींसह डॉक्टर उपस्थित होते. यावेळी डॉ. राज कल्याणी मार्गदर्शन करतेवेळी म्हणाले की, शरीरात कॅल्शियम असणे जरुरी आहे. कॅल्शियम वाढण्यासाठी दूध आणि दुग्धजन्य पदार्थ, हिरव्या भाज्या, अंडी, मच्छी हे पदार्थ जेवणात आले पाहिजेत.

## झाड कोसळल्याने वाहतूक ठप्प

### ■ महामार्गावर वाहनांच्या लांबच लांब रांगा



**। माणगाव । वार्ताहर ।**

माणगाव तालुक्याला अतिवृष्टीने झोडपले असून, या भरपावसात शुक्रवारी (दि.२८) सायंकाळी मुंबई-गोवा महामार्गावर अचानक वडाचे झाड कोसळल्याने महामार्गावर इंदापूर व माणगाव या दोन्ही बाजूंच्या दिशेने सहा किमीच्या वाहनांच्या रांगाच रांगा लागल्या होत्या. हे उंबराचे झाड बाजूला काढण्यासाठी माणगाव पोलीस, वाहतूक पोलीस तसेच सार्वजनिक बांधकाम व राष्ट्रीय महामार्गाच्या कर्मचाऱ्यांची धावपळ उडाली.

मुंबई-गोवा महामार्गावर माणगाव पासून इंदापूर बाजूकडे गणेश पॅलेस हॉटेलजवळ महामार्गालगत असणारे उंबराचे झाड जोरदार पावसात कोसळून महामार्गावर पडले. दरम्यान, या महामार्गावरून त्यावेळी वाहन जात नसल्याने सुदैवाने पुढील अनर्थ टळला. सायंकाळी चार वाजता महामार्गावर हे झाड कोसळल्याने दोन्ही बाजूंनी ६ किमी अंतरावर वाहनांच्या रांगा लागल्या होत्या. झाड कोसळले असल्याची माहिती माणगाव वाहतूक पोलीस व पोलीस ठाणे तसेच सार्वजनिक बांधकाम विभागाला समजली असता संबंधित अधिकारी, कर्मचारी तसेच नागरिकांनी एकच धाव घेतली. हे झाड बाजूला करण्यासाठी कटर, जेसीबी, मशीन मागविण्यात आले आणि तब्बल दीड ते पावणेदोन तासांनंतर हे झाड बाजूला करून वाहतूक सुरळीत सुरु करण्यात यश आले.

मुंबई-गोवा महामार्ग सतत रहदारीचा असल्याने या मार्गावरून पर्यटक तसेच चाकरमानी, प्रवासी मोठ्या प्रमाणात कोकण व तळ कोकणात प्रवास करत असतात. त्यामुळे या मार्गावर सतत वाहतूक असते. या महामार्गाच्या रुंदीकरणाचे काम गेली अनेक वर्षे सुरु आहे. तसेच या महामार्गाच्या कडेला मोठ्या प्रमाणात जुनी झाडे आहेत. या झाडांमुळे या मार्गावर अपघाताचे प्रमाण वाढत आहे. त्याकडे सार्वजनिक बांधकाम खात्याने डोळेझाक चालवली आहे. महामार्गालगत असणारी धोकादायक झाडे काढून टाकावीत, अशी मागणी पर्यटक, प्रवासी नागरिक तसेच स्थानीकांकडून होत आहे.

## मतदार यादी पुनर्रिक्षण कार्यक्रमाला सुरुवात

# निवडणूक विभाग लागले कामाला



**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

**विधानसभा निवडणुकीचा कार्यक्रम पावसाळ्यानंतर लागण्याची शक्यता आहे. आगामी विधानसभा निवडणुकीपूर्वी मतदार याद्या अद्ययावत करण्यासाठी निवडणूक विभागदेखील कामाला लागला आहे. रायगड जिल्ह्यात २५ जूनपासून मतदार यादी पुनर्रिक्षण कार्यक्रमाला सुरुवात झाली असून, बैठकांसह प्रशिक्षण देण्याचे काम सुरु करण्यात आले आहे.**

भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार जिल्ह्यात २० ऑगस्टपर्यंत द्वितीय संक्षिप्त पुनर्रिक्षण कार्यक्रम राबविण्यात येणार असून, जिल्ह्यातील अधिकाधिक पात्र नवमतदारांनी आपले नाव मतदार यादीत नोंदवावे. तसेच, हा कार्यक्रम यशस्वी करण्याचे आवाहन जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी किशन जावळे यांनी केले. जिल्हाधिकारीयांच्यासूचनेनुसार, जिल्ह्यात मतदार यादी द्वितीय संक्षिप्त पुनर्रिक्षण कार्यक्रम राबविण्याच्या हालचाली सुरु झाल्या आहेत. उपविभागीय अधिकाऱ्यांनी प्रत्येक विधानसभा मतदारसंघातील मतदान केंद्रस्तरीय अधिकारी यांची बैठक घेण्यात आली आहे.

### २० ऑगस्टला अंतिम यादी प्रसिद्ध होणार

**२५ जुलैला प्रारुप मतदार यादी प्रसिद्ध केली जाणार आहे. त्यानंतर ९ ऑगस्टपर्यंत मतदार यादी संदर्भातील नाव नोंदणी व हरकती स्वीकारल्या जातील. १९ ऑगस्टला हरकती निकाली काढण्यात येतील. त्यानंतर २० ऑगस्टला अंतिम मतदार यादी प्रसिद्ध होईल**

### विशेष मतदार नाव नोंदणी शिबीर

**मतदान यादी अद्ययावत करण्यासाठी विशेष मतदार नाव नोंदणी शनिवार व रविवारी या सुट्टीच्या दिवशी घेण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. त्यासाठी जिल्ह्यातील मतदान केंद्रावर केंद्रस्तरीय अधिकारी यांची नियुक्ती करण्यात आली आहे. त्यामध्ये मतदारांकडून योग्य दर्जाची छायाचित्र प्राप्त करून मतदार यादीत सुधारणा करणे आदी विविध प्रकारची कामे या कालावधीत केली जाणार आहेत.**

**ए.एन.एम.(२वर्षे)/ जी.एन.एम.(३वर्षे) नर्सींग कोर्ससाठी शैक्षणिक वर्ष २०२४-२५ ॲडमिशन सुरु......**

PPiNE
PRABHAKAR PATIL INSTITUTE OF NURSING EDUCATION
DHANVANTARY MEDICAL EDUCATION SOCIETY PEN'S
PEN
ANM-NUR1004/CR-241/04/EDU-1
GNM-NUR1304/CR-242/04/EDU-1

धन्वंतरी मेडिकल एज्युकेशन सोसायटी पेण संचलित
**प्रभाकर पाटील**
**इन्स्टिट्यूट ऑफ नर्सिंग एज्युकेशन**

मान्यताप्राप्त -
- भारतीय परिचर्या परिषद नवी दिल्ली
- महाराष्ट्र परिचर्या परिषद मुंबई
- महाराष्ट्र राज्य शुश्रुषा व पॅरावैद्यक शिक्षण मंडळ मुंबई आणि महाराष्ट्र राज्य

- प्रवेश पात्रता -
१२ वी-आर्टस्/कॉमर्स/सायन्स, एमएच-नर्सींग सीईटी आवश्यक नाही

**प्रवेश संपर्क – ७९७२३२२३७३ / ८७६७६४९००३**

**अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे**

३० जून

१) श्रीम.मंगला मुकुंद फाळके
अलिबाग, ३०-६-१९५१
२)श्री.मिलन अनंत दिघे
कुरूळ, अलिबाग ३०-६-१९५७
३)श्री.सतिश मधुकर देशपांडे
श्रीबाग-२ अलिबाग, ३०-६-१९५८

## कृषीवलच्या वाचकांना आवाहन




अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे. जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.

**संपर्क-**
**८०५५३२५६७८ (बीपीन राठवा)**
**९२२६०५५१५५ (अमित शहानंद)**
**- मुख्य संपादक, कृषीवल**

**आजचे अन्नदाते**
**श्री. मुकेश सोनमल जैन,**
**वाढदिवस, बाजार पेठ अलिबाग**

# एसटी सेवा बंदमुळे प्रवाशांचे हाल

## एआयपीएच्यावतीने अतिरिक्त मुख्य सचिवांना निवेदन

**। खारेपाट । वार्ताहर ।**

**एसटी महामंडळाने रायगड जिल्ह्यातील अनेक एसटी सेवा बंद केल्या आहेत, त्यामुळे प्रवाशांची मोठी गैरसोय होत आहे. महत्त्वाचे म्हणजे, सध्या मुंबई-रेवस जलवाहतूक सेवा पण बंद आहे. पावसाळी जलवाहतूक बंदच्या काळात एस.टी.चे पर्याची पावसाळी वेळापत्रक सुरु होते. दुर्दैवाने अलिबाग तालुक्यातून मुंबई, बोरिवली, ठाणे, नवी मुंबईकडे जाणाऱ्या व येणाऱ्या प्रवाशांची गर्दी वाढत आहे. मात्र, एस.टी. सेवा अपुरी पडत आहे. त्यामुळे प्रवाशांचा प्रक्षोभ वाढत आहे.**

या बाबींचा विचार करुन ऑल इंडिया पॅसेंजर्स असोसिएशनचे अध्यक्ष चंद्रकांत मोकल यांनी राज्याचे परिवहन व बंदरे विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव संजय सेठी यांची असोसिएशनच्या शिष्टमंडळासहीत प्रत्यक्ष भेट घेऊन त्यांना निवेदन सादर केले.



प्रवाशांसाठी अत्यावश्यक असलेल्या पेण आगाराची सकाळी ६.४५ वाजातची मांडवा-ठाणे, रेवस ते कोकणभवन ही सकाळी ७ वाजताची सेवा, रेवस-ठाणे सकाळी ८ वाजताची सेवा, सकाळी १०.१५ वाजताची मांडवा-पेण, मुंबईहून हाशिवरे मार्गे रेवस ही सायंकाळी ६.१५ वाजता सुटणारी सेवा, दुपारी ३.४५ वाजताची मांडवा हाशिवरेमार्गे बोरिवली सेवा या सेवांना असलेला प्रवाशांचा प्रतिसाद पाहता व प्रवाशांची गरज पाहता त्या त्वरित सुरु व्हाव्यात. तसेच, पनवेल-अलिबाग मार्गावर थेट एस.टी. सेवा सुरु आहे. या सेवेला प्रवाशांचा मोठा प्रतिसाद असलेला कार्लेखिंड थांबा द्यावा, कारण कार्लेखिंड परिसरातील २५-३० गावांना थांबा नसल्यामुळे ७ कि.मी. पुढे अलिबागला जाऊन पुन्हा परत यावे लागते, त्यामुळे त्यांची होणारी कुचंबणा थांबवावी, अशी आग्रही मागणी अेआयपीएचे अध्यक्ष चंद्रकांत मोकल यांनी यावेळी अतिरिक्त मुख्य सचिव परिवहन व बंदरे संजय सेठी यांच्यासमोर केली.

याबाबात सहानुभूतीपूर्वक विचार करण्याचे आश्वासन त्यांनी शिष्टमंडळाला दिले व संबंधित अधिकाऱ्यांना योग्य त्या सूचना केल्या. शिष्टमंडळात असोसिएशनचे पदाधिकारी विश्वास मोरे, प्रतिभा कारेकर, उदय सकपाळ आदींचा समोवश होता.

## साईडपट्टी कामाविरोधात रसायनीकरांत नाराजी

**। रसायनी । वार्ताहर ।**

कोन - रसायनी आणि दांड - रसायनी रस्त्याच्या काही रहदारीच्या ठिकाणी काँक्रिटीकरण करुन रस्त्याच्या साईडपट्टीला भराव करुन डांबर टाकली जात आहे. पाऊस जोरात झाल्याने ही डांबर साईडपट्टीवरुन निघून जात आहे. रस्त्यालगत पाणी साचलेल्या जागेवर खडी व डांबर टाकून काम सुरु असल्याने रसायनीकर संताप व्यक्त करीत आहेत. भरपावसात रस्त्याचे काम व साईडपट्टी टिकणार कशी, असा सवाल रसायनीकर करत आहेत.



रसायनी पाताळगंगा औद्योगिक परिसर असल्याने शेकडो अवजड वाहनांची रेलचेल कोन-रसायनी आणि दांड-रसायनी या रस्त्यांवरुन सुरु असते. याअगोदर या रस्त्यांची दयनीय अवस्था झाल्याने रसायनीकरांना खड्ड्यांतून प्रवास करावा लागत होता. यावेळी पत्रकार संघटना, सामाजिक संस्था तसेच सर्वपक्षीयांनी सार्वजनिक बांधकाम खात्याच्या विरोधात आवाज उठविताच स्थानिक लोक प्रतिनिधींनी रस्त्याच्या कामासाठी निधीची पूर्तता केली. सध्या या रस्त्याचे काम अंतिम टप्प्यात असून, पूर्णत्वास होण्याच्या मार्गावर आहे.

# कृषी विभागाच्यावतीने कृषी संजीवनी पंधरवडा

**। पाली । वार्ताहर ।**

स्व. वसंतराव नाईक यांच्या दि.१ जुलै जन्मदिनानिमित्त सुधागड तालुका कृषी विभागाच्यावतीने ङ्गकृषी दिनफ साजरा करण्यात येणार आहे. या पार्श्वभूमीवर सुधागड तालुक्यात कृषी विभागाकडून कृषी संजीवनी पंधरवडा साजरा करण्यात येत आहे.



कृषी संजीवनी पंधरवडा दि.१७ जून ते १ जुलै या कालावधीत साजरा करण्यात येत असून, यामध्ये सुधागड तालुक्यातीलगावातकृषीविभागाच्या विविध योजना, भात लागवडीच्या विविध पद्धती, भातलागवड तंत्रज्ञान, फळबाग लागवड योजना, पीएम किसान योजना, पीक विमा योजना याविषयी कृषी विभागातील कर्मचारी व अधिकारी सखोल मार्गदर्शन करीत आहेत. या संजीवनी पंधरवड्याची सांगता दि.१ जुलै रोजी स्व. वसंतराव नाईक यांच्या जन्मदिनी कृषी दिन म्हणून साजरा करुन करण्यात येणार आहे. यावेळी तालुक्यातील शेतकरी बंधू-भगिनींना कृषी विभागाच्या योजनांचा लाभ घेण्याची आवाहन सुधागड तालुका कृषी अधिकारी एस. के. कोळपे यांच्याकडून करण्यात आले आहे.

# 'रोटरी'च्या अध्यक्षपदी संयोगिता टेमघरे

**। पेण । प्रतिनिधी ।**

रोटरी क्बल ऑफ पेणचा पदग्रहण सोहळा पेण एज्युकेशन सोसायटीच्या सभागृहात पार पडला. यावेळी अध्यक्षपदी रोटेरियन संयोगिता टेमघरे, सचिवपदी मधुबाला निकम, खजिनदारपदी जयेश शहा यांची सन २०२४ साठी निवड झाली.



या पदग्रहण समारंभाकरिता प्रमुख पाहुणे म्हणून रोटरी डिस्ट्रिक्टचे जिल्हा प्रांतपाल रोटेरिशन शीतल शहा, असिस्टंट गव्हर्नर रोटेरियन नितीन कल्यान, रोटेरियन विक्रम जैन हे उपस्थित होते. रोटरी क्बल ऑफ पेणची स्थापना १० जून १९९४ साली झाली होती. आपल्या तीस वर्षांतील सेवेच्या कारकीर्दीत रोटरी क्लब ऑफ पेणने समाजाकरिता विविध स्तुत्य उपक्रम राबविले आहे व समाजकल्याणसाठी हातभार लावला आहे. रोटरीच्या सामाजिक कार्यासाठी सहकार्य करणारे राजू पीचीका, ॲड. मंगेश नेने, डॉ. सोनाली वनगे, डॉ.किशोर देशमुख, विनोद शहा, योगेश जैन यांचा सत्कार करण्यात आला.

नवनिर्वाचित अध्यक्ष रोटेरियन संयोगिता टेमघरे यांनी नवीन वर्षाचा पदभार स्वीकारल्यानंतर आगामी वर्षात आपण सामाजिक कार्यासाठी काय काय करणार आहोत याचा थोडक्यात अहवाल सादर केला. यात दिव्यांग मुलांच्या समस्या व निराधार, वृद्धांसाठी विविध उपक्रम, पर्यावरण जनजागृती व संरक्षण, शैक्षणिक व वैद्यकीय क्षेत्रातील विविध उपक्रम, विद्यार्थ्यांच्या मानसिकतेसाठी आणि व्यसनमुक्ती करिता विविध प्रशिक्षण कार्यक्रम घेण्याचा विचार दर्शविला. या पदग्रहण कार्यक्रमातच दोन नवीन रोटरी कम्युनिटी कॉरप्स स्थापन करण्यात येणार असल्याची घोषणा केली. तसेच, एका गरजू विद्यार्थ्याला शालेय साहित्याचे वाटप याप्रसंगी करण्यात आले.

## कर्जतमध्ये युरिया खताचे वाटप



**। नेरळ । प्रतिनिधी ।**

कर्जत येथील माजी नगरसेवक सुनील गोगटे यांच्या माध्यमातून तालुक्यातील ५५० शेतकऱ्यांना युरिया खताचे वाटप करण्यात आले. खरीप हंगमात शेतकऱ्यांसाठी खत वाटप करण्याचा उपक्रम सुनील गोगटे यांच्या माध्यमातून गेली चार वर्षे आयोजित केला जात आहे. येथील रॉयल गार्डन येथे आयोजित कार्यक्रमाला गणेश भेगडे, सुरेश लाड, पासवान, अविनाश कोळी, वसंत भोईर, किरण ठाकरे, रमेश मुंढे, मंगेश म्हसकर, वसंत महाडिक, राजेश लाड आदी मान्यवर उपस्थित होते. सुनील गोगटे यांच्या माध्यमातून सलग चौथे वर्षे खत वाटप केले असून, यावर्षी कर्जत तालुक्यातील ५५० शेतकऱ्यांना युरिया बॅग यांचे वितरण हे शेतकऱ्यांना करण्यात आले. त्यासाठी तालुक्याच्या सर्व गावातील आणि आदिवासी वाडीमधील शेतकरी खत वाटप कार्यक्रमाला उपस्थित होते.

### जाहीर सूचना

याद्वारे **सूचना** देण्यात येत आहे की, चंद्रकांत धर्माजी म्हात्रे उर्फ चंद्रकांत डी. म्हात्रे यांनी आमच्या अशिलांना येथे खाली लिहिलेल्या परिशिष्टात अधिक विशेषत्वाने वर्णन केलेल्या मालमत्ता ("**सदर मालमत्ता**") विकण्यास, देण्यास आणि हस्तांतरित करण्यास सहमती दर्शवली आहे.

सर्व व्यक्तिं ज्यांना सदर मालमत्ता किंवा त्याच्या कोणत्याही भाग संदर्भात कोणताही दावा जसे की विक्री, देवाणघेवाण, सोडणे, गहाण, ताबा, हमी, भेट, विश्वस्त संस्था, देखभाल, वारसाहक्क, विभाजन, कर्ज, भाडेपट्टी, उप-भाडेपट्टी, असाइनमेंट, भाडेकरार, उप-भाडेकरार, कर्ज फिटेपर्यंत मालमत्ता ताब्यात ठेवण्याचा हक्क, परवाना, वहिवाटीचा हक्क किंवा कोणतेही विश्वस्त संस्थे अंतर्गत फायदेशीर हक्क/ हितसंबंध, प्रिस्क्रीप्शन किंवा प्रिएम्प्शनचा अधिकार किंवा कोणत्याही करार अंतर्गत किंवा इतर प्रवृत्ती किंवा कोणत्याही न्यायालय किंवा ऑथॉरिटीचा हुकूम, आदेश किंवा बक्षीस किंवा अन्यथा ज्या कोणत्याही स्वरुपात असेल तर त्यांनी याद्वारा कृपया लेखीस्वरुपात त्याची सूचना कागदोपत्री पुराव्यासोबत निम्नस्वाक्षरीकारांकडे त्यांचे कार्यालय रेडीमनी मेन्शन, ४३, वीर नरीमन रोड, फोर्ट, मुंबई - ४०० ००१ आणि / किंवा ईमेल kunal.vaidya@kangacompany.com येथे ह्या प्रकाशित झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांच्या आत सूचित करावे अन्यथा सर्व किंवा कोणतेही कथित दावे/आक्षेप, हितसंबंध किंवा मागणी, जर कोणतेही असेल तर ते सोडून देण्यात आले आहेत आणि/किंवा त्याग केले आहेत असे मानले जाईल.

**येथे उपरोक्त उल्लेखित परिशिष्ट**
(सदर मालमत्तेचे वर्णन)

मौजे वैजाली, तालुका अलिबाग, जिल्हा रायगड येथे असलेली कृषी जमीनीचा सर्व तुकडा आणि हिस्सा, ज्याचे एकूण क्षेत्रफळ ७७ आर्स १० चौरस मीटर्स पैकी अंदाजित क्षेत्रफळ २५ आर्स जे गट क्र. १८० चा भाग आहे.

३० जून २०२४ रोजी दिनांकित.

**कांगा आणि कंपनी**
सही/-
कुणाल वैद्य
भागीदार
ॲडव्होकेटस् आणि सॉलिसिटर्स

### जाहीर सूचना

याद्वारे **सूचना** देण्यात येत आहे की, ज्ञानदेव वामन पाटील उर्फ पाटील ज्ञानदेव वामन यांनी आमच्या अशिलांना येथे खाली लिहिलेल्या परिशिष्टात अधिक विशेषत्वाने वर्णन केलेल्या मालमत्ता ("**सदर मालमत्ता**") विकण्यास, देण्यास आणि हस्तांतरित करण्यास सहमती दर्शवली आहे.

सर्व व्यक्तिं ज्यांना सदर मालमत्ते किंवा त्यांच्या कोणत्याही भाग संदर्भात कोणतेही हक्क, शीर्षक, दावा, हितसंबंध किंवा प्रतिपादन जसे की कोणत्याही करार, विक्री, देवाणघेवाण, गहाण, ताबा, भेट, विश्वस्त संस्था, देखभाल, वारसाहक्क, ताबा, भाडेपट्टी, उप-भाडेपट्टी, भाडेतत्त्वाखाली, भाडेकरार, कर्ज फिटेपर्यंत मालमत्ता ताब्यात ठेवण्याचा हक्क, भाग, परवाना, आउटगोइंग्स, वहिवाटीचा हक्क, अडथळा, करार, अट किंवा कोणत्याही न्यायालय किंवा ऑथॉरिटीचा हुकूम, आदेश किंवा बक्षीस किंवा अन्यथा ज्या कोणत्याही स्वरुपात असेल तर त्यांनी याद्वारा कृपया लेखीस्वरुपात त्याची सूचना कागदोपत्री पुराव्यासोबत निम्नस्वाक्षरीकारांकडे त्यांचे कार्यालय रेडीमनी मेन्शन, ४३, वीर नरीमन रोड, फोर्ट, मुंबई - ४०० ००१ आणि / किंवा ईमेल kunal.vaidya@kangacompany.com येथे ह्या प्रकाशित झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांच्या आत सूचित करावे अन्यथा सर्व किंवा कोणतेही कथित दावे/आक्षेप, हितसंबंध किंवा मागणी, जर कोणतेही असेल तर ते सोडून देण्यात आले आहेत आणि/किंवा त्याग केले आहेत असे मानले जाईल.

**येथे उपरोक्त उल्लेखित परिशिष्ट**
(सदर मालमत्तेचे वर्णन)

मौजे वैजाली, तालुका अलिबाग, जिल्हा रायगड येथे असलेली कृषी जमीनीचा सर्व तुकडा आणि हिस्सा ज्याचे गट क्र. १७५/१ क्षेत्रफळ २० आर्स १० चौरस मीटर्स आहे.

३० जून २०२४ रोजी दिनांकित.

**कांगा आणि कंपनी**
सही/-
कुणाल वैद्य
भागीदार
ॲडव्होकेटस् आणि सॉलिसिटर्स

### जाहीर सूचना

याद्वारे **सूचना** देण्यात येत आहे की (१) ज्ञानदेव वामन पाटील उर्फ पाटील ज्ञानदेव वामन आणि (२) सचिन ज्ञानदेव पाटील यांनी आमच्या अशिलांना येथे खाली लिहिलेल्या **परिशिष्टात** अधिक विशेषत्वाने वर्णन केलेल्या मालमत्ता ("**सदर मालमत्ता**") विकण्यास, देण्यास आणि हस्तांतरित करण्यास सहमती दर्शवली आहे.

सर्व व्यक्तिं ज्यांना सदर मालमत्ते किंवा त्याच्या कोणत्याही भाग संदर्भात कोणतेही हक्क, शीर्षक, दावा, हितसंबंध किंवा प्रतिपादन जसे की कोणत्याही करार, विक्री, देवाणघेवाण, गहाण, ताबा, भेट, विश्वस्त संस्था, देखभाल, वारसाहक्क, ताबा, भाडेपट्टी, उप-भाडेपट्टी, भाडेतत्त्वाखाली, भाडेकरार, कर्ज फिटेपर्यंत मालमत्ता ताब्यात ठेवण्याचा हक्क, भाग, परवाना आउटगोइंग्स, वहिवाटीचा हक्क, अडथळा, करार, अट किंवा कोणत्याही न्यायालय किंवा ऑथॉरिटीचा हुकूम, आदेश किंवा बक्षीस किंवा अन्यथा ज्या कोणत्याही स्वरुपात असेल तर त्यांनी याद्वारा कृपया लेखीस्वरुपात त्याची सूचना कागदोपत्री पुराव्या सोबत निम्नस्वाक्षरीकारांकडे त्यांचे कार्यालय रेडीमनी मेन्शन, ४३, वीर नरीमन रोड, फोर्ट, मुंबई - ४०० ००१ आणि / विंवा ईमेल kunal.vaidya@kangacompany.com येथे ह्या प्रकाशित झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांच्या आत सूचित करावे अन्यथा सर्व किंवा कोणतेही कथित दावे/आक्षेप, हितसंबंध किंवा मागणी, जर कोणतेही असेल तर ते सोडून देण्यात आले आहेत आणि/किंवा त्याग केले आहेत असे मानले जाईल.

**येथे उपरोक्त उल्लेखित परिशिष्ट**
(सदर मालमत्तेचे वर्णन)

मौजे वैजाली, तालुका अलिबाग, जिल्हा रायगड येथे असलेली कृषी जमीनीचा सर्व तुकडा आणि हिस्सा ज्याचे गट क्र. १७४ क्षेत्रफळ ९५ आर्स ९० चौरस मीटर्स आहे.

३० जून २०२४ रोजी दिनांकित.

**कांगा आणि कंपनी**
सही/-
कुणाल वैद्य
भागीदार
ॲडव्होकेटस् आणि सॉलिसिटर्स

### जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी मौजे सासवणे, ता. अलिबाग, जि. रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत त्या मिळकतीचे विद्यमान मालक श्री. आनंद जयंत मोरे,रा. सासवणे यांचेकडून कायम मालकी हक्काने विकत घेण्याचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | गट नं. | क्षेत्र (हे. आर) | आकार (रु. पै.) |
|---|---|---|---|
| सासवणे | १०७ | ०-५९-०० | १५.०० |
| | पो. ख. | ०-०१-३० | |
| | | ०-६०-३० | |

पैकी रस्त्यालगत असलेले ० हे. २० आर क्षेत्र ही मिळकत.

सदरची मिळकत ही त्यांचे निर्वेध मालकी हक्काची व प्रत्यक्ष ताबेकब्जा वहिवाटीतील असून ती विकणेचा त्यांस हक्क अधिकार असल्याबाबतचा निर्वाळा विद्यमान मालकांनी आमच्या अशिलांस दिलेला आहे. मात्र तरी देखील वर वर्णन केलेल्या मिळकतीवर अथवा तिचे कोणत्याही भागावर कुणाचाही विक्री, गहाण, दान, भाडेपट्टा, विक्रीचा करार, वारसाहक्क, लिज, लिएन, चार्ज, पोटगी, ताबा, वहिवाट, इजमेंटरी हक्क, या अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क-हितसंबंध असल्यास अथवा अन्य कोणत्याही तऱ्हेने सदर मिळकतीचे विक्री व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी त्यांच्या हरकती अगर तक्रारी ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १४ दिवसांचे आत खाली दिलेल्या आमचे पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यांसहित लेखी स्वरूपात आणून द्याव्यात. मुदतीत कुणाचीही, कोणत्याही प्रकारची तक्रार अथवा हरकत न आल्यास सदरची मिळकत ही विद्यमान मालकांच्या निर्वेध व निजोखमी मालकी हक्कांची आहे व तिचेवर अन्य कुणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही अथवा तसा हक्क असूनही तो त्यांनी विद्यमान मालकांच्या तसेच आमच्या अशिलांच्या लाभांत सोडून दिला आहे, असे गृहित धरून आमचे अशिल व्यवहार पूर्ण करतील व मागाहून मुदतीनंतर आलेली कुणाचीही तक्रार अगर हरकत विचारात घेतली जाणार नाही, हे सर्वांस कळावे.

अलिबाग
तारीख : ३०/६/२०२४

सही/-
**ॲड. गणेश गोविंद पाटील**
अे/१,२, तळमजला,
'श्रुतीसारंग' को. ऑप. हौ. सोसायटी,
युनियन बँकेसमोर, ब्राम्हण आळी,
अलिबाग, रायगड, ४०२ २०१.

### जाहीर नोटीस

अर्ज क. ९६/२०२४

**मे. कार्यकारी दंडाधिकारी सो. माणगांव यांचे न्यायालयात**

श्री. अब्दुल रज्जाक अब्दुल गफूर साखरकर
वय ६३ वर्षे, धंदा शेती.
रा. मु. पो. गोरेगांव, — अर्जदार
ता. माणगांव, जि. रायगड

विरुध्द

१.निबंधक जन्म-मृत्यु व विवाह,
नोंदणी अधिकारी,
ग्रुप ग्रामपंचायत गोरेगांव,
ता. माणगांव, जि. रायगड. — सामनेवाला
२. गटविकास अधिकारी सो.,
पंचायत समिती माणगांव,
ता. माणगांव, जि. रायगड.
३. मा.तहसिलदार साहेब,
ता. माणगांव, जि. रायगड

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

सदरहू अर्जदार श्री. अब्दुल रज्जाक अब्दुल गफूर साखरकर यांचा जन्म मौजे गोरेगांव, ता. माणगांव, जि. रायगड. येथे दि. ०१/०६/१९६१ रोजी राहत्या घरी झाला. त्यांची जन्माची नोंद सामनेवाल्याचे कार्यालय सदरी नसल्यामुळे सामनेवाल्याने तसा दाखला अर्जदार यांना दाखला दि. १९/०४/२०२४ रोजी दिला आहे. त्यामुळे अर्जदार यांनी या न्यायालयामध्ये अर्जदार यांचा जन्म मौजे गोरेगांव, ता. माणगाव, जि. रायगड. येथे दि. ०१/०६/१९६१ रोजी राहत्या घरी झाला असल्याचे घोषित करून मिळणेकरीता कार्यकारी दंडाधिकारी माणगांव यांचे न्यायालयात जन्म व मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ चे कलम १३ (३) अन्वये व तशी नोंद दाखल होऊन दाखला मिळणेकरीता या न्यायालयाचा अर्ज दाखल केला आहे. सदर दाखला देणेस कोणाची कोणत्याही प्रकारची हरकत आहे किंवा कसे हे तपासण्याकरीता सदरची जाहीर नोटीस अर्जदारामार्फत दिली आहे. तरी सदर अर्जास कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्याकरीता १ महिन्याचे मुदतीपर्यंत कागदोपत्री पुराव्यासह मे. न्यायालयात हजर रहावे व आपली हरकत कळवावी. विहीत मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास अर्जदार श्री.अब्दुल रज्जाक अब्दुल गफूर साखरकर यांचा जन्म मौजे गोरेगांव, ता. माणगांव, जि. रायगड. येथे दि. ०१/०६/१९६१ रोजी राहत्या घरी झाला. असे गृहीत धरून आदेश देण्यात येईल.

माणगांव
ता. २४/०६/२०२४

सही /-
**कार्यकारी दंडाधिकारी माणगांव**

### जाहीर सूचना

तमाम जनतेला याद्वारे सूचना देण्यात येते की, आमचे अशील हे या खालील लिखित अनुसूचीमध्ये अधिक स्वरूपात वर्णन केलेल्या मालमत्तेच्या (यापुढे ''मालमत्ता'' असे उल्लेखित) खरेदीसाठी इच्छुक असल्याने आम्ही कार्ल नवझर इराणी (यापुढे ''मालक''असे उल्लेखित) यांचे मालकी हक्क तपासत आहोत.

कोणत्याही व्यक्ती किंवा संस्थेला सदर मालमत्ता किंवा त्यावरील कोणत्याही भागाच्या संदर्भामध्ये/विरुद्ध कोणताही हक्क, मालकी हक्क, हितसंबंध, दावा, मागणी आणि/ किंवा आक्षेप जसे की, विक्री, अदलाबदल, भाडेपट्टा, कुळवहिवाट, परवाना, विश्वस्त, धारणाधिकार, निर्वाह, सुविधाधिकार, वारसाहक्क, ताबा, जप्ती, गहाण, प्रभार, बक्षीस, प्रलंबित वाद, एफ.एस.आय वापर किंवा अन्यकाही दावे असल्यास त्यांनी तसे लिखित सुचनेसह **झुंजारराव आणि कं., अँडव्होकेट आणि सॉलिसिटर्स, ४था मजला, जलाराम ज्योत, जन्मभुमी मार्ग, फोर्ट, मुंबई - ४०० ००१** येथे तसे हक्क, मालकी हक्क, हितसंबंध, दावा, मागणी आणि / किंवा आक्षेपाच्या कागदपत्रांच्या प्रमाणित सत्य प्रतींसह या सूचनेच्या प्रसिद्धीच्या तारखेपासून ७ (सात) दिवसांच्या आत कळविणे आवश्यक आहे, कसूर केल्यास, तसा दावा, मागणी किंवा आक्षेप अस्तित्वात नसल्याचे मानण्यात येईल आणि जरी तसा दावा, मागणी किंवा आक्षेप कायद्यात किंवा अन्यथा अस्तित्वात असल्यास, दावेदारानी तसा दावा, मागणी किंवा आक्षेप रद्द केल्याचे मानण्यात येईल आणि/किंवा तसा दावा, मागणी किंवा आक्षेपाचा कोणताही हक्क त्याग केला असे समजण्यात येईल आणि कोणताही असा दावा, मागणी किंवा आक्षेप आमचे अशिलांवर बंधनकारक असणार नाही आणि आमचे अशील वर नमूद केल्याप्रमाणे सदर मालमत्ते संदर्भात खरेदीव्यवहार करू शकतात.

**अनुसूची**
**(मालमत्तेचे वर्णन)**

नोंदणीकृत जिल्हा व उप-जिल्हा रायगड यांचे कार्यक्षेत्र मधील गाव-मापगांव, तालुका-अलिबाग, जिल्हा-रायगड येथे स्थित भूमापन क्रमांक व उपविभाग १५०, एकूण क्षेत्र ००-३२-९० ( हे.आर.चौ.मी.) आकारणी रु.३.१२/-.

ठिकाण : अलिबाग
दिनांक :३०/०६/२०२४

**झुंजारराव आणि कं. करीता**
**सही/-**
**विक्रांत झुंजारराव**

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने असे कळविणेत येते की, आमचे पक्षकारांनी मौजे-खांडपे ता. कर्जत, जि. रायगड येथील खालील वर्णनाची जमिन मिळकत, सदर मिळकतीचे मालक श्री.संजय शांताराम पेडणेकर यांचेकडुन खालील वर्णनाची मिळकत विकत घेणेचे ठरविले आहे.

| सर्व्हे क्रमांक | हिस्सा क्रमांक | क्षेत्र हे.आर | आकार |
|---|---|---|---|
| ३५ | ६ | ०.२३.०० | ०.२२ |
| ३० | ३ | ०.०९.९० | ०.१४ |

सबब सदर व्यवहारा बाबत कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्यांनी त्यांची हरकत सदरची नोटीस प्रसिध्द झाले पासून १५ दिवसांचे आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे प्रथमदर्शनी लेखी पुराव्यासह हरकत दाखल करावी. वरीलप्रमाणे मुदतीत कोणतीही हरकत दाखल न झाल्यास सदर मिळकत हि निर्वेध व बोजारहीत आहे असे समजून वरील मिळकतीचा व्यवहार पूर्ण केला जाईल. मागाहून येणाऱ्या तक्रारीस आमचे पक्षकार जबाबदार राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.

दिनांक :- २९/०६/२०२४

**ॲड. रूपेश एकनाथ पाटील**
बी.ए.एल.एल.बी.
ओम अपार्टमेंट, गाळा नं
१०,कचेरी रोड, मुद्रे (बु)कर्जत,
ता. कर्जत, जि. रायगड
मो.नं.९०९६०६०४०४

### जाहीर नोटीस

आमचे अशील आवरे/कडापे गावचे शेतकरी संघटनेचे अध्यक्ष यांनी दिलेल्या माहिती व सांगितल्यानुसार तमाम सर्व लोकांस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते कि,

मौजे आवरे व कडापे हद्दीत खाली नमूद केलेल्या व्यक्तींच्या नावाच्या शेत जमिन आहेत. त्या व्यक्तींची नाव खालील प्रमाणे-
१) अब्दुल कादिर म. इब्राहीम भाईजी २) निहा सऊद भाईजी
३) नुएन सऊद भाईजी ४) महम्मद एकराम म. इब्राहीम भाईजी
५) महम्मद मकसूद म. इब्राहीम भाईजी ६) महम्मद दसाद म. इब्राहीम भाईजी
७) मुसदिका अ.सबूर मुकरी ८) मेहमुदा सऊद भाईजी ९) रजिया जलील बक्षी

मौजे आवरे/कडापे गावात बऱ्याच शेतजमिनी ह्या वर नमूद केलेल्या भाईजी कुटुंबाच्या मालकीच्या मिळकती आहेत परंतु सदरच्या मिळकती या आवरे गावाचे ग्रामस्थ/शेतकरी सन १९५७ साला पूर्वी कशीत होते व आहेत. आजही सदर मिळकतींचा ताबा कब्जा या कुलांकडे आहे. भाईजी कुटुंबियां बरोबर या शेतकऱ्यांचे कुळ व मालक असे संबंध होते व आहेत त्यामुळे सदर मिळकतीच्या ७/१२ पत्रकी सदर शेतकऱ्यांच्या नावाची नोंद संरक्षित कुळ म्हणून करण्यात आलेली होती. असे असताना भाईजी कुटुंबीयांनी या जमिनींच्या लोभापोटी कुळांचे हक्क हिरावून घेण्याकरिता महसूल अधिकारी यांना हाताशी धरून सदर ग्रामस्थांना/ कुळांना कोणत्याही प्रकारची नोटीस अगर सूचना न देता सदर मिळकतींच्या ७/१२ सदरी इतर हक्कात संरक्षित कुळ म्हणून असलेली नोंद कमी केली आहे व आता जमीन मालक सदरच्या जमीनी त्रयस्थ व्यक्तिंस विकण्याच्या तयारीत आहेत. परंतु आवरे/ कडापे येथील ग्रामस्थांनी/ शेतकऱ्यांनी या संदर्भात मे. उच्च न्यायालय मुंबई येथे रिटपिटीशन दाखल केले आहे त्याचा नंबर १०२९५/२०१८ असा आहे सदरचे प्रकरण अद्याप न्यायालयामध्ये न्यायप्रविष्ट आहे. त्यामुळे सदरच्या मिळकती कोणीही विकत घेऊ नयेत याउपर देखील सदर जमीनी खरेदी केल्यास खरेदी घेणार यांच्या विरोधात देखील योग्य ती कायदेशीर कारवाई करण्यात येईल व त्याच्या होणाऱ्या खर्चास व परिणामास मौजे आवरे/कडापे येथील ग्रामस्थ जबाबदार राहणार नाहीत, याची नोंद घेण्यात यावी.

पेण
दिनांक २८/०६/२०२४

**प्रल्हाद आत्माराम म्हात्रे**
**( राहणार-उंबर्डे, ता-पेण, रायगड.)**

## वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

**-मुख्य संपादक**

**ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन**
**१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग**
**दागिने-नविन डिझाइन्स**



मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी-सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

**२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.**
**मोबाईल : ९८६०६५८५६५**

**क्लासिफाईड**
*जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी*

- श्री सिद्धीविनायक ज्योतिष सर्व समस्यांचे शीघ्र निवारण, नोकरी धंदा, गृहक्लेश, व्यापारवृद्धी, प्रेमसमस्या, लग्नामधील अडचण फोन नं. ९९६०४५६९८६/८८०६४७९१७३ अलिबाग
- बोअरवेल-विहिरीसाठी मशीनद्वारे अचूक भूजल संशोधन-९२२६७६६१२९
- प्रथम, पुर्नविवाह, व्यंग, सर्वजातीय, आंतरजातीय वेबसाईटसह स्थळांसाठी रोहा गणेश महाकाळ ८८८८९३५७७५
- शुभमूहूर्त विवाह मंडळ अलिबाग शाखेत नोंदणी, ५० शाखा वेबसाईट, नावनोंदणीसाठी -९२२६७६६१२९
- जन्मकुंडली-हस्तरेषा-टॅरोकार्ड-अंकशास्त्र वास्तूशास्त्र, नवग्रह रत्ने या विषयी मार्गदर्शन वेलनेस ज्योतिषालय -९२२६७६६१२९
- मांडवा येथे गाडीवर ड्रायव्हर पाहिजे आहे. मो. ८००७८९३२३२/९४२१९५४३४८
- वाडगाव फाटा येथे कॉटेजमध्ये काम करण्यासाठी जोडपे पाहिजे. मो.९८२२९३८४४४
- अलिबाग शहरात मध्यवर्ती ठिकाणी मेडिकलसाठी ४ ते ५ वर्षे अनुभवी फार्मासिस्ट पाहिजे. ९४२११६३१२४

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१

# कोकणाला उत्तम दर्जाचा महामार्ग द्या

**|| अन्यथा कोकणवासीय रस्त्यावर उतरतील**

**|| मनसेचे वैभव खेडेकर यांचा सरकारला इशारा**

**। महाड । प्रतिनिधी ।**

**कोकणात जाणाऱ्या प्रवाशांना गेली अठरा वर्षांपासून मुंबई गोवा राष्ट्रीय महामार्गाच्या खड्ड्यातूनच प्रवास करावा लगत आहे. त्यातच रायगड व रत्नागिरी जिल्ह्याला जोडणाऱ्या कशेडी बोगद्या मधून मोठ्या प्रमाणावर पाण्याची गळती सुरू झाल्याने या बोगद्याचे काम निकृष्ट दर्जाचे झाल्याने याप्रकरणी ठेकेदार व राष्ट्रीय महामार्ग खात्याच्या अधिकाऱ्यांची खातेनिहाय चौकशी करून गुन्हे दाखल करण्याची मागणी कोकणातील मनसेचे नेते व खेडचे माजी नगराध्यक्ष वैभव खेडेकर यांनी केली आहे.**



रायगड व रत्नागिरी जिल्ह्याला जोडणाऱ्या नातू नगर येथील कशेडी बोगद्याचे काम अद्याप सुरूच आहे. काही महिन्यांपूर्वी या बोगद्यातील वाहतूक सुरु केली होती. मात्र बोगद्याला ऐन पावसाळ्यात मोठ्या प्रमाणावर गळती लागल्याने पाण्याच्या धारा चालू झाल्या आहेत. याबाबत खेडचे माजी नगराध्यक्ष व मनसेचे कोकणचे नेते वैभव खेडेकर यांनी नाराजी व्यक्त केली आहे. कशेडी बोगद्याचे काम निकृष्ट दर्जाचे झाले आहे असे सांगून ज्या पद्धतीने या बोगदात सुरक्षेच्या उपायोजना करावयास पाहिजे होत्या त्या केल्या गेल्या नाहीत, त्यामुळे आज ही परिस्थिती कशेडी बोगदात उद्‌भवल्याचे वैभव खेडेकर यांनी सांगितले.

कोकणातील जनतेच्या माती निकृष्ट दर्जाच्या महामार्ग केला आहे तसेच निकृष्ट दर्जाच्या कशेडी बोगद्याचे काम केले आहे त्याऐवजी चांगल्या पद्धतीचा महामार्ग व व चांगल्या पद्धतीच्या बोगद्याचे काम शासनाने ठेकेदारा मार्फत करून घेतले नाही तर कोकणवासीय रस्त्यावर उतरतील, असा इशारा मनसेचे नेते वैभव खेडेकर यांनी शासनाला व राष्ट्रीय महामार्ग खात्याच्या अभियंत्यांना दिला आहे.

## सामान्यांना प्रीपेड स्मार्ट मीटर नाहीत

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

महावितरणतर्फे स्मार्ट मीटर बसविण्याच्या योजनेत सबस्टेशनमधील सर्व फीडरवर तसेच वितरण ट्रान्सफॉर्मर आणि सर्व सरकारी कार्यालयांमध्ये स्मार्ट मीटर बसविण्यात येत आहेत. तथापि, सर्वसामान्य ग्राहकांना मात्र प्रीपेड स्मार्ट मीटर बसविण्यात येत नाहीत. महावितरणने महाराष्ट्र वद्युत नियामक आयोगाच्या मान्यतेनंतर ऊर्जा मंत्रालय, भारत सरकारच्या सुधारित वितरण क्षेत्र योजनेमध्ये (आरडीएसएस) वाहिन्यांचे विलगीकरण, वितरण हानी कमी करणे, वितरण प्रणालीचे सक्षमीकरण आणि स्मार्ट मिटरिंग यांसारखे कार्यक्रम हाती घेतले आहेत. यामुळे महाराष्ट्रातील ग्राहकांना विश्वासार्ह आणि दर्जेदार वीजपुरवठा होण्यास मदत होईल.

# शाळाबाह्य मुलांची शोधमोहीम सुरू

## म्हसळा शिक्षण विभाग प्रयत्नशील

**। म्हसळा । वार्ताहर ।**

म्हसळा तालुक्यात दि. ५ ते २० जुलै या कालावधीत शाळाबाह्य, अनियमित व स्थलांतरित मुलांना शिक्षणाच्या प्रवाहात आणण्यासाठी म्हसळा शिक्षण विभागाकडून विशेष शोधमोहीम करण्यात येणार आहे

बालकांचा मोफत व सक्तीचा शिक्षण हक्क अधिनियम २००९ राज्यात दि.१ एप्रिल २०१० रोजी लागू करण्यात आलेला आहे या कायद्यानुसार वय वर्ष सहा ते १४ वयोगटातील प्रत्येक बालकास मोफत व सक्तीचे शिक्षण घेण्याचा हक्क प्राप्त झाला आहे,

त्यामुळे सदर बालकांना दर्जेदार शिक्षण मिळण्याचा हक्क प्राप्त आहे. अशा ६ ते १४ वयोगटातील एक महिन्यापेक्षा अधिक काळ सातत्याने अनुपस्थित राहात असतील अशा बालकांना शाळाबाह्य बालक म्हणावे अशी व्याख्या शिक्षण हक्क अधिनियम नुसार केली आहे.



या मोहिमेनुसार घरोघरी जाऊन शाळाबाह्य मुलांचे सर्वेक्षण करण्याव्यतिरिक्त बस स्थानक, रेल्वे स्थानक, बाजारपेठ, वीटभट्टी, दगडखाणी, स्थलांतर कुटुंबे, तालुक्यातील सर्व खेडी, गाव, वाडी, वस्त्या, तांडे- पाडे आधी ठिकाणी जाऊन विद्यार्थ्यांच्या नोंदी करण्यात स्पष्ट करण्यात आले आहे. या कालावधीत नागरिकांनी सहकार्य करावे, असे आवाहन शिक्षण विभागाचे गटशिक्षण अधिकारी संतोष दौंड, विस्तार अधिकारी अरविंद मोरे व गटसमन्वयक सलाम कौचाली यांनी केले आहे.

# मुरूडमध्ये कालेटी मासळीचा बाजार

**। मुरूड जंजिरा । वार्ताहर ।**

पावसाळ्यात समुद्रातील मासेमारी बंद असल्याने मुरुडच्या मासळी बाजारामध्ये सर्व प्रकारची मासळी उपलब्ध होत नाही. सध्या मुरूड मार्केटमध्ये निवड, शेलबेल, कोलंबी, कालेटी, बोईट, शिंगट्या, पालू अशी छोटी मासळी दिसून येत असली तरी यामध्ये कालेटी मासळीचे प्रमाण आधिक दिसून येत आहे. आवडती मोठी मासळी भरपूर दिवसांपासून मिळत नसल्याने मासळी खवय्यांची चांगलीच गोची झाल्याचे दिसून येत आहे. सर्वसामान्य मासळीचे भावदेखील वधारले असून, अधूनमधून जिताडा मासळीदेखील दिसून येते.



मोठी मासळी नसल्याने खवय्यांची नाराज

सर्वच खवय्यांना मटण, चिकन आवडतेच असे नसून, त्याकडे पर्याय म्हणून ते स्वीकारतात. बाहेरगावाहून पाहुणे मुरुडला आले की, पोटात गोळाच येतो. मासळीची फर्माईश केली जाते. प्रत्यक्षात पावसाळ्यात बंदीमुळे मासळीचे मोठी टंचाई असते. मुरूडला जाणे म्हणजे ताजी मासळी खाणे अशी पाहुण्यांची अपेक्षा असते. प्रत्यक्षात सर्वच अपेक्षा पूर्ण होऊ शकत नाहीत. अशा वेळी खाडीपट्यात पेरा, बोक्षी, डोल अशा विविध पद्धतीच्या जाळीने पकडलेल्या मासळीवरच मच्छिमारांची भिस्त असते. काळोख्या रात्री खाडीत चिंबोऱ्या पकडण्यासाठी कोळी युवक जात असतात. एकदरा खाडीत कालव काढण्यासाठीदेखील महिला उतरतात. महिलांची अधूनमधून अशी लगबग ओहोटी लागल्यावर दिसून येते. किमान तात्पुरता घरखर्च यातून ओढाताण करीत भागविता येऊ शकतो, शिवाय खवय्यांनादेखील काही प्रमाणात आधार होतो, असे कोळी युवक आणि महिलांनी सांगितले.

## वाहतूक पोलिसाचे अपघाती निधन

**। पनवेल । वार्ताहर ।**

शुक्रवारी सकाळी साडेदहा वाजण्याच्या सुमारास कळंबोली वाहतूक शाखेतील पोलीस शिपाई अरुण शामराव कर्ले (मेजर) एक्स सर्विस मॅन, रा. आदई, नवीन पनवेल यांचे अपघाती निधन झाले.



अरुण कर्ले हे साप्ताहिक सुट्टीवर असताना ते पत्नीसह कामानिमित्त मोटारसायकलीने टेंभोडे या ठिकाणी जात होते. दरम्यान, एका डंपरची त्यांच्या दुचाकीला ठोकर लागून अपघात झाला. यामध्ये ते जखमी झाल्याने त्यांना कळंबोलीतील एमजीएम हॉस्पिटलमध्ये दाखल केले. दरम्यान, डॉक्टरांनी तपासून त्यांना मृत घोषित केले. याप्रकरणी डंपर चालकाला पोलिसांनी ताब्यात घेतले आहे.

# नोकरी एक संधी म्हणून पाहा

## किशोर जैन यांचे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन

**। नागोठणे । वार्ताहर ।**

शिक्षण घेऊनही तरूण-तरुणींना नोकरीसाठी वणवण करावी लागते. मात्र, तंत्रशिक्षण घेतल्यानंतर नोकरीच्या संधी चालून येत असतात. अशीच एक संधी खोपोली येथील गार्गी हुटन्स अल्बर्टस्‌ या कंपनीने नागोठणे आयटीआयमधील विद्यार्थ्यांना दिली आहे. त्यामुळे मिळालेल्या नोकरीच्या वेतनाकडे न पाहता, ती एक संधी म्हणून पाहा, असे मार्गदर्शन नागोठण्यातील भारतीय एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष व शिवसेना जिल्हा सहसंपर्क प्रमुख किशोर जैन यांनी नागोठणे आयटीआयमधील निवड झालेल्या विद्यार्थ्यांना केले.



नागोठणे येथील औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत बुधवारी (दि.२६) परीक्षापूर्व घेण्यात आलेल्या मुलाखतीत एओसीपी या ट्रेडचे ११ विद्यार्थ्यांची खोपोली येथील कंपनीसाठी शिकाऊ कामगार (अ‍ॅप्रेंटिस) म्हणून निवड झाली. त्यावेळी या विद्यार्थ्यांना किशोर जैन यांच्या हस्ते नियुक्ती पत्र देण्यात आली. त्यावेळी बोलताना जैन यांनी विद्यार्थ्यांना अनमोल व दिशादर्शक असे मार्गदर्शन केले. याच वेळी पर्यावरणाचा संदेश वृद्धिंगत करीत यावेळी वृक्षारोपणही करण्यात आले.

नागोठणे औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत प्रा. व्ही.आर. पाटील यांच्या संकल्पनेतून संपन्न झालेल्या या नियुक्तीपत्रे देण्याच्या कार्यक्रमाला खोपोली येथील गार्गी हुटन्स अल्बर्टस्‌ या कंपनीचे एच.आर. विभागाचे प्रमुख राजेश बागवे, प्रॉडक्शन मॅनेजर सुहास क्षीरसागर, औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचे गटनिदेशक एस.एस.भगत, महाड आय.टी.आय. मधील कनिष्ठ प्रशिक्षणार्थी सल्लागार निलेश नरे, एओसीपीचे गटनिदेशक एस.डी. बाईत, विजतंत्रीचे गटनिदेशक पी.पी. पाटील, एम.एम.सी.पी. चे गटनिदेशक एन.जे. वारे, महाड आयटीआयमधील एओसीपीचे गटनिदेशक एच.ए. मुंडले आदींसह इतर गटनिदेशक व विद्यार्थी यावेळी बहुसंख्येने उपस्थित होते.

# साप्ताहिक राशिभविष्य दि. ३० जून ते ०६ जुलै २०२४

**ज्योतिषी : मिलिंद पाटील, सारळ-अलिबाग**

**मोबा.९४०४७९१७९८**

## पैशाची आवक वाढेल

**मेष :** हा सप्ताह मेष राशीधारकांनी बिनभरवशाच्या व्यक्तीवर अवलंबून राहू नका. कामाच्या ठिकाणी वेळेला महत्त्व द्या. सुधारित घटनांचाक्रम नीट लावून घ्या. लेखनकार्याची आवड निर्माण होईल. कामानिमित्त वाढणारा संवाद तुमच्या वक्तृत्वाची दाद देईल. कर्जबाजारीपणा कमी होईल. आर्थिक साहाय्य उत्तम राहील. सामूहिक गोष्टींसाठी ठरवलेले नियोजन उत्तम जमेल. स्थावर मालमत्तेचे नियोजन करताना कागदपत्रांची नीट तपासणी करा. आपल्याकडे यणाऱ्या पैशांची आवक वाढणार आहे, मात्र खर्चावर नियंत्रण ठेवणे भाग आहे, आपल्या मनाप्रमाणे कामे सुरळीत होणार आहेत. घरासाठी खर्च होईल. जागा जमीन यांचा व्यवहार करत असाल तर फायदा होईल. मोठी पार्टी चालून येईल. थोडे कामाच्या पाठी लागा. यश मिळू शकेल. या ग्रहस्थितीमध्ये असणारा योग उत्तम राहील. अवतीभवतीचे चित्र मनासारखे असेल. **महिलावर्ग** - आपल्या नियोजनात अचूकपणा असेल तर कर्जफेड उत्तम प्रकारे कराल. सामाजिक क्षेत्रात काही चांगल्या घटनांमुळे आनंद वाढता राहील. वैवाहिक जीवनात मनासारखे वातावरण राहील. आहारावरील नियंत्रण सोडू नका. प्रकृती जपा. **शुभ दिनांक** -२,३.

## कुटुंबाची काळजी घ्या

**वृषभ :** हा सप्ताह वृषभ राशीसाठी लोक तुमच्याबाबतीत काय विचार करतात त्याची चिंता करू नका. जर तुम्ही योग्य असाल, तर तुमचे कुणीच काहीच बिघडवू शकत नाही. शारीरिक ताकद अजमावून पाहू नका. नंतर संधी मिळणार आहे, फक्त थोडा संयम ठेवा. वयात आलेल्यांनी इतरांसारख लग्न म्हणजे भांडणं आणि सेक्स, असा वाईट विचार करू नका. संगतीचा परिणाम अधोगतीत तर होणार नाही ना, हे पाहणे गरजेचे ठरेल. आर्थिक व्यवहारात प्रत्येक पाऊल जपून टाकणे महत्त्वाचे ठरणार आहे. आपण खोटे बोलण्यापासून आणि खोटे बोलणाऱ्यांपासून लांब राहणे आपल्या भविष्यासाठी चांगले आहे. या कालावधीत कौटुंबिक कलह निर्माण करू नका. व्यवसायात जम बसेपर्यंत घाई करू नका. उधारीचे व्यवहार सध्या बंद ठेवा. रोख स्वरूपात असणारी गुंतवणूक फायदा मिळवणारी असेल. **महिलांना-** भावंडांची जबाबदारी पार पाडावी लागेल. सांस्कृतिक कार्यक्रमाची गोडी वाढेल. बारीकसारीक दुखण्याचा बाऊ करणे टाळा. संसर्गजन्य आजारापासून तब्बेत सांभाळा कौटुंबिकदृष्ट्या शुभ गोष्टींचा ओघ राहील. स्वतःचे आरोग्यतंत्र सांभाळणे आवश्यक ठरेल. **शुभ दिनांक-** ४, ५.

## वेळेचा सदुपयोग करा

**मिथुन :** हा सप्ताह आपले ग्रहमान पाहता मिथुन राशीसाठी आज मात्र सगळं शांत आणि प्रसन्न असेल. आपल्या गोष्टींना महत्त्व देण्यासाठी आज तुम्ही मनातील गोष्टी बोलू शकतात. माझा तुम्हाला सल्ला राहील की, असे करू नका. आयुष्याला गृहित धरून वागू नका, जीवनात योग्य काळजी घेणे हे एक कसब आहे, हे लक्षात असू द्या. भविष्यात जर तुम्हाला आर्थिक रूपात मजबूत बनायचे आहे, तर आजपासूनच धन बचत करा. आपल्या जीवनसाथीच्या आरोग्याची काळजी करावी लागेल आणि वैद्यकीय मदतीची गरज भासेल. तुमच्या स्वप्नातील राजकुमारीशी आज तुमची भेट झाल्यामुळे तुमचा आनंद गगनात मावणार नाही, तुमचे हृदय धडधडेल. जर तुमच्या व्यस्त दिनचर्येचा नंतरही आपल्यासाठी वेळ मिळत आहे तर, तुम्ही या वेळेचा सदुपयोग करणे शिकले पाहिजे. असे करून आपल्या भविष्याला तुम्ही सुधारू शकतात. तुम्ही तुमच्या जोडीदाराने केलेल्या प्रेमाच्या वर्षावामुळे आयुष्यातील सगळे कष्ट विसरून जाल. **महिलांना-** महिलावर्गाला सासरवाडीकडून काही शुभसंकेत मिळतील. घरातील वृद्ध व्यक्तींच्या तब्येतीत सुधारणा होईल. योग साधनेला महत्त्व द्या. **शुभ दिनांक-** ३०, ०६.

## घाईगडबडीत निर्णय टाळा

**कर्क :** हा सप्ताह कर्क राशीधारकाने प्रेम, आशा, विश्वास, सद्‌भावना, आशावादी आणि निष्ठा अशा सकारात्मक भावना स्वीकारण्यासाठी तुमच्या मनाला उद्युक्त करा. एकदा का अशा भावनांनी तुमच्या मनाचा ताबा घेतला की, कोणत्याही परिस्थितीत तुमचे मन आपसूकपणे सकारात्मक विचार करेल. तुमच्याजवळ आज पैसा ही पर्याप्त असेल आणि यासोबतच मनात शांती असेल. कुटुंबातील सदस्यांसोबत संमेलन, एकत्रित कार्यक्रम केल्याने प्रत्येकाचा मूड चांगला बनेल. जे लोक आत्तापर्यंत सिंगल आहे त्यांची भेट आज कुठल्या खास व्यक्तीसोबत होण्याची शक्यता आहे. परंतु, गोष्टीला पुढे वाढवण्याच्या आधी हे नक्कीच जाणून घ्या की, ती व्यक्ती कुणासोबत नात्यामध्ये नसावी. उतावीळपणे कोणताही निर्णय घेऊ नका, अन्यथा त्यामुळे आयुष्यात नंतर पश्चाताप करावा लागेल. **महिलांना-** महिलावर्गाने भावंडांविषयी किंतु परंतु मनात ठेवू नका. घरगुती वातावरण आनंदीमय राहील. सांस्कृतिक कार्यक्रमांना तुमचा प्रतिसाद राहील. आध्यात्मिक जीवनात दिव्य अनुभूती येईल. तब्येतीत सुधारणा होईल. **शुभ दिनांक** - २, ३.

## उधारी वसूल होईल

**सिंह :** हा सप्ताह सिंह राशीसाठी समाधानकारक असणार आहे, संपत्तीविषयक प्रश्न आपल्या घरातून हळूहळू सुटू लागतील. घरातील विरोधकही आपल्याशी याबाबत बोलण्यास तयार होतील, त्यामुळे यावेळेचा सदुपयोग करा. आपली उधारी आता वसूल होणार आहे. त्याचे टेंशन घेऊ नका. पुरेसा पैसा हाती येईल. सप्ताहाची सुरुवात ग्रहांची अनुकूलता असली तरीसुद्धा धाडसी प्रयोग टाळा. व्यावसायिक क्षेत्रात स्वतःच्या कौशल्याचा वेगळा ठसा उमटवता येईल. वाढणाऱ्या कार्यशक्तीतून सहज मार्ग स्वीकारा. दुहेरी वाटेवरून आपली वाटचाल घसरू देऊ नका. जुन्या गोष्टी विसरणे हिताचे राहील. नोकरदार व्यक्तीला मिळणारी बढती लांबणीवर जाईल. ज्येष्ठांचा पाठिंबा असला तरी थांबावे लागेल. सध्या कोणालाही दुखवू नका. ठरवलेले काम करून घेण्याचा प्रयत्न करा. योग्य व अचूक नियोजन केल्यास यशाची खात्री मिळेल. **महिलांना-** महिलावर्गाने पैशाच्या बाबतीत अनोळखी व्यक्तीवर विश्वास ठेवू नका. मैत्रीच्या नात्यात व्यक्तिगत स्वार्थ साधू नका. सामाजिक कार्यात आपला सहभाग मर्यादित ठेवा. आपल्या वैवाहिक जोडीदाराची मानसिकता हट्टी स्वरूपाची राहील. **शुभदिनांक-** ०१,०४

## नोकरीच्या संधी चालून येतील

**कन्या :** हा सप्ताह ग्रहमान पाहता कन्या राशीसाठी आपण आठवड्याच्या उत्तरार्धासाठी उल्हासित करणाऱ्या आणि मनोरंजनाच्या कार्यक्रमाची व्यवस्था कराल. प्रेमातील असीम आनंद अनुभवण्यासाठी कोणाचा तरी शोध घ्याल. मदतीसाठी तुमच्याकडे पाहणाऱ्या लोकांना तुम्ही मदत कराल. कालावधी उत्तम आहे. या दिवसांत तुमचा प्रियकर, जोडीदार तुमच्या कुठल्यातरी गोष्टीवर खूप आणि मनमोकळा हसेल. नोकरीच्या नव्या संधी चालून येतील. उद्योगात चांगला लाभ होईल. नवा उद्योग सुरू करण्यासाठी हालचाल कराल. या कालवधीत आपल्या मनातील विचारांना पूर्णत्व देण्याच्या दृष्टीने हालचाल केली तर आपणाला सहज यश मिळेल. कुटुंबातील वयोवृद्ध व्यक्तींच्या तब्येतीची काळजी घेणे हिताचे राहील. आपण वाहन चालवत असाल तर काळजी घेऊन ते चालवा. धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांची आवड राहील. खाण्यापिण्यातील अतिरेक टाळा. **महिलावर्गाने**- कुटुंबातील सर्व सदस्यांना जपण्याचा प्रयत्न करा. मानसिक एकाग्रता वाढवून अध्यात्मात मन रमवा. आरोग्य प्रश्नात वेळीच लक्ष घाला. घरात मोठी खरेदी करू शकाल. घरात पाहुणे आले तरी आपली धावपळ होऊन देऊ नका. **शुभदिनांक-** ०२,०३

## लाभदायक सप्ताह

**तुळ :** हा सप्ताह तुळ राशीसाठी सगळ्या गोष्टी घेण्यासाठी तुमचे मन सज्ज राहील. आणखी पैसा कमावण्यासाठी तुमच्याजवळील नावीन्यपूर्ण संकल्पनांचा वापर करा. हा आठवडा कामाचा ताण कमी असेल, त्यामुळे तुम्ही कुटुंबासोबत चांगला वेळ घालवू शकाल. प्रेमिक एखाद्या सहलीच्या ठिकाणी जाऊन त्यांच्या प्रेमीजीवनात आनंद आणतील. काम लवकर पूर्ण करून लवकर घरी या. हा कालावधीत तुमच्यासाठी उत्तम राहील. यामुळे तुमच्या कुटुंबातील लोकांनाही आनंद मिळेल आणि तुम्हाला ताजेतवाने वाटेल. तुमचा/तुमची जोडीदार तुम्हाला जाणवून देईल की पृथ्वीवरच खरा स्वर्ग आहे. आपल्या घरातील कुणी सदस्य या कालावधीत तुमच्याशी प्रेमाने जोडलेली काही समस्या शेअर करू शकतो. तुम्ही त्यांना योग्य सल्ला दिला पाहिजे. तुम्ही ऊर्जेने भारलेले असाल, त्यामुळे तुम्ही जे काही कराल त्यासाठी तुम्हाला नेहमीपेक्षा निम्माच वेळ लागेल. **महिलांना-** हा कालावधी तुमच्यासाठी खूपच लाभदायक आणि यश मिळवून देणारा ठरेल. तुमच्या वैवाहिक आयुष्यातील प्रियाराधन, पाठलाग, लाडीगोडी या सगळ्याच्या आठवणी जागवून तुम्ही ताजेतवाने व्हाल. **शुभदिनांक-** ०४,०५.

## व्यवसायात धनलाभाचे योग

**वृश्चिक :** हा सप्ताह वृश्चिक राशीसाठी आनंदी करणारा असेल, व्यवसायातील प्रलंबित कामे पूर्ण होतील. नोकरीत प्रगती होईल, पदोन्नती मिळेल. या आठवड्यात व्यवसायात चांगले यश मिळून धनलाभ होईल. आठवड्यात मंगळ आणि गुरू हे तुमचा आत्मविश्वास वाढवतील. व्यवसात चांगले यश मिळेल आणि मोठा धनलाभ होण्याची शक्यता आहे. या आठवड्यात नोकरीच्या नव्या संधी उपलब्ध होतील. गरीबांना अन्न दान करा. मित्रांच्या मदतीने रखडलेलं काम पूर्ण होईल. बुधवारनंतर उत्पन्नाचे नवे स्त्रोत तयार होतील. शनिवारी काळ्या रंगाचे वस्त्र दान करा. नोकरी बदलण्याचा विचार मनात येईल. पण कृती करू नका, बुधवार आणि शनिवारी तुमच्या योजना, प्रकल्प यशस्वी होण्याच्या दिशेने मार्गस्थ होतील. संपत्ती मिळण्याच्या मार्गावर येणारे अडथळे दूर होतील. गरीबांना अन्न दान करा. वडिलधाऱ्यांचे आशीर्वाद घ्या. आरोग्य निरोगी राहील. **महिलांना-** मुलांचे कर्तृत्व तुमच्या डोळ्यांचे पारणे फेडेल. आपल्यासोबत आजूबाजूच्या लोकांचा सहभाग आपल्याला प्रेरणादायी असेल. घराची डागडुजी करून घ्याल. मानसिक व शारीरिक स्वास्थ्य चांगले राहील. **शुभदिनांक-** ०३,०६.

## आरोग्याची काळजी घ्या

**धनु :** धनु राशीसाठी या आठवड्यात आपल्याला आरोग्याबद्दल खूप जागरूक राहावे लागेल. हा आठवडा तुमच्यासाठी शुभ संधी उपलब्ध करुन देईल. आठवड्याचे पहिले दोन दिवस तुम्हाला लाभदायक ठरतील. दररोज योग आणि ध्यान करत राहा. या राशीधारकांना व्यवसायात चांगले यश मिळेल. वरिष्ठांच्या सहकार्याने हाती घेतलेलं काम वेळेत पूर्ण होईल. मित्रांची साथ मिळाल्याने नवा उद्योग सुरू करण्याच्या दिशेने पाऊल टाकाल. आरोग्याची काळजी घ्या. तुमचा आत्मविश्वास खूपच वाढेल. नोकरीत चांगले काम केल्याने वरिष्ठांकडून आणखी जबाबदारी देण्यात येईल. नोकरीत प्रगती होईल. आठवड्याच्या शेवटी कालावधी व्यवसायासाठी लाभदायक असेल. रखडलेली कामे पूर्ण होतील. नवीन काम हाती घ्याल. **महिलांना-** आर्थिक परिस्थिती अधिक चांगली करण्यासाठी तुम्ही प्रयत्नशील व्हाल. या आठवड्यात नोकरीशी संबंधित एखादा मोठा निर्णय घ्याल. या आठवड्यात व्यवसायात चांगली वाढ होईल. अन्नदान करा. जागरणाचा त्रास होऊ शकतो. आपल्या नात्यातील सलोखा वाढता राहील. **शुभदिनांक-** ३०, ०१.

## बोलण्यावर नियंत्रण ठेवा

**मकर :** हा सप्ताह मकर राशीसाठी वेगळा ठरू शकतो. ग्रहमान बऱ्यापैकी असले तरी आपल्या योग्य प्रयत्नांनी आपण यशाची वाटचाल करू शकाल. नोकरदारांना दिलासा मिळेल. वरिष्ठांची मर्जी सांभाळता येईल. कामकाजात स्वतःला झोकून द्या. सरकारी नियमांचे पालन करा. घरगुती कामांना विशेषतः घरसजावटीच्या कामांना पुढे ढकलणे योग्य राहील. आर्थिक व्यवहारात प्रगती कराल. आपल्या बोलण्यावर मात्र योग्य नियंत्रण ठेवणे हितकारक राहील. आर्थिक बाजू ठीक राहील. रविवारी आणि मंगळवारी तुमच्या कार्याचा विस्तार होईल. आत्मविश्वास वाढेल. या आठवड्यात सकारात्मक बदल जाणवेल. नव्या नोकरीची संधी चालून येईल. मंगळवारनंतर धनलाभ होण्याची दाट शक्यता आहे. विद्यार्थ्यांच्या अभ्यासात प्रगती दिसेल. **महिलांना-** आपल्या स्वतःच्या किंवा एखाद्याच्या उपचारांवर पैसे खर्च करावे लागतील. महिलावर्गाचे दिवस आनंदात जाणार आहेत. प्रेमप्रकरणापासून लांब राहावे. पतीराजांच्या तब्येतीची विशेष काळजी घ्यावी, त्यांना व्यसनांपासून लांब ठेवावे. माहेरची माणसे घरी येतील, त्यामुळे घरात आनंदाचे वातावरण असेल. **शुभदिनांक-** ०२,०४

## कलागुणांना वाव मिळेल

**कुंभ :** या सप्ताहात चालू कालावधीत नोकरदारवर्गास आपली बदली झाल्याची खात्री होईल आणि या स्थलांतरणामुळे आपण आपल्या नियमित जागेपासून बरेच दूर जाऊ शकता ज्यामुळे आपल्याला काही काळ आपल्या कुटुंबापासून दूर जावे लागू शकते. घरातील नातेसंबंधातील कोणतेही अंतर टाळण्यासाठी आपण आपल्या वतीने प्रयत्न केले पाहिजेत आणि वेळोवेळी कुटुंबास चांगली भेट दिली पाहिजे. विविध प्रकारची आव्हाने आपणासमोर येऊ शकतात, त्यांना योजनाबद्ध पद्धतीने सामोरे जा व आपली बाजू सावरण्याचा प्रयत्न करा. कौटुंबिक गोष्टींना प्राधान्य द्या व घरातील मंडळींना खूश करण्याचा कल ठेवा. सरकारी नियम व कायदा कटाक्षाने पाळा. आप्तेष्टांशी सामंजस्याने वागावे. कलाक्षेत्राला चांगले प्रोत्साहन मिळेल. महिलांच्या अंगभूत गुणांना वाव मिळेल. नोकरदारांना दिलासा मिळेल. बौद्धिक क्षेत्राला प्रतिसाद मिळेल. **महिलांना**- प्रकृतीस्वास्थ्य जपा, खाण्यापिण्याची पथ्ये पाळा. जोडीदाराची साथ मिळेल. विशेषतः पोटासंबंधीच्या तक्रारींकडे अधिक लक्ष द्या. कौटुंबिक गोष्टींना प्राधान्य द्या. जोडीदाराची साथ मिळेल. **शुभदिनांक-** ०३,०६.

## प्रलंबित कामे मार्गी लागतील

**मीन :** हा सप्ताह मीन राशीसाठी थोड्या वेगळ्या पद्धतीने जाणार आहे. आपण उत्साहित असाल, प्रत्येक कार्याला सामोरे जाऊन सामना कराल, जेणेकरून यश मिळण्याची शक्यतादेखील वाढेल. आपल्याला कुटुंबातील वडीलधाऱ्या व्यक्तीपासून तसेच समाजातील सन्माननीय व्यक्तींकडून आपल्याला सन्मान मिळेल. आपण त्यांना उतराई व्हाल आणि त्यांच्यासाठी तुम्ही खूप चांगले कार्य कराल, यामुळे उलट तुमच्या सन्मानात वाढ होणार आहे. अचानक तुमची प्रगती होईल. कामामध्ये जास्त व्यस्त राहिल्याने आपल्याला स्वतःसाठी वेळ काढणे जवळजवळ अशक्य होईल. तथापि, आपण स्वत:साठीदेखील थोडा वेळ घालवला पाहिजे, जेणेकरून आपल्याला आराम मिळेल. यावेळी आपल्या दीर्घकाळाच्या इच्छा पूर्ण होतील, ज्यामुळे आपण एका वेगळ्या आत्मविश्वासाने परिपूर्ण व्हाल आणि हा आत्मविश्वास आपल्याला पुढे जाण्याचा मार्ग दर्शवेल. **महिलांना-** आपल्या मार्गाने येणारी कोणतीही संधी हातांनी जाऊ देऊ नका, जेणेकरून या दरम्यान आपल्यासाठी प्रगतीची कोणतीही संधी सुटणार नाही. थोडा व्यायाम करा, जेणेकरून कोणत्याही शारीरिक समस्या टाळता येतील. **शुभदिनांक**- ०४,०५

मोहोर

> लोकसभा निवडणुकीच्या निकालाने महाराष्ट्राच्या वाट्याला मात्र, काय आले याची चर्चा असताना सात खासदार निवडून आणणाऱ्या शिंदेंना किती मंत्रीपदे देणार तसेच अजितदादांना फाटाफूटीच्या अध्यायासाठी काय मिळणार याची प्रतिक्षा किती वेळ करावी लागणार? याची आहे. आगामी विधानसभा निवडणुकांच्या जागा? याबाबत भाजपा आणि फोडफोडीने भंग झालेल्या मित्रपक्षांचा घोषणा स्पष्ट होऊला लागल्या आहेत. अल्पस्वल्प झालेल्या काळासाठी राज्यमंत्रीमंडळाचा विस्तार होऊन आपल्याला मंत्री बनता येईल अशी अपेक्षा आमदारांनी सोडली आहे. आपल्याला उमेदवारी करतांना दिसत आहे. छोटा भाऊ, मोठा भाऊ, अशा भाऊगर्दीत, मित्रपक्षांच्या यारान्यात आपल्याला आमदार कसे होता येईल याकडे आता विद्यमान आणि होतकरु आमदारांचे लक्ष आहे. सध्यातरी राज्य सरकार आणि नवीन केंद्रीय सरकार आचार विचारांच्या सकारात्मक कामगिरीकडे लक्ष देत आहे.



# केंद्रीयमंत्रिमंडळ आणि महाराष्ट्राची प्रतीक्षा



आचार-विचार

डॉ. विलास पवार

लोकसभा निवडणुकीचा, निकाल लागला, राष्ट्रीय लोकशाही आघाडीचे अर्थातच 'एनडीए' सरकार स्थापन झाले. पंतप्रधान नरेंद्र मोदी पर्व-३ सुरुवात झाली आहे. मंत्रीमंडळाचाही शपथविधी पार पडलेला आहे. पंतप्रधान मोदी 'जी-७' राष्ट्रांच्या बैठकीला इटलीला जाण्याचा कार्यक्रम पार पाडला. मोदींच्या परदेशवारीची सुरुवात इटलीने करावी हा योगायोग आहे की मोदींनी इटालियन कॉंग्रेस म्हणून केलेल्या हेटाळणीचे परिमार्जन आहे. ह्याच खरंतर संशोधन करायला हवे आहे. संशोधन तर आता अनेक विषयांवर होत आहे. घडलेल्या घटना, आलेला निवडणुकीचा निकाल यावर मुल्यमापन, निष्कर्ष निघत आहेत. राष्ट्रीय स्तरावर भाजपासारख्या पक्षांकडून अहवाल सुद्धा जमा होतील. त्या अहवालावर सुद्धा कदाचित संशोधन होईल. पराभवाची कारणमिमांसा होईल. या पराभवाचे खापर कोणाच्यातरी डोक्यावर फोडले सुद्धा जाईल. याची यथोचित प्रसिद्धी सुद्धा केली जाईल. पण जनता जनार्दन हे सुद्धा बरोबर समजून घेईल. प्रश्न फक्त शिल्लक राहिल तो पराभवाचा काथ्याकूट करण्याचा.

सध्यातरी भाजपा राजकारण करण्याच्या स्थितीत म्हणजे तोडाफोडीच्या राजकारणात सहभागी होईल असे दिसत नाही. किंबहुना तोडाफोडीच्या राजकारणांत भाजपाला न्याय मिळाला याचे मुक्तचिंतन मात्र निश्चितच केले जात असेल, कूटनिती राजकारण यांनी उरली सुरलेली काँग्रेस संपवून टाकू असा दावा भरणाऱ्या भाजपाने आपल्याच राजकारणाने नुसतीच संजीवनी दिली नाही तर स्वत:च काँग्रेसला तुल्यबळ केले आहे. देशात जवळपास सर्वच राज्यात भाजपाचे सरकार असावे. विरोधात असलेल्यांना नेस्तनाबूत करण्याचे मनसुबे उधळले गेले आहेत. पण या सर्वातून लोकशाही, संसदीय विचार उजळून आले आहेत. परंतु आता सुद्धा मोदींना याचा सोयीस्कर विसर पडला असावा. भाजपामध्ये त्यांचे संसदीय मंडळ सर्वोच्च आहे. संसदीय मंडळच समिती महत्वपूर्ण निर्णय घेत असते. पण मोदी-शहा यांनी मंत्रीमंडळ स्थापन करण्याची इतकी घाई केली की, ह्या संसदीय मंडळाला चर्चा करण्याचा आणि निर्णय घेण्याचा वावच दिला नाही. भाजपाच्या संसदीय पक्षाच्या नेतेपदी निवड करण्यासाठी भाजपाच्या खासदारांची स्वतंत्र बैठक बोलावणे अपेक्षित असताना तशी बैठक न बोलवता, संसदीय मंडळाला न जुमानता मोदींची नेतेपदी निवड झाली आहे. देशाचे नेतृत्व अशा रितीने लोकशाही विवेक मार्गाने टाळून घाईघाईने करण्यात आली, यातून भाजपामध्ये लोकशाही मार्ग टाळला जाणार आहे का? की विरोधकांच्या भितीमुळे घाईघाईने ही कृती केली गेली आहे. या दोन शंका नक्कीच निर्माण होत आहेत.

लोकसभेच्या निकालाचा स्वत:चे असे खूप सारे परिणाम आहेत. मोदी-०१, मोदी-०२, यापुढे मोदी-०३ असे मनसुबे कोसळून एनडीए (मोदी)-०३ असे समीकरण बनले आहे. फक्त मोदी-शहा यांच्याबरोबर इतर अनेकांचे महत्व अधोरेखित झाले आहे. एका गोष्टीचे कौतुक मात्र निश्चित करायला हवे आणि त्या श्रेयाचे मोदी खरंच हक्कदार आहेत, ते म्हणजे ज्या दोन घटक पक्षांमुळे 'एनडीए' सरकार स्थापन झाले आहेत. त्यांना खूप महत्त्वाची खाती दिली गेली नाही. जवळपास सर्व महत्त्वाची असलेली खाती मोदींनी भाजपांकडे ठेवण्यात यश मिळविले आहे. एनडीए सरकारमधील खातेवाटपाच्या कामगिरीवर मोदींनी यश मिळविले आहे. मंत्रीमंडळावर त्यांची पकड पक्की करुन टाकली आहे. मोदींचे धोरणात्मक कतृत्व यांतून निश्चितपणे सिद्ध होत आहे. मोदींच्या या धोरणात्मक शिष्टाईचा अर्थ असा सुध्दा आहे की, हे एनडीए सरकार पाच वर्ष चालवायचे आहे. किंवा हे सरकार कोसळायच्या अगोदर जेवढा वेळ मिळेल तेवढी विकासकामे करुन घ्यावी आणि जनतेला प्रसन्न करावे. उद्देश काहीही असला तरी मोदींनी हे एनडीए सरकार चालवायला सुरुवात केली आहे. आणि ते सुद्धा योग्यप्रकारे पकड ठेवून, हे भाजपाच्या दृष्टीने महत्त्वाचे आहे. निवडणुकीच्या निकालानंतर भाजपाची पिछेहाट महाराष्ट्रात झाली. याबाबत दु:खी होऊन उपमुख्यमंत्री फडणवीसांनी 'मला राज्याच्या आगामी निवडणुकीतल्या कामगिरीसाठी आताच्या राज्य सरकारच्या जबाबदारीतून मोकळे करा, अशी मागणी पक्ष वरिष्ठ नेतृत्वाकडे केली होती. आपल्यावर पराभवाचे खापर फुटू नये म्हणून फडणवीसांनी ही मागणी केली आहे अशी विरोधकांनी कुजबूज सुरु केली होती. पण पक्षनेतृत्वाने महाराष्ट्रातल्या भाजपाच्या पराभवसदृश्य स्थितीला फडणवीसांना जबाबदार धरले नाही. तसेच प्रदेशाध्यक्ष बावनकुळेंना सुद्धा जबाबदार धरले नाही. केंद्रीय गृहमंत्री शहा, पक्षाध्यक्ष जे.पी.नड्डा यांच्या बैठकीत हे स्पष्ट करण्यात आले आहे. महाराष्ट्रातल्या पराभवाला मित्र पक्ष असलेल्या शिवसेना शिंदे गट आणि अजित पवार राष्ट्रवादी गट जबाबदार असल्याच्या चर्चेचे वृत्त समोर आले आहे. शिंदे गटाची मते भाजपा उमेदवाराला मिळाली नाही. स्वत:चे मात्र सात खासदार निवडून आणले. अजितदादा पवार यांच्या या निवडणुकीला प्रभावच दिसला नाही. मग तोडाफोडीने काय साधले केले याचे सुद्धा मुक्तचिंतन बैठकीत झाले असेल. एकनाथ शिंदेनी स्वहिंमतीवर सात खासदार निवडून आणले की त्यांच्या मुख्यमंत्रीपदामुळे याच चिंतन देवेंद्र फडणवीस नक्कीच करीत असणार. खरेतर भाजपाला उत्तरप्रदेशच्या पराभवाचे चिंतन करणे गरजेचे आहे. भाजपाच्या धोरणांचा आणि कर्तृत्वाचा लेखाजोखा खरंतर उत्तरप्रदेश लोकसभेचा निवडणूक निकाल स्पष्ट करु शकेल. उत्तरप्रदेशमध्ये पक्ष तोडाफोड झाली नव्हती. राममंदिराची उभारणी उत्तरप्रदेशमध्येच झाली. देशभरात जगभरात उत्तरप्रदेश प्रसिद्ध झाले होते. भाजपाचा राममंदिराच्या उभारणीचा आणि लोकसभा निवडणुकीचा परस्पर संबंध निवडणुकीच्या जाहिरनाम्यामुळे जोडला गेल्याची विरोधकांची भावनी होती. निवडणुकीचा निकाल भाजपाच्या दृष्टीने अपेक्षाभंग करणारा आहे हे मात्र स्पष्ट झाले आहे.

या लोकसभा निवडणुकीच्या निकालाने महाराष्ट्राच्या वाट्याला मात्र काय आले याची चर्चा असताना सात खासदार निवडून आणणाऱ्या शिंदेंना किती मंत्रीपदे देणार तसेच अजितदादांना फाटाफूटीच्या अध्यायासाठी काय मिळणार याची प्रतिक्षा किती वेळ करावी लागणार? याची आहे. आगामी विधानसभा निवडणुकांच्या जागा? याबाबत भाजपा आणि फोडफोडीने भंग झालेल्या मित्रपक्षांचा घोषणा स्पष्ट होऊला लागल्या आहेत. अल्पस्वल्प झालेल्या काळासाठी राज्यमंत्रीमंडळाचा विस्तार होऊन आपल्याला मंत्री बनता येईल, अशी अपेक्षा आमदारांनी सोडली आहे. छोटा भाऊ, मोठा भाऊ, अशा भाऊगर्दीत, मित्रपक्षांच्या यारान्यात आपल्याला आमदार कसे होता येईल याकडे आता विद्यमान आणि होतकरु आमदारांचे लक्ष आहे. सध्यातरी राज्य सरकार आणि नवीन केंद्रीय सरकार आचार विचारांच्या सकारात्मक कामगिरीकडे लक्ष देत आहे. विधानसभा निवडणुका आता एककलमी कार्यक्रम राजकीय पक्ष आणि त्यासाठी उमेदवार म्हणून लढणाऱ्यांनी जाहीर केला आहे. राज्यातल्या प्रश्नांची जाण असणारा पक्ष निवडून येवो यासाठी कोणाकडे साकडे घालायचे, असा प्रश्न सर्वसामान्य जनतेला आहे. याचे उत्तर आगामी काळ देईलच. **



# कासरा, वेसण आणि संयम

कोकणस्पंदन

धनंजय शेट्ये

वाहनांची द्रुतगती, अचाट शक्ती, वेगवशता मनाला जेवढी आनंद देणारी असते तेवढीच घातकी असते.वेगवान, गतिकार जीवन सर्वांनाच आवडते. पण सर्वच बाबतीत संयम हवा. संयमात सौंदर्य आहे, संयमात आनंद आहे. मनावर नियंत्रण असायला हवे. कोणत्याही गोष्टीचा अतिरेक हा वर वाईटच! प्रमाणापेक्षा जास्त कोणतीही गोष्ट हानीकारकच असते. आपल्या इच्छाशक्तीवर ताबा असला पाहिजे. भावनेच्या भरात मनावरचा ताबा सुटला की मग अनर्थ घडायला वेळ लागत नाही. तन, मन, धन या गोष्टींवरही आपला ताबा असणे गरजेचे आहे. पण एकदा का अशा गोष्टींच्या अधीन झालो, प्रकरण हाताबाहेर गेलं की मग संयमाबाबत निर्णय आपण घेऊ शकत नाही. परंतु वेगावर, मनावर नियंत्रण ठेवण्यासाठी कोणत्याही गोष्टीला संयमात ठेवणे तितकंच गरजेचे असते. मनावर ताबा ठेवायला वेळीच शिकलं पाहिजे. हव्यास, स्वार्थ आपल्याला संयमापासून दूर नेत असतो. हव्यास व स्वार्थीवृत्ती आपल्या संयमाला सुरुंग लावण्यासाठी सदैव तयारच असते. आपण वाहनांवर आरुढ होतो पण काही वेळाने वाहनाने आपल्यावर आरुढ होऊ नये म्हणजे मिळवले. वाहनाला आपण जेवढा वेग देऊ तेवढंच त्या वाहनाला कंट्रोल करता आले पाहिजे तर आपण वाहन चालविण्याच्या लायक ठरु.

बरं हा संयम कसा निर्माण करावा? पूर्वीच्या काळी बैलांच्या गाडीला 'कासरा' असायचा. बैलगाडी थांबवायची असेल तर बैलांचा 'कासरा' ओढला जायचा. उधळलेल्या बैलांना भानावर आणण्यासाठी 'कासरा' असायचा. गाडीच्या दोन्ही बैलांना जागच्या जागी थांबविण्यासाठी 'कासरा' सर्वोत्तम!! 'कासरा' दोरीपासून बनविलेला असतो. पण बलाढ्य बैलांना एवढीशी दोरी अर्थात 'कासरा' जागच्या जागी थांबवितो.

शेताची नांगरणी करताना बैलांना 'वेसण' घातली जाते. नाकातून आरपार घातलेली दोरी शेतकरी आपल्या हातात ठेवतो. बैलांना आपल्या ताब्यात ठेवण्यासाठी 'वेसण' महत्त्वाची असते!! खरंतर 'वेसण' वेदनादायी असते. पण बैलांना भानावर आणण्यासाठी 'वेसण' गरजेची असते. बैलांना ताकदीचं बळ असते. त्यामुळे बैल शिंगाच्या साहाय्याने कोणालाही मारु शकतो, जखमी करू शकतो. महाकाय हत्तीला नियंत्रणात आणण्यासाठी 'अंकुश' नावाचे टोकदार हत्यार वापरले जाते. विशालकाय हत्तीच्या मानाने 'अंकुश' अतिशय नगण्य आहे पण ते टोचल्यावर उधळलेला हत्ती जागच्या जागी थबकतो.

प्राण्यांच्या मस्तवालपणाला संयमात आणण्यासाठी 'कासरा', 'वेसण', 'अंकुश' अशा गोष्टी वापरून नियंत्रणात आणू शकतो पण आजच्या काळातील श्रीमंत बापाची नालायक औलाद संपत्तीच्या जोरावर आणि पैशाच्या माजावर बेभानपणे मस्तवालपणे वागते अशा पिसाळलेल्या उन्मत्त तरुणाईला संयमात कसे ठेवावे ?? बापाच्या जीवावर मस्तावलेल्या या नालायक पिढीमुळे आजच्या काळात मानवी जीवन किड्यामुंग्यासारखे स्वस्त झाले आहे. खरंतर अशा पिसाळलेल्या उन्मत्त तरुणाईला बापच जबाबदार आहेत.शिस्तबद्धता, माणुसकी शिकवता येत नसेल तर त्यांच्या पालकांनी मुलांना पैशाच्या माजावर गर्वीष्ठपणा तरी शिकवू नये.

योग्य वेळी योग्य ठिकाणी योग्य व्यक्तींकडून जर शिस्तबद्धतेची वेसण घातली नाही, तर मग पुढे भावी आयुष्यात अशी निर्ढावलेली तरुणाई कोणत्याही वाईट मार्गाने भरकटत जाऊन स्वतःचा आणि आपल्या कुटुंबियांचा विध्वंस करून टाकतात. निर्ढावलेल्या तरुणाईच्या

आईबापांनी आपल्या बिघडलेल्या मुलाला ताळ्यावर आणण्यासाठी वेळीच संस्कारांचा, शिस्तबद्धतेचा आणि माणुसकीचा 'कासरा' ओढला पाहिजे.

पालकांनो, आतातरी जागे व्हा. आपल्या मुलांना पैसा कमवायला किती मेहनत करावी लागते याची जाणीव करून द्या. आपली मुले नाहक, वायफळ गोष्टींवर उगाच उधळपट्टी करत असतील तर त्यांना वेळीच आवर घाला. अनावश्यक खर्च टाळायला शिकवा. वाढत्या वयाच्या मुलांचा कासरा नेहमीच आपल्या हातात ठेवावा. वाईट वळणावर खर्डी म्हणजे संस्काररुपी 'कासरा' ओढून भानावर आणले पाहिजे. वाईट गोष्टीं नियंत्रणात आणण्यासाठी नेहमीच संस्कृती परंपरा रितीरिवाज यांचा 'कासरा' आईबापांच्या हाती असायला हवा. मुळात मनावर ताबा मिळवणारा संस्काराचा कासरा किंवा वेसण घालण्यासाठीचं एक वय असतं. योग्य वयात योग्य वेळी संस्कारांची वेसण घातली, तर उज्ज्वल भविष्यासाठी राजमार्ग ठरेल. **

# योगी पावन मनाचा





जावे संतांच्या गावा!

अनुराधा म्हात्रे

**श्रीस्वामी स्वरूपानंद (पावस)**
**भाग ४**

श्रीस्वामी स्वरूपानंदांसारखे थोर संत देहाने या जगात नसले तरी चैतन्य रूपाने त्यांचे अस्तित्व भक्तांना सदैव जाणवते. संतांचे वाङमय हे तर त्यांचे मूर्तस्वरूपच असते.

श्रीस्वामी स्वरूपानंद यांची ग्रंथसंपदा विपुल आहे. त्यामध्ये ज्ञानेश्वरी, गीता या श्रेष्ठ ग्रंथांचा प्रचलित मराठीत अनुवाद आहे, तर काही ग्रंथ हे त्यांची स्वतंत्र निर्मिती आहे. त्यांनी केलेला ज्ञानेश्वरीचा अभंगानुवाद हे काम पुढल्या कित्येक पिढ्यांना उपयोगी पडणारे आहे. सर्वसामान्यांना गीता कळावी म्हणून ज्ञानदेवांनी ज्ञानेश्वरी लिहिली. संस्कृतच्या कडीकुलपांत बंदिस्त असलेले गीतेतील श्रेष्ठ ज्ञान त्यांनी खुले केले. कालांतराने ही भाषा लोकांना दुर्बोध वाटू लागली कारण ज्ञानेश्वरी च्या निर्मितीला जवळजवळ ७०० वर्षे उलटून गेली होती. ही अडचण लक्षांत घेऊन श्रीस्वामी स्वरूपानंदांनी ज्ञानेश्वरीचा अभंगानुवाद केला. तो करत असताना मूळ ज्ञानेश्वरीतील काव्य आणि तत्वज्ञान यावर जरा सुद्धा ओरखडा उठणार नाही याची पुरेपुर काळजी श्रीस्वामींनी घेतली आहे. प्रचलित मराठी भाषेत हा ग्रंथ असल्यामुळे आज आबालवृद्ध सर्वांना ज्ञानेश्वरीचा आनंद घेता येतो.

ज्ञानेश्वरीचा अभंग अनुवाद म्हणजेच अभंग ज्ञानेश्वरी हा ग्रंथ काव्य आणि तत्वज्ञान या दृष्टीने श्रेष्ठ ठरेल अशी दक्षता स्वामिनी घेतलीच पण ग्रंथरूपात तो प्रकाशित होत असताना काही व्यावहारिक सूचनाही त्यांनी केल्या. यावरून एखाद्या गोष्टीचा सर्व बाजूंनी विचार करण्याचा त्यांचा स्वभाव लक्षात येतो. ग्रंथ हाताळायला अवजड होऊ नये म्हणून दोन भागात प्रकाशित करण्याची सूचना स्वामींनी केली. ग्रंथाचा टाईप मोठा असावा व त्याची किंमतही सर्वांना परवडेल अशी असावी असेही स्वामींनी सांगितले. आजही सेवा मंडळामार्फत हा ग्रंथ माफक किंमतीत विकला जातो.

भावार्थ गीता हा ग्रंथ म्हणजे स्वामींच्या हातून झालेली एक महत्वपूर्ण निर्मिती आहे. भगवद्गीतेतील श्लोकांचा साकीवृत्तात केलेला हा भावपूर्ण अनुवाद आहे. प्रचलित मराठीत असल्याने भगवद्गीता समजून घेण्यासाठी याचा उपयोग होतो. ज्ञानदेवांच्या अमृतानुभव व चांगदेव पासष्टी या ग्रंथाचाही अभंगांनुवाद केला. ज्ञानेश्वर महाराजांच्या वाङ्मयाचा सुबोध मराठीमध्ये अनुवाद करणारे स्वामी स्वरूपानंद हे अर्वाचीन काळातील ज्ञानेश्वरच होत!

स्वामींच्या साहित्य संपदेतील एक महत्वाचे रत्न आहे, अमृतधारा हे काव्य. ही स्वतंत्र निर्मिती आहे. एका अर्थाने हे स्वामींचे आत्मवृत्त आहे. आजारी अवस्थेत स्वामींनी लिहिलेलं हे काव्य आहे. उच्च प्रतीचा साधक ते सिद्ध योगी हा प्रवास यामध्ये शब्दबद्ध झालेला आहे. उत्कट भक्ती या काव्यांत दिसते. जगदंबेला अतिशय कळकळीने यामध्ये साद घातली आहे. श्रीस्वामी म्हणतात,

जगज्जननी तव भक्ती-सुधेची पावन भिक्षा घाल
**दारिं पातला पहा तुझा हा भाग्यवंत कंगाल।।**

या दोन ओळींतूनच या काव्यातील भक्तीची आर्तता दिसते आणि काव्याचा कलात्मक आविष्कार दिसतो. स्वामी स्वतःला भाग्यवंत कंगाल म्हणतात. भक्तीची भिक्षा मागणारा कंगाल हा भाग्यवंतच असणार; नाही का?

सामान्य लोकांना मार्गदर्शन व्हावे, त्यांना आत्मोद्धाराचा मार्ग दिसावा म्हणून स्वामी हे मौल्यवान विचारधन आपल्यासाठी मागे सोडून गेले आहेत. त्यांना यातून धन, कीर्ती काहीच मिळवायची नव्हती. या गोष्टी त्यांच्या वाऱ्यालाही उभ्या राहत नव्हत्या. ऐसी कळवळ्याची जाती, करी लाभविण प्रीती या वर्गातले ते होते.

स्वामींसारखे संत परिस्थिती कोणतीही असली तरी शांत असतात. बदलणारी परिस्थिती त्यांची मनस्थिती विचलित करू शकत नाही. स्वामींच्या आयुष्यातही प्रचंड उलथापालथी झाल्या. ऐन तारुण्यातच त्यांना भयंकर आजाराला तोंड द्यायची वेळ आली. हाती घेतलेले स्वातंत्र्य लढ्याचे व समाज सुधारण्याचे काम सोडून द्यावे लागले, आयुष्यभर शारीरिक दुर्बलतेला सामोरे जावे लागले पण स्वामींचे परमेश्वरी अनुसंधान कधीही सुटले नाही. पावस सारख्या छोट्या गावात राहून शांत तेवणाऱ्या दिव्याप्रमाणे ते आपले काम करत राहिले. लोकांना ज्ञानाचा प्रकाश दाखवावा हे त्यांएचे ध्येय होते.

स्वामींनी लोकांना अद्वैत तत्त्वज्ञानाचा परिचय करून दिला. 'सोहम्' ही नाथपंथीय साधना अनेकांना शिकवली. तो मीच आहे म्हणजे परमेश्वर आणि आपण वेगळे नाहीत, सगळ्या चराचरामध्ये परमेश्वरच भरून राहिलेला आहे, असा उपदेश केला. स्वामी सर्वांशी मातेच्या वत्सलतेने वागायचे. त्यांचे वागणे बोलणे अतिशय मृदु होते. 'शुभ्र नेसणे, मृदू बोलणे पावसाचा राजाचे असे एका गीतात केलेले त्यांचे वर्णन यथार्थ आहे. स्वामींच्या नेसूचे धोतर जितके शुभ्र होते त्याहीपेक्षा अधिक त्यांचे मन धवल होते!

श्रीस्वामींचीचरित्रगाथापावसच्यादेसाई कुटुंबीयांबद्दल सांगितल्याशिवाय पूर्ण होणार नाही. श्रीस्वामींच्या कार्यात देसाई कुटुंबाचे योगदान फार मोठे आहे. देसाई यांच्या अनंत निवासांत अखंड ४० वर्ष वास्तव्य करून श्रीस्वामींनी साधकांना मार्गदर्शन केले. त्या काळांत पावस सारख्या छोट्या गावांत लोकांची राहण्याची, जेवणाची सोय नव्हती. स्वामींकडे येणाऱ्या भक्तांची ही सर्व व्यवस्था देसाई मंडळी मोठ्या आत्मीयतेने करीत. आजही देसाई मंडळी समाधी मंदिराला भेट देणाऱ्या भक्तांची उत्तम व्यवस्था राखतात.

स्वामींच्या कीर्तीचा सुगंध सर्वत्र पसरला होता. महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून आणि महाराष्ट्राच्या बाहेरूनही अनेक साधक दर्शनाला येत होते. पण स्वामींनी मात्र आपले अवतार कार्य समाप्त करण्याचे ठरवले. त्यासाठी १९७४ सालचा १५ ऑगस्ट हा दिवस निवडला. हा भारताचा स्वातंत्र्य दिन. ज्या स्वातंत्र्यासाठी स्वामींनी आपल्या तरुणपणी लढा दिला होता. २८ जुलै १९७४ लाच स्वामींनी माझा पुढचा प्रवास सुरू झाला आहे, अशी सूचना दिली. आपल्या पार्थिवासाठी भूगर्भ समाधी कशी असावी यासंबंधी सर्व बारीकसारीक तपशील स्वामीनी लिहून ठेवले होते. एका योग्याला साजेल अशा पद्धतीने स्वामींनी देहत्याग केला. १४ ऑगस्ट च्या रात्री त्यांनी 'ओम राम कृष्ण हरी' चा जप स्वतः करत इतरांकडून करवून घेतला. इहलोकीचा प्रवास संपवण्यापूर्वी स्वामींनी हात जोडून रामकृष्ण व त्यांचे सद्गुरु बाबा महाराज यांना वंदन केले. ओंकाराचा त्रिवार उच्चार केला.

**स्वामी म्हणे व्हावें विश्वाचें कल्याण ।**
**तेणें समाधान मज होय।।**

विश्व कल्याण इच्छीणारा हा पावन मनाचा योगी अनंताच्या प्रवासाला निघून गेला.

अनेक शतकांतून एकदाच असे योगी पुरुष जन्म घेतात. देहाने ते या जगांत नसले तरीही दीपस्तंभा प्रमाणे ते साधकांना मार्गदर्शन करत असतात. अशा या थोर युगपुरुषाला, श्रीस्वामी स्वरूपानंद यांना कोटी कोटी प्रणाम! **

# संवाद ज्यांचा त्यांचा...

**तुम्ही नको त्या लोकांना जवळ केले महाराज. ज्यांना जवळ करायचं त्यांना लांब केले आणि त्यांना लांब ठेवायचं त्यांच्या तुम्ही अगदी जवळ गेले. हेही लोकांना नाही आवडलं महाराज. तुम्ही देश विदेशात जातात तिकडची टेक्नॉलॉजी इकडे आणू पाहतात. ती टेक्नॉलॉजी इथे वापरण्यापूर्वी लोकांचे राहणीमान तरी आधी सुधारा. लोकांना ते हव का नको ते तर आधी विचारा. बदल हा लोकांना मान्य आहे महाराज पण त्यासाठी आधी तजवीज सुखसुविधा करून ठेवा. मग कुठलीही गोष्ट अमलात आणा.**

**निलेश साठे**

प्रधानजी काय हाल हवा आहे राज्याची, महाराज लय बेक्कार अवस्था झाली आहे राज्याची. का काय झालं. आमच्या राज्यात लोक खुश नाहीत का. खुश कसे असतील महाराज. तुम्ही काय कमी हाल केले का.

आम्ही असं काय केलंय?

काय केलंय. तुम्ही जे नको करायला पाहिजे. तेच केलंय म्हणजे?

हाराज तुम्ही लय वादे वायदे केले पण तुम्ही तसे वागलात नाय. मी गेलो होतो राज्यात फेरफटका मारायला. लोक तुम्हाला नको नको ते बोलू लागले आहेत. लोक तुम्हाला बोलबच्चन आणि फेकू म्हणायला लागले आहेत. लोकांना काय पाहिजे होतं आणि तुम्ही काय दिलं?

काय पाहिजे होतं लोकांना?

आता हे पण मीच सांगू. लोकांना पाहिजे होतं स्वतःचं एक चांगलं आणि हक्काचं घर. लोकांना पाहिजे होती २४ तास वीज. लोकांना पाहिजे होतं मुबलक पाणी. लोकांना पाहिजे होतं, नोकरी, काम-धंदा. लोकांना हवं होतं चांगलं शिक्षण आणि चांगली आरोग्य सेवा.

अरे मग आम्ही रस्ते बांधले ते कोणासाठी? आम्ही ही सुधारणा करतोय कोणासाठी?

तुम्ही रस्ते बांधले महाराज. परंतु त्या रस्त्याने लोकांच्या आयुष्यात समृद्धी नाही आली. लोकांना चांगले रस्ते हवे आहेत. परंतु, राहण्याची सर्वोत्तम सुविधा करा त्यानंतर रस्ते बनवा. आजही मुंबईसारख्या शहरांमध्ये लाखो लोक अक्षरशः झोपडपट्टीत दारिद्र्याचे आयुष्य जगत आहे. पाण्यासाठी लोकांना वन-वन भटकावे लागत आहे. काम धंदा नाही बेरोजगारीने अक्षरशः माणूस हैरान परेशान झाला आहे. महागाईने तर कळसच गाठला आहे.

अरे मग आमची चूक झाली कुठे? मी कोणासाठी करत आहे? माझं असं कोणी नाही मग सर्व तर मायबाप जनता जनार्दनासाठीच करत आहे ना?

तुम्हाला तसं वाटतंय महाराज. तुम्ही एका हाताने देताय आणि दुसऱ्या हाताने काढून सुद्धा घेत आहे.

असं कसं म्हणता?

बरोबरच बोलतोय महाराज मी. तुम्ही जो जीवनावश्यक वस्तूवर लावलेला टॅक्स आहे तो लोकांना नाही आवडला. आणि तो टॅक्स इतका भरमसाठ आहे की भीक नको पण कुत्रा आवर अशी अवस्था झाली आहे.

अजून लोकांचं काय म्हणणं आहे?

आधार कार्ड लिंक करा, पॅन कार्ड लिंक करा वोटिंग कार्ड लिंक करा ही कामे सर्वसामान्य जनतेची नाही महाराज. ते त्यांच्या पोटापाण्याच बघणार का हे सर्व काम करत बसणार. ही कामे राजाच्या एखाद्या शिपायाने घरोघरी येऊन केली पाहिजेत असं लोकांचं म्हणणं आहे महाराज.

अरे पण आम्ही हे सर्वसामान्य जनतेसाठी आवश्यक आहे असे आम्हास वाटले म्हणूनच करतो आहोत ना

हे लोकांना नको आहे महाराज. तुम्ही सर्वसामान्य लोकांच्या खिशामध्ये हात घालायला नव्हता पाहिजे महाराज. लिंक करण्याच्या नावाखाली आणि चार्जेसच्या नावाखाली भरमसाठ फी उकळू लागले आहेत महाराज. तुमच्या आधी जे राजे महाराज होते त्यांनी सर्वसामान्यांच्या खिशात कधी हात नाही घातला. त्यांना जे द्यायचं ते दिलं जे घ्यायचे ते घेतलं परंतु त्रास होऊ नाही दिला. आपल्या राज्यात लोकांना प्रचंड मानसिक त्रास होत आहे महाराज.

मला अजून सांग अजून सांग लोकांचं काय काय म्हणणं आहे ते.

महाराज तुम्ही जनतेला फक्त पोकळ आश्वासन दिलेत. सर्वांना हक्काचं घर देणार म्हटले कुठे दिली आहेत घरे. ज्यांना दिली त्यांच्याकडून तुम्ही पैसे घेतले त्यांची कुवत नसताना सुद्धा त्यांनी कसेबसे पैसे उभारून दिले. आपण म्हणलात काळा पैसा बाजूच्या राज्यामध्ये गेला आहे तो आपण परत आणू कुठे आणला तुम्ही? तो एक मोठा गुंड पळून गेलेला त्यालाही तुम्ही आणलं नाही.

अरे तो तर आता म्हातारा झालाय मरू दे की त्याला तिकडेच त्यासाठी आणि खर्च कशाला करायला लावतो. बर ठीक आहे ते जाऊदे त्याला मरू द्या.

तुमचा तो नदी जोड प्रकल्प काय झालं त्याचं.?

लवकरच ते काम हाती घेणार आहे.

तुम्ही फक्त बोलता आणि कृती काहीच करत नाही असे लोक म्हणतात.

आणखी काही चुका आहेत त्या आमच्या निदर्शनास आणून द्या.

तुम्ही नको त्या लोकांना जवळ केले महाराज. ज्यांना जवळ करायचं त्यांना लांब केले आणि त्यांना लांब ठेवायचं त्यांच्या तुम्ही अगदी जवळ गेले. हेही लोकांना नाही आवडलं महाराज. तुम्ही देश-विदेशात जातात तिकडची टेक्नॉलॉजी इकडे आणू पाहतात. ती टेक्नॉलॉजी इथे वापरण्यापूर्वी लोकांचे राहणीमान तरी आधी सुधारा. लोकांना ते हव का नको ते तर आधी विचारा. बदल हा लोकांना मान्य आहे महाराज, पण त्यासाठी आधी तजवीज सुखसुविधा करून ठेवा. मग कुठलीही गोष्ट अमलात आणा.

ही सुद्धा आमचीच चूक?

तुमच्या कृतीतून मुटभर लोकांचच हित दिसत महाराज.

अस्स. तर मी आता स्वतःच राज्याचा दौरा करतो. लोकांना काय हवं नको ते पाहतो. लोकांच्या अडीअडचणी समजून घेतो. त्यानंतर मग सोयी सुविधा उपलब्ध करून देता येतात का ते पाहतो. चला तयारी कराआजपासूनच कामाला लागतो आणि हे मी माझ्या मनापासून सांगत आहे. **



## प्रेमळ हृदयाची वाट दाखविणारा

# हर्मन मायनर

**पुस्तक परीक्षण**

**प्रा. शाम जोगळेकर**

**मो. ९२७३३४३१७७**

हर्मन मायनर - बालग्रामचा जनक, हे हान्सहाइन्स राइनप्रेख्ट या मूळ लेखकाच्या पुस्तकाचा मराठी अनुवाद शोभना रानडे यांनी केला आहे. डॉ. हर्मन मायनर यांच्यावरील हे पुस्तक ऑस्ट्रियन भाषेतील असून, त्याच्या इंग्रजी अनुवादावरून हे मराठी रूपांतर शोभना रानडे यांनी केले आहे. भारतातील १९४२ च्या स्वातंत्र्य लढ्यात शोभना यांनी भाग घेतला होता. मात्र, स्वातंत्र्योत्तर काळात त्या सक्रिय राजकारणापासून दूर राहिल्या. गागोदे या विनोबांच्या जन्मगावी १९७४ साली पहिले बालग्राम सुरू करून महाराष्ट्रातील बालग्राम चळवळीची त्यांनी मुहूर्तमेढ रोवली. शोभना रानडे (वय ९९ वर्षे) यांना त्यांच्या दीर्घकालीन समाजकार्याबद्दल भारत सरकारने पद्मभूषण पुरस्कार प्रदान केला आहे. पुस्तकाच्या सुरुवातीला, भारतातील बालग्रामचे अध्यक्ष जे.एन.कौल यांनी भारतातील एस.ओ.एस. बालग्राम चळवळीबद्दल लिहिले आहे. १९६४ मध्ये भारतातील पहिल्या बालग्रामची स्थापना फरिदाबादमधील ग्रीनफील्ड येथे झाली. आता बहुतेक सर्व राज्यांमध्ये बालग्रामे सुरू झाली आहेत. १९७९ मध्ये पुण्यात नमुनेदार बालग्रामची स्थापना झाली आणि महाराष्ट्रात बालग्राम चळवळ वाढीस लागली. महाराष्ट्रातील अनाथ बालकल्याण चळवळीबद्दल दौलतराव जाधव यांनी सविस्तर लिहिले आहे. त्यांना डॉ. मायनर यांच्याशी पुण्यात सविस्तर चर्चा करण्याची संधी लाभली होती. अनुवादक आणि बालग्राम, महाराष्ट्रच्या अध्यक्ष शोभना रानडे यांनी आपले मनोगत मांडले आहे. या पुस्तकाचे रंगीत मुखपृष्ठ सतीश देशपांडे यांचे आहे. हे पुस्तक एकूण तीन विभागांत विभागले गेले आहे.



४ डिसेंबर १९५३ रोजी लेखक, (लिंझमधील वृत्तपत्राचा संपादक) अन्य पत्रकार मित्रांसह, इमस्टमधील बालग्रामला भेट देण्यासाठी जातात. तेथे हर्मन मायनर यांची प्रथम भेट होते. बालग्राम चळवळीशी लेखक कसा बांधला गेला, त्याचे वर्णन या पुस्तकात आहे. हर्मन मायनरच्या विश्वात लेखक रमून जातो. दुसऱ्या महायुद्धाच्या भीषण संग्रामातून बालग्रामच्या कल्पनेचा उदय झाला. त्याद्वारे हर्मन मायनरने नव्या जगाला एक प्रेममय नवीन रस्ता दाखवला. मायनरचे व्यक्तिमत्त्व म्हणजे ठेंगणी मूर्ती आणि दणकट प्रकृती. त्याच्या भव्य कपाळावरून त्याची प्रसन्नवृत्ती आणि निश्चयी स्वभावाचे दर्शन होते. हर्मन मायनर बालग्राम चळवळीचा मुख्य प्रणेता आहे आणि त्याच्या कर्तृत्वावर ही चळवळ उभी आहे. महायुद्धानंतर त्यांना भेटलेली अनाथ मुले आणि त्यांच्यासाठी काहीतरी करावे ही प्रेरणा कशी निर्माण झाली आणि ही कल्पना हळूहळू बालग्राममध्ये कशी रूपांतरित झाली, हे त्यांनी आलेल्या पत्रकारांना सांगितले. इन्नसब्रुक येथे मायनर वैद्यकीय शिक्षण घेत होते. त्यावेळी त्यांनी युवकांमध्ये काम सुरू केले होते. अभ्यासाव्यतिरिक्त सर्व वेळ खर्च

करूनही त्यांचे प्रश्न सोडविणे अवघड आहे, याची त्यांना जाणीव झाली. कालांतराने मायनर यांनी वैद्यकीय शिक्षण सोडले आणि त्यांनी उपेक्षित मुलांसाठी काम करण्याचे ठरविले. बालग्राममध्ये अनाथ मुले आणि त्यांना संभाळणाऱ्या मातांची राहण्याची व्यवस्था करण्यासाठी मायनर यांनी समाजातील लोकांना दरमहा एक शिलिंग दान करण्याचे आवाहन केले. हळूहळू देणगीदार देणगी देऊ लागले. मायनरच्यामते समाजात चांगली पालक कुटुंबे कमीच असतात.

मायनर यांचा जन्म आल्बरश्वेंड येथे झाला. त्याचे बालपण, शिक्षण याच गावात झाले. लष्करात भरती होण्यासाठी त्यांनी गावाचा निरोप घेतला. वयाच्या पाचव्या वर्षी त्यांची आई स्वर्गवासी झाली. हर्मनसह एकूण आठ भावंडे पोरकी झाली. चांगले वागा, चांगले रहा!, असा उपदेश शेवटी आईने केला होता. शेती करणाऱ्या वडिलांनी त्याला नंतर इन्सब्रुकला वैद्यकीय शिक्षण घ्यायला पाठवले. हुशार, महत्त्वाकांक्षी आणि अभ्यासू वृत्तीच्या हर्मनला डॉक्टर व्हायचे होते. दुसऱ्या महायुद्धानंतर अनेक प्रश्न निर्माण झाले. अनाथ मुलांचा प्रश्न सोडविण्यासाठी असलेली प्रचलित व्यवस्था अमान्य असल्याने, मायनरने बालग्रामची योजना आखली. या योजनेतील २ डिसेंबर १९४९ रोजी पहिले घर इमस्ट येथे तयार झाले. १९५३ अखेर तेथे दहा घरे झाली. प्रत्येक घरामध्ये नऊ मुले आणि त्यांची माता राहत असे. जवळच्या शाळेत मुलांचे शिक्षण होत असे. हळूहळू लोकांना या कामाचे महत्त्व पटू लागले. गरीब, श्रीमंत सर्वजण देणग्या देऊ लागले. मायनरच्या कामात अनेक सहभागी झाले. बालग्रामच्या माता बहुतेक २५ ते ३५ वयोगटातील, अविवाहित असतात. त्यांना प्रशिक्षण दिले जाते. त्यामुळे त्या सक्षम माता बनतात. बालग्राममध्ये दाखल होणाऱ्या प्रत्येक मुलाची कहाणी दुःखद आणि हृदयस्पर्शी आहे. बालग्राममध्ये त्याला अन्य भावंडे आणि आई भेटते. त्यामुळे त्याचे व्यक्तिमत्त्व फुलण्यास मदत होते. अशा काही निवडक मुलांची आणि मातांची पुस्तकातील संकलित पत्रे विलक्षण हृद्य आहेत. बालग्रामची मागणी कालांतराने संपूर्ण ऑस्ट्रिया आणि अन्य देशांत येऊ लागली. कार्य हळूहळू जगभर विस्तारले. इन्सब्रुकमधील विद्यापीठाने त्याला, त्याच्या कार्याची प्रशंसा करून डॉक्टरेट बहाल केली. युरोप खंडानंतर आशिया खंडातील भारतासह विविध देशांत बालग्राम चळवळ कशी पोहोचली त्याची सविस्तर माहिती वाचावयास मिळते. मायनर यांच्या पंचवीस वर्षांच्या अथक प्रयत्नांतून जगातील पाचही खंडांमध्ये शंभर बालग्रामे उभी राहिली. त्यामुळे सामाजिक न्यायापासून वंचित असलेल्या अनाथ मुलांना त्याने नव्या भविष्यकाळाची भेट दिली.

हर्मन मायनर (१९१९ - १९८६) यांची ही जीवनकहाणी विलक्षण प्रेरक आहे. विविध कृष्णधवल छायाचित्रांमुळे ही कहाणी मनात ठसते. हर्मन मायनर यांच्या बालग्राममध्ये अनेक अनाथ मुलांना आणि मातांना आपले जीवन संपन्न करण्याची संधी मिळाली आणि मिळत आहे. जगभर बालग्रामचे कार्य अजूनही, जोमाने सुरू आहे. **

**पुस्तकाचे नाव : हर्मन मायनर**
**लेखक : हान्सहाइन्स राइनप्रेख्ट**
**अनुवाद : शोभना रानडे**
**प्रकाशक : बालग्राम, एस.ओ.एस. चिल्ड्रेन्स व्हिलेज, महाराष्ट्र कोरेगाव रोड, पुणे.**
**प्रथम प्रकाशन : ११.९.१९९४ विनोबा जन्म शताब्दी वर्ष दिन पृष्ठे : २७१. किंमत : रु. १५०/-**

# जत्था निघाला पंढरीसी...

**वारीमध्ये चालण्याचे वेगळेपण त्यातील भावापासूनच बदलते. इथे कोणालाही कोणाच्या पुढे जायचे नसते. यावेळी प्रवाससुख उपभोगण्याची आस नसते. काही मिळवण्याचा हव्यास नसतो. वारीत चालणारा प्रत्येकजण दूरवर बसलेल्या त्या सावळ्याची छबी डोळ्यासमोर ठेवून पावले उचलत असतो. यावेळी त्याला कठोर नियमांचे पालन करावे लागते. पण सगळे नियम हसत-हसत स्वीकारुन तो चालत राहतो आणि एक-एक वारी मनात साठवत राहतो...**

**उर्मिला राजोपाध्ये**

पंढरीकडे जाणारे रस्ते भक्तिरसात न्हाऊन निघाले आहेत. दूरदूरवरुन ध्वज, पताका, तुळस, विठ्ठल-रखुमाईची मूर्ती घेतलेले भाविक, श्रद्धाळू जथ्याने आपल्या लाडक्या विठुरायाच्या दर्शनाच्या ओढीने निघणे ही आपली फार मोठी आणि समृद्ध परंपरा म्हणावी लागेल. पूर्वी अगदी छोट्या जलधारेच्या रुपात सुरू झालेल्या या प्रवाहाने आता अथांग रुप धारण केले असून त्यात आबालवृद्धांचा सहभाग लक्षवेधी ठरत आहे. याचे कारण म्हणजे चालणे आणि वारीत चालणे यात महद्अंतर दिसते. असेही आपण चालत असतो. कधी कुठे तरी पोहोचायचे म्हणून, कधी आरोग्य जपायचे म्हणून, कधी पैसे वाचवायचे म्हणून रस्ता पायाखाली घेत चालणे सुरू असते. मात्र वारीमध्ये चालण्याचे वेगळेपण त्यातील भावापासूनच बदलते. इथे कोणालाही कोणाच्या पुढे जायचे नसते. यावेळी प्रवाससुख उपभोगण्याची आस नसते. काही मिळवण्याचा हव्यास नसतो. वारीत चालणारा प्रत्येकजण दूरवर बसलेल्या त्या सावळ्याची छबी डोळ्यासमोर ठेवून पावले उचलत असतो. यावेळी त्याला कठोर नियमांचे पालन करावे लागते. कधी ऊन तर कधी पाऊस, कधी रिमझीम तर कधी मुसळधार वर्षाव झेलत, भिजल्या अंगाने वाट तुडवावी लागते. खाण्यापिण्याचे चोचले अंमळ मागे ठेवावे लागतात. स्नानादी आन्हिकांपासून अनेक प्रकारची कर्मे करताना समस्यांचा सामना करावा लागतो. पण हे सगळे जाणून देखील वारीमध्ये पावलांची संख्या वाढती राहते, तेव्हा या वाटचालीचे आगळे महत्त्व प्रकर्षाने जाणवल्याखेरीज रहात नाही.

एकंदरच वारी ही केवळ पायांची चालण्याचीच नव्हे तर मनाच्या संयमाचे मोजमाप करणारी चाल आहे. प्रत्यक्षात आषाढीच्या दिवशी सावळ्या परब्रह्माचे मुखदर्शन तरी होईल की नाही, याची खात्री नसताना केवळ कळसाच्या दर्शनानेही समाधान पावून, एकमेकांच्या पाया पडून पुन्हा भेटीच्या आणाभाका देत परतणारे अनेक जीव संयम आणि भक्तीच्या परमोच्च स्थानी आधीच पोहोचलेले असतात. अपूर्ण शरणभाव मनात असल्यामुळे त्यांना संपूर्ण जत्थ्यामध्ये चालणाऱ्या प्रत्येक जीवात विठ्ठलच दिसत असतो. संतमंडळींचे अविट गोडीचे अभंग मुखी असताना जणू घडीघडीला त्यांना सत्संग घडत असतो. अभ्यासकांच्या, कीर्तन-प्रवचनकारांच्या मुखातील वाणी त्यांच्या क्षुब्ध भावनांवर हळूवार फुंकर घालत असते. पायाखाली येणारे प्रत्येक वळण जणू प्रापंचिक अडचणीतून बाहेर पडण्याचा एक एक मार्ग त्यांच्यापुढे उलगडून दाखवत असते. म्हणूनच वारीतील चालणे श्रद्धा, अध्यात्म, उपासना, वसा, वारसा या सगळ्यांच्या पुढे जात घेतलेली चाल असते, असेही म्हणता येईल. वारी करणारा वारकरी गळ्यात आजन्म तुळशीची माळ घालतो. त्यामुळे हा संप्रदाय 'माळकरी पंथ' म्हणून ओळखला जातो. पंढरीची नित्य वारी, गळ्यात घातलेली तुळशीची माळ, संप्रदायाला प्रमाण असणाऱ्या ग्रंथांचे नित्य वाचन आणि पठण, नामस्मरण तसेच नामसंकीर्तन यांचे अखंड सेवन, पंढरीश हेच हृदयास्थित झालेले दैवत आणि सहिष्णुतायुक्त सदाचार ही वारकऱ्यांची आणि वारकरी संप्रदायाची लक्षणे होत. वारकरी विठ्ठलाला बाळकृष्णाच्या रूपात पाहतात, त्याच्या बाल लीला त्यांच्या मनाला वेड लावतात. पंढरीश म्हणजे बाळकृष्णाचेच रूप. या दैवताला विठ्ठल आणि सर्व वारकरी पांडुरंग या नावाने अगदी हृदयापासून हाका मारतात. पंढरीरायात हरिहराचे ऐक्य झाले आहे. म्हणूनच या सावळ्या विठ्ठलाला 'पांडुरंग' म्हटले जाते. दुसरे असे की, ज्याची कांती धवल, शुभ्र वा ज्याचा वर्ण गौर आहे, तो पांडुरंग परब्रम्हाचे प्रतीक आहे. शामल प्रभेचा हा विठ्ठल कटीवर दोन्ही हात ठेवून उभा आहे. सर्वांच्या अंत:करणात असणारे निर्विकार चैतन्य सर्व व्यापून पुन्हा वेगळे शिल्लक आहे. त्याला रूप-रेखा-नाम नाही. अशा चैतन्याचे प्रत्यक्ष शिव ध्यान करतो. भक्तांच्या प्रेमाकरता हे निर्गुण निर्विकार परब्रह्म सगुण साकार झाले आहे. विठ्ठल म्हणजे विष्णु वस्तुतः शंख, चक्र, गदा, पद्म धारण करणारा चतुर्भुज पाहिजे. पण विठ्ठल या परब्रह्माचे ओंकार हे अक्षर प्रतीक आहे. कमरेवर ठेवलेल्या दोन्ही हातांनी ओंकारातील अकार दाखवला आहे.

संत तुकाराम महाराजांनी विठोबा शब्दाची व्युत्पत्ती 'वि चा केला ठोबा। म्हणोनी नाव तो विठोबा।' अशी केली आहे. विद् म्हणजे जाणणे, ज्ञान. या ज्ञानाचा जो ठोबा म्हणजे स्तंभाकार उभी मूर्ती. तो 'विठोबा' ज्ञानमूर्ती आहे. विठोबा म्हणजे परब्रह्माचा पूर्णावतार श्रीकृष्ण आहे. या विठ्ठल मूर्तीत अलौकीक आणि दिव्य अनुभूती दिसून येते. ती महान भगवद्भक्तांना लवकर दिसून येते. योग्यांना आणि भक्तांना ध्यानावस्थेत निर्गुण परब्रह्माचा तेजस्वी कृष्णनील बिंदुरूपाने सगुण अनुभव येतो, तोच हा बाळकृष्ण म्हणतात. हा बिंदू आहे म्हणून बाल आहे. या सगुण कृष्णाच्या बालक्रिडेचे वर्णन सगळेच संत करतात. पुंडलिकाच्या भावार्थासाठी भगवान श्रीकृष्ण प्रत्यक्ष गोकुळातून पंढरीला आले, असे ज्ञानेश्वरांनी म्हटले आहे. विठ्ठल दैवताची थोरवी अशी आहे की हे दैवत समन्वयाचे आहे. द्वैतभाव सोडून किंवा मोडून अद्वैत प्रस्थापित करणारे आहे. ते सात्त्विक दैवत आहे. भारतातील सात्त्विक परंपरांचे अवघे सार विठ्ठलामध्ये प्रकट झाले आहे.



वारकरी संप्रदायाने अद्वैत तत्त्वज्ञान सांगितले असले तरी ते सगुण साकार विठ्ठलाची पूजा-अर्चा करतात. कमरेवर हात घेतलेला पांडुरंग आपली वाट पाहत असतो, अशीच त्यांच्या मनाची धारणा आहे.

भक्तीयोगाचा हा प्रवास नि:संशयपणे सगुणाकडून निर्गुणाकडे होत आहे. म्हणून संत तुकाराम महाराज म्हणतात, 'केला मातीचा पशुपती। परि मातीसी काय प्रणती।।'

'शिवपूजा शिवासी पावे।
माती माती माजी सामावे।।'

सर्व संतांनी विठ्ठलाचे गुणगाण सानंद केले असले तरी त्यांचे तत्त्वज्ञान आणि अनुभूती केवळ अलौकीक महात्म्यांनाच येते. म्हणूनच सगुण साकार विठ्ठलाचा मध्यममार्ग सर्व संतांनी जनसामान्यांना सांगितला आहे. जनसामान्यांना विठ्ठल भक्ती करणे सोपे वाटते. संत तुकारामांना वाटते, माझा विठ्ठल संतांना आणि भक्तांना वेड लावणारा आहे. माझा विठ्ठल खूप देखणा आहे. संत नामदेवांना वाटते की, माझा विठ्ठल म्हणजे भक्तीच्या रूपाने निर्गुण परब्रह्माचे अवघे वैभवच साकार झाले आहे. विठ्ठल साक्षात परब्रह्मच आहे. संत निळोबा म्हणतात, श्री विठ्ठलाचे नाव निघाले की वारकरी गहिवरतो. कारण विठ्ठल हेच त्याचे सर्वस्व आहे. त्यासाठी माता, पिता, सखा, बंधू सारे काही विठ्ठलच आहे. विठ्ठलाशिवाय वारकऱ्यांना करमत नाही. ती त्यांची माऊली आहे. असे म्हणतात की, वारकरी भेटायला येतात तेव्हा विठ्ठल खूप आनंदी, उत्साही असतो.त्याचा चेहरा उजळून निघतो. परंतु वारकरी वारी संपवून परतू लागतात तेव्हा विठ्ठलाला वाईट वाटते. त्याचा चेहरा खिन्न होतो, चेहऱ्यावर तेज दिसत नाही. विठ्ठल आणि एकनिष्ठ भक्त यांचे देणे-घेणे अवघे पारमार्थिक स्तरावरचे आहे. त्यात भौतिक सुखाची कोणतीही अपेक्षा नसते. निर्मळ मनाने, निर्मळ भक्तीने, पायाशी आलेला भक्त विठ्ठलाला खूप आवडतो. म्हणूनच अशा प्रेमळ भावाने पांडुरंग भक्ताला आलिंगन देण्यासाठी धावतो. हे देव-भक्तीचे नाते प्रेमळ, गोड आणि विलोभनीय आहे. फुलाआधी फळ नाही. 'म्हणोनी या भक्त केला। आधी मग देव झाला' अशी ही सुंदर कल्पना निळोबांनी मांडली. मोक्षालासुद्धा लाथाडून भक्ती मागणारा भक्त देवाला विशेष प्रिय आहे. देव आपणहून भक्ताला मुक्ती देतो... 'भक्त लागती नेघो देवा। पुरे आप्ता तुझीचि सेवा।' भक्तांचे रक्षण करण्यासाठी परमेश्वराचे अवतार असतात.

पांडुरंग भक्तवत्सल आहे, त्याच बरोबर तो करूणाकरही आहे. भक्तांच्या कौतुकासाठी तो सोहळे करतो. आपली तहान-भूक, शीण विसरून युगानुयुगे भक्तांची वाट पाहत तो वीटेवर उभा आहे. पांडुरंग भक्तांचा अंतरसाक्षी आहे. दीनांचा बंधू आहे. भक्तांना नित्य सांभाळणारा आहे. म्हणूनच जनीला धुणी-भांडी, गोवऱ्या करण्याकरता तो सतत मदत करायचा. भक्ताच्या निरागस भावाने तो अगदी पाघळून जातो. भक्तांशिवाय त्यालाही चैन पडत नाही. भक्तांच्या निस्सिम भावाची पूजा पांडुरंग स्वीकारतो. मग त्याला पत्र, पुष्प, फल असे काहीही चालते. निखळ भक्तीशिवाय इतर गोष्टी त्याला नकोच असतात. निर्मळ भाव असलेल्या सर्व भक्तांचा योगक्षेम विठ्ठलच स्वत: चालवतो.

विठ्ठल भक्तांची कामे करतो तसेच त्यांचे रक्षणही करतो. भक्तांसाठी तो दास्यत्व पत्करतो. विठ्ठल, पांडुरंग हा भक्तवत्सल असल्यामुळे भक्तांचा भाव एकविध होऊन जातो. इतका की, देवभक्तांची एकरूपता होऊन जाते. नभातील आकाश नभाहून वेगळे नसते. वस्त्रातील कापसाचे तंतू वस्त्राहून वेगळे नसतात. तसेच देव आणि भक्तांचे नाते असते. त्यात वेगळेपण नसते. जन्मोजन्मी अपूर्व संचितानी चालावीशी वाटणारी ती ही पंढरीची वाट. 'पंढरीचा वास, चंद्रभागे स्नान, आणिक दर्शन विठोबाचे। हेचि घडो मज जन्मजन्मांतरी मागणे, श्रीहरी नाही दुजे।।' हाच भाव साऱ्यांच्या मनी दाटतो. 'बा विठ्ठला, तुझी कृपा अशीच राहू दे' हीच प्रार्थना सारेजण त्या विठ्ठलाच्या चरणी करत असतात. सध्या आपण याच प्रार्थनेचे विशाल स्वरुप पाहत आहोत. **



निवडक

## पराभवाचा स्वीकार करा

**नवी दिल्ली :** इंग्लंड विरूद्धच्या सामन्यानंतर इंग्लंडचा माजी कर्णधार मायकेल वॉन सोशल मीडियावर तक्रार करताना, या स्पर्धेत भारतीय संघाच्या हिताचे निर्णय घेतले जात आहे असे विधान केले होते. याला प्रत्युत्तर देताना हरभजन सिंहने म्हटले की, गयाना हे भारतासाठी चांगले ठिकाण आहे असे तुम्हाला वाटते का? दोन्ही संघ एकाच ठिकाणी खेळले. मूर्खपणा सोडून द्या. इंग्लंडचा संघ सर्वच विभागांमध्ये कमजोर होता त्यामुळे पराभव झाला. तुमचा मूर्खपणा स्वतःकडे ठेवा आणि हा पराभवाचा स्वीकार करा.

## बाद फेरीला सुरुवात

**बर्लिन :** युरो करंडक फुटबॉल स्पर्धेची साखळी फेरी संपली असून शनिवारपासून स्वित्झर्लंड व गतविजेते इटली यांच्यातील लढतीने बाद फेरीस सुरुवात झाली. स्पर्धेच्या या टप्प्यात प्रमुख खेळाडूंकडून लौकिकास साजेसा गोल धडाका अपेक्षित आहे. ख्रिस्तियानो रोनाल्डो, किलियन एम्बाप्पे, हॅरी केन यांच्याकडून बहारदार खेळाची प्रतीक्षा आहे. रोनाल्डो युरो करंडकाच्या इतिहासात विक्रमी सहावी स्पर्धा खेळत आहे, पण साखळी फेरीतील तिन्ही लढतीत त्याला गोल नोंदविता आलेला नाही.

## कॅटलबरोला मोठी जबाबदारी

**नवी दिल्ली :** आयसीसीने भारत-दक्षिण आफ्रिका यांच्यातील विश्वचषकातील अंतिम सामन्यासाठी पंचांची नावे जाहीर केली होती. अंतिम सामन्यातील मैदानी पंचाची जबाबदारी ख्रिस गॅफनी (न्यूझीलंड) आणि रिचर्ड इलिंगवर्थ (इंग्लंड) यांच्या खांद्यावर असेल, तर टीव्ही पंच रिचर्ड कॅटलबरो (इंग्लंड) असतील. आता या तिन्ही पंचांची नियुक्ती करण्याचे कारण म्हणजे यापैकी कोणीही भारत किंवा दक्षिण आफ्रिकेशी संबंधित नाही. रिचर्ड केटलबरो टी-२० विश्वचषकात मैदानावरील पंच असणार नाही.

## भारताचे आगाऊ अभिनंदन

**नवी दिल्ली :** टी-२० विश्वचषकाच्या अंतिम सामन्यापूर्वी भारतीय संघाला बॉलीवूडमधून विजयाबद्दल आगाऊ अभिनंदन करण्यात आले आहे. अभिनेता सोनू सूदने भारतीय संघाला आगाऊ शुभेच्छा दिल्या आहेत. भारतीय संघ जेव्हाही कोणत्याही स्पर्धेचा अंतिम सामना खेळते तेव्हा बॉलिवूडमधून अनेक प्रतिक्रिया पाहायला मिळतात. सोनू सूदने तर अनेकदा भारतीय क्रिकेट संघाबद्दल काही ना काही बोलतांना दिसतो. आता दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या अंतिम सामन्यापूर्वी भारतीय संघाचे आगाऊ अभिनंदन कले आहे.

## टीम ऑफ द टूर्नामेंट

**नवी दिल्ली :** ऑस्ट्रेलियाने यंदाच्या टी-२० विश्वचषकाची 'टीम ऑफ द टूर्नामेंट' संघाची घोषणा केली असून कर्णधार म्हणून राशिद खान, सलामीवीर म्हणून रोहित शर्मा आणि ट्रॅव्हिस हेडला निवडले आहे. मधल्या फळीत निकोलस पूरन, ॲरोन जोन्स, मार्कस स्टॉयनिसला निवडले आहे. अष्टपैलू खेळाडू हार्दिक पांड्याला सुध्दा स्थान मिळाले असून रिशाद हुसेन तसेच एनरिक नॉर्टजे, जसप्रीत बुमराह आणि फजलहक फारुकीला वेगवान गोलंदाज म्हणून निवडले आहे.

# भारतीय महिलांकडून आफ्रिकेची धुलाई

## नोंदवला आणखी एक विश्वविक्रम





**। चेन्नई । वृत्तसंस्था ।**
**भारत आणि दक्षिण आफ्रिका यांच्यातील टी-२० विश्वचषकातील अंतिम सामन्यादरम्यान उभय देशांचे महिला संघ चेन्नईत कसोटी क्रिकेट खेळत आहेत. भारतीय महिला संघाने या कसोटीत आफ्रिकेच्या गोलंदाजांची बेक्कार धुलाई करून विश्वविक्रम नोंदवला आहे. शफाली वर्माचे द्विशतक अन् स्मृती मानधनाच्या शतकी खेळीच्या जोरावर पहिल्या दिवशी भारताने ५२५ धावा कुटल्या होत्या आणि या कोणत्याही संघाकडून एकाच दिवशी झालेल्या सर्वाधिक धावा होत्या. त्यात दुसऱ्या दिवशी भारताने ६ बाद ६०३ धावांवर डाव घोषित केला आणि आणखी एक विश्वविक्रम नावावर नोंदवला गेला.**

या सामन्यात शफाली वर्माने १९७ चेंडूंत २३ चौकार व ८ षटकारांच्या मदतीने २०५ धावा केल्या, तर स्मृतीने १६१ चेंडूंत २७ चौकार व १ षटकाराच्या मदतीने १४९ धावा केल्या. या दोघींनी पहिल्या विकेटसाठी विक्रमी २९२ धावांची भागीदारी केली. त्यानंतर जेमिमा रॉड्रिग्ज (५५), कर्णधार हरमनप्रीत कौर (६९) आणि रिचा घोष (८६) यांनी अर्धशतक झळकावताना भारताला ६ बाद ६०३ धावांपर्यंत पोहोचवले. महिला क्रिकेटमध्ये प्रथमच एखाद्या संघाने ६०० हून अधिक धावा करण्याचा पराक्रम केला आहे. याचवर्षी ऑस्ट्रेलियाने दक्षिण आफ्रिकेविरुद्ध ९ बाद ५७५ धावा करून १९९८ सालचा स्वतःचाच (६ बाज ५६९ वि. इंग्लंड) विक्रम मोडला होता. शनिवारी भारतीय महिला संघाने यात बाजी मारली. महिलांच्या प्रथम श्रेणी क्रिकेटमधील ही सर्वोत्तम धावसंख्या ठरली. १९९८ मध्ये ऑस्ट्रेलियाने इंग्लंड 'अ' संघाविरुद्ध ५९६ धावा केल्या होत्या.

दक्षिण आफ्रिकेने ७२ षटकांत ४ बाद २३६ धावा केल्या आहेत. यात लॉरा वोल्वार्ड (२०), अनेके बॉश (३९), डेल्मी टकर (०) सुन ल्यूस (६५) तसेच, मारिझापे कॅप (६७) आणि नादिन डी क्लर्क (२७) यांची दुसऱ्या दिवसाअखेर नाबाद खेळी सुरू होती. यावेळी भारताच्या स्नेह राणाने ३ बळी तर दिप्ती शर्माने एक बळी घेतला.

## इंझमामची सारवासारव

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**
रोहित शर्मा आणि इंझमाम-उल-हक यांच्यातील शीतयुद्धात आणखी एक अध्याय जोडला गेला आहे. पाकिस्तानच्या माजी कर्णधाराने ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या टी-२० विश्वचषक स्पर्धेतील सामन्यात भारतीय गोलंदाजांवर अप्रत्यक्षपणे बॉल टॅम्परिंगचा आरोप केला होता. इंझमामने भारताचा डावखुरा वेगवान गोलंदाज अर्शदीप सिंगवर टीका केली होती. ज्याने १६व्या षटकात चेंडू रिव्हर्स स्वींग केला आणि त्यावरून इंझमामने आरोप केला होता. त्यावर जेव्हा भारतीय कर्णधार रोहित शर्माला विचारले असता त्याने दिमाग खोलो जरा, असा सल्ला दिला. त्यावर आता इंझमामने प्रत्युत्तर दिले, परंतु यावेळी त्याने बॉल टॅम्परिंगचा आरोप करायचा नव्हता अशी सारवासारव केली. इंझमामने स्पष्ट केले की, मी कधीही भारतावर बॉल टॅम्परिंगचा आरोप केला नाही. रिव्हर्स स्विंगच्या असामान्य वेळेमुळे चेंडूवर बारीक नजर ठेवण्यासाठी अंपायर्सना सावध करणे हाच माझा हेतू होता.

## सौरव गांगुलीचा मोठा खुलासा

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**
यंदाच्या आयसीसी टी-२० विश्वचषकात रोहित शर्माच्या नेतृत्वाखाली भारतीय संघाने चमकदार कातगिरी केली आहे. भारताने ८ पैकी ७ सामन्यांमध्ये विजय मिळवला आहे. उपांत्य फेरीत भारताने इंग्लंडला ६८ धावांनी धूळ चारुन अंतिम सामन्यात धडक मारली. भारत अंतिम सामन्यात पौहचण्यामागे रोहित शर्माचे मोलाचे योगदान राहिले आहे. तत्पूर्वी माजी खेळाडू सौरव गांगुलीने एक मोठा खुलासा केला आहे.

सौरव गांगुली म्हणाला की, रोहितने दोन विश्वचषकातील अंतिम फेरी खेळली आहे. यावरुन त्याचे नेतृत्वगुण दिसून येतात. त्याच्या



यशाबद्दल मला आश्चर्य वाटत नाही. कारण मी बीसीसीआय अध्यक्ष असताना तो कर्णधार झाला होता. त्यावेळी विराट कोहली कर्णधारपद सांभाळू इच्छित नव्हता. परंतु, रोहित कर्णधार होण्यासाठी तयार नव्हता. त्याला कर्णधार बनवण्यासाठी आम्हा सर्वांना खूप मेहनत घ्यावी लागली आणि त्याच्या नेतृत्वाखाली भारतीय संघाची प्रगती पाहून मला खूप आनंद झाला.

पुढे बोलताना गांगुली म्हणाला, रोहितच्या नावावर ५ आयपीएल चषक जिंकण्याचा विक्रम आहे. ही त्याच्यासाठी मोठी उपलब्धी आहे. आयपीएल चषक जिंकणे कधी कधी अवघड असते. मला चुकीचे समजू नका, मी असे म्हणत नाही की आयपीएल आंतरराष्ट्रीय क्रिकेटपेक्षा चांगले आहे. परंतु, आयपीएल चषक जिंकण्यासाठी तुम्हाला १६-१७ सामने जिंकावे लागतात.

## भारत विश्वचषकाचा दावेदार

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**
टी-२० विश्वचषकातील भारत विरुद्ध दक्षिण आफ्रिका यांच्यातील अंतिम सामन्या अगोदर पाकिस्तानचा माजी वेगवान गोलंदाज शोएब अख्तरले मोठे वक्तव्य केले आहे. यावेळी शोएब अख्तर त्याच्या अधिकृत यूट्युब चॅनेलवर म्हणाला की, मी नेहमीच भारताने स्पर्धा जिंकण्याच्या बाजूने होतो. गेल्या वर्षी जेव्हा भारत विश्वचषक जिंकू शकला



नाही तेव्हा मला खुप वाईट वाटले होते, कारण भारत हारण्यासाठी नाही तर जिंकण्यासाठी पात्र होते. भारताचा कर्णधार रोहित शर्माने वारंवार सांगितले आहे की, त्याला चषक जिंकायचे आहे आणि म्हणूनच तो विश्चचषक जिंकण्यास खऱ्याअर्थाने पात्र आहे. तो एक मोठा खेळाडू आहे आणि त्याचा शेवट मोठ्या स्तरावर व्हायला हवा. तो निस्वार्थी कर्णधार असून फक्त संघासाठी खेळत असतो.

## काकूंचा सुपला शॉट

**। मुंबई । प्रतिनिधी ।**
क्रिकेट जगतात प्रत्येक क्रिकेटरलला त्याच्या खेळाच्या शैलीनुसार ओळखले जाते. इतर खेळाडूंप्रमाणेळ भारताचा स्टार फलंदाज सूर्यकुमार यादवदेखील त्याच्या सुपला शॉटमुळे ओळखला जातो. सध्या सोशल मीडियावर एक व्हिडओ तुफान व्हायरल होताना दिसत आहे. मिळालेल्या माहितीनुसार, कान्हेवाडी बुद्रुक राजगुरूनगर येथील हा व्हिडीयो असून एक महिला साडीमध्ये क्रिकेट खेळताना दिसत आहे. कदाचित हा व्हिडीओ क्रिकेट स्पर्धेतील असल्याचे समजत आहे. कारण, या व्हिडीओमध्ये कॉमेंट्री ऐकायला मिळत आहे. या दरम्यान सुपला शॉट असे वाक्य या व्हिडीओवर लिहण्यात आले आहे. या व्हिडीओमध्ये महिला चेंडू येताच बॅट खाली टेकवत शानदार चौकार मारते. या महिलेचा व्हिडीओ सोशल मीडियावर चांगलाच चर्चेचा विषय बनला आहे. महिलेची स्टाईल पाहून सर्वांना सूर्यकुमार यादवच्या सुपला शॉटची आठवण झाली.

## माजी कर्णधाराकडून रोहितचे कौतुक

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**
रोहित शर्माच्या नेतृत्वाखाली भारतीय संघ आयसीसी स्पर्धा जिंकेल असा सर्वांना विश्वास आहे. मागच्या वर्षी घरच्या मैदानावर झालेल्या एकदिवसीय विश्वचषकात भारतीय संघ जेतेपदाच्या अगदी नजीक पोहोचला होता. परंतु, अहमदाबादच्या नरेंद्र मोदी स्टेडियमवर झालेल्या अंतिम सामन्यात त्यांना ऑस्ट्रेलियाकडून पराभव पत्करावा लागला. पण, अवघ्या ७ महिन्यांत भारतीय संघाने भरारी घेऊन आणखी एक विश्वचषकातील अंतिम फेरी गाठली



आहे. दरम्यान, भारताचा माजी कर्णधार सौरव गांगुली भारतीय संघाच्या स्पर्धेतील वर्चस्वावर आनंद व्यक्त केला आणि यावेळी भारतीय संघ जेतेपद जिंकेल, असा विश्वास व्यक्त केला. मला वाटत नाही की तो सात महिन्यांत दोन विश्वचषकातील अंतिम सामने गमावेल. सात महिन्यांत त्याच्या नेतृत्वाखाली दोन अंतिम फेरी हरल्यास तो कदाचित बार्बाडोस महासागरात उडी घेईल, अशी गांगुलीने गंमत केली. सुपर-८ आणि उपांत्य फेरीत अनुक्रमे ऑस्ट्रेलिया आणि इंग्लंडविरुद्ध सलग सामने जिंकून आघाडीवर राहिल्याबद्दल गांगुलीने रोहितचे कौतुक केले. त्याने फ्रंटला राहून नेतृत्व केले आणि शानदार फलंदाजी केली. मला आशा आहे की ते अंतिम फेरीतही दमदार खेळी करतील. आशा आहे की भारताला अपेक्षित निकाल मिळेल आणि त्यांनी मनमोकळेपणाने खेळावे, असा सल्ला गांगुलीने दिले.

## चाहत्यांचे देव पाण्यात

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**
यंदाच्या टी-२० विश्वचषकातील भारत आणि दक्षिण आफ्रिका यांच्यातील अंतिम सामन्या आधी भारताने विश्वचषक जिंकण्यासाठी भारतीय संघाचे चाहते पुजा हवन करत आहेत.

उपांत्य फेरीत भारतीय संघाने इंग्लंड संघाला धूळ चारत अंतिम सामन्यात प्रवेश मिळवला. तर, दुसरीकडे दक्षिण आफ्रिकाने अफगाणिस्तानला मात देऊन अंतिम सामन्याचे तिकिट पक्के केल होते. भारताने अंतिम सामना जिंकावा यासाठी भारतीय चाहते प्रार्थना करत होते. तसेच, विविध शहरांमध्ये पूजा आणि होम हवन करत होते. उत्तर प्रदेशातील कानपूरमधून समोर आलेल्या व्हिडिओमध्ये भारतीय क्रिकेटपटूंच्या फोटोसहं चाहते मंदिरात पूजा करत असल्याचे दिसून आले.याशिवाय, वाराणसीतून समोर आलेल्या व्हिडिओमध्ये चाहते भारतीय संघाच्या विजयासाठी प्रार्थना करताना दिसत होते. भारताच्या विजयासाठी चाहत्यांनी वाराणसीमध्ये हवन केले. यावेळी मंदिरात क्रिकेटच्या बॅट, भारतीय खेळाडूंचे फोटो आणि तिरंगा घेऊन चाहते उपस्थित होते.

## हे पूर्णपणे तत्त्वांच्या विरुद्ध

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**
टी-२० विश्वचषकाच्या अंतिम लढत होताच सध्याचे भारतीय संघाचे प्रशिक्षक राहुल द्रविड यांचा देखील कार्यकाळ संपणार आहे. त्यामुळेच क्रिकेटप्रेमींना कर्णधार रोहित शर्मा आणि विराट कोहलीला टी-२० विश्वचषक ट्रॉफी जिंकताना पाहण्याची इच्छा तर आहेच, पण हे विजेतपद प्रशिक्षक द्रविड यांच्यासाठीही आठवणीतला राहावा. यासाठीच क्रिकेटप्रेमींनी सोशल मीडियावर एक कॅम्पेन्स चालवली आहे. परंतु, राहुल द्रविडने मात्र यावर नाराजी दर्शवली आहे.

भारतीय संघाचे मुख्य प्रशिक्षक राहुल द्रविडचा कार्यकाळ भारतात खेळवल्या गेलेल्या २०२३च्या एकदिवसीय विश्वचषकानंतर वाढवला गेला होता. या टी-२० विश्वचषकानंतर त्यांचा कार्यकाळ संपणार आहे. दरम्यान, द्रविड म्हणाला, हे पूर्णपणे माझ्या तत्त्वांच्या विरुद्ध आहे. एखाद्यासाठी चषक



जिंकण्यासारख्या गोष्टींवर माझा विश्वास नाही. मला आठवते की कोणीतरी सांगितले होते की, तुम्हाला एव्हरेस्ट का चढायचे आहे, असे विचारल्यावर उत्तर मिळाले की, मला एव्हरेस्टवर चढायचे आहे कारण ते तिथे आहे. मग हा विश्वचषक का जिंकायचा, कारण तो घडत आहे. हे कोणा व्यक्तीसाठी जिंकायचे नसते किंवा ते कोणाच्याही फायद्यासाठी मिळवायचे नसते.

द्रविड पुढे म्हणाले, आम्ही येथे ही चषक जिंकण्यासाठी आलो आहोत आणि आम्हाला हा विश्वचषक जिंकायचा आहे, यासाठी चांगले क्रिकेट खेळावे लागेल. हे चषक एका व्यक्तीसाठी जिंकले पाहिजे, मी याच्या विरोधात आहे. मी ज्या प्रकारची व्यक्ती आहे हे पूर्णपणे त्याच्या विरुद्ध आहे आणि सोबतच माझ्या तत्वांविरुद्ध आहे, त्यामुळे मला काय बोलावे ते समजत नाही. मला त्याबद्दल बोलायचेही नाही.

## कुस्ती क्षेत्रात शोककळा

**। सांगली । प्रतिनिधी ।**
कुस्ती क्षेत्राला हादरवणारी एक बातमी समोर आली आहे. सांगलीतील कुस्तीपटू सूरज निकम याने आत्महत्या केली आहे. युवा पैलवान सूरज निकम हा सांगलीतील खानापूर तालुक्यातील नागेवाडी येथील निवासी होता. सूरज निकम याने कुस्ती क्षेत्रात चांगली कामगिरी करुन आपली एक ओळख निर्माण केली होती. सूरज निकम याने अल्पावधीतच कुस्ती क्षेत्रात आपली जागा आणि ओळख निर्माण केली होती.



सूरजने कुमार महाराष्ट्र केसरीची गदा सुद्धा पटकावली होती. मिळालेल्या माहितीनुसार, सूरज निकम याने आपल्या राहत्या घरी गळफास घेत आयुष्याचा शेवट केला. शुक्रवारी संध्याकाळच्या सुमारास त्याने आत्महत्या केली असल्याची माहिती समोर आली आहे.

### अंतिम सामन्याबाबत दिग्गजांना विश्वास

## विराट कोहलीची कामगीरी चमकदार होईल

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**
टी-२० विश्वचषकात भारतीय संघाचा दिग्गज खेळाडू विराट कोहलीने निराशाजनक कामगिरी केली आहे. परंतु, भारतीय संघाच्या दिग्गजांनी मोठे वक्तव्य केले आहे. त्यांच्या मते विराट कोहली अंतिम सामन्यात नक्कीच चमकदार कामगिरी करेल.

यावेळी भारताचा माजी खेळाडू मोहम्मद कैफने सोशल मीडियावर एक व्हिडिओ शेअर केला आहे. त्यामध्ये त्याने म्हटले आहे की, विराट कोहलीने हे लक्षात ठेवायला हवे की २०११चा एकदिवसीय विश्वचषक महेंद्रसिंग धोनीसाठी ही फारसा चांगला गेला नाही. परंतू, त्याने अंतिम सामन्यात फॉर्म मिळवला. कोहली इतका चांगला खेळाडू आहे की त्याने स्लोगिंग करू नये. तो चेंडू त्याच्या क्षमतेनुसार खेळू शकतो आणि तो कोणत्याही गोलंदाजीवर वर्चस्व गाजवू शकतो.

तसेच, उपांत्य फेरीत भारतीय संघाचा विजयी झाल्यावर बोलताना स्वतः कर्णधार रोहित शर्माने, विराट कोहली हा मोठा खेळाडू आहे, त्याच्याकडे १५ वर्षांचा अनुभव आहे. तो कदाचित अंतिम सामन्यात कमाल करू शकतो, असे म्हटले होते. विराट कोहलीचे चाहते कदाचित या गोष्टीला पूर्ण समर्थन दर्शवतील की, कोहलीने संपूर्ण कारकिर्दीत अधिक दबाव असणाऱ्या सामन्यांमध्येच उत्तम कामगिरी केली आहे.

भारतीय संघाचा मुख्य प्रशिक्षक राहुल द्रविडने सुद्धा विराट कोहलीच्या फॉर्मबाबत महत्त्वाकांक्षी शक्यता वर्तवली आहे. द्रविड म्हणाला की, जोखीम जास्त असणारा खेळ हा कधी कधी आपल्यावरच उलटू शकतो. विराटच्या बाबत हे अनेकदा होते. भारत विरुद्ध इंग्लंड सामन्यातही त्याने एका षटकारासह सुरुवात चांगली केली होती. पण, तेव्हा चेंडू जास्तच वळला. काहीही असले तरी मला त्याचा खेळाकडे पाहण्याचा दृष्टिकोन आवडतो, त्याचा हेतू चांगला असतो. संघासाठी एखादी व्यक्ती जोखीम उचलू पाहतेय यामुळे इतरांसमोर चांगलं उदाहरण सेट होतं. पुढे मस्करीत द्रविड असेही म्हणाला की, मला आता नजर लावायची नाही. पण मला वाटते आगामी सामन्यांमध्ये त्याची वचनबद्धता आणि मुळात खेळण्याचा अंदाज काही मोठे बदल घडवू शकतो. आणि कोहली त्यासाठी नक्कीच पात्र आहे.



## 'अजित आगरकरचे मोठे योगदान'

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**
भारतीय संघ गेल्या १३ महिन्यांमध्ये तिसऱ्यांदा आयसीसी स्पर्धेचा अंतिम सामना खेळण्यासाठी मैदानात उतरला आहे. दरम्यान, भारताने यंद्याच्या टी -२० विश्वचषकात आत्तापर्यंत पूर्णपणे वर्चस्व ठेवल्याचे दिसत आहे. भारताने खेळलेले सर्व ७ सामने जिंकले आहेत. भारताला आत्तापर्यंत जे यश मिळाले आहे, त्याचे महत्त्वाचे कारण संघात दिसणारा समतोलपणा. भारतीय संघासाठी समतोलच सर्वात मोठी ताकद ठरत आहे. या समतोलपणामुळेत भारतीय संघ कठीण परिस्थितीत अडकल्यानंतरही सहज बाहेर पडली आहे. यामागे



कोणाचे मोठे योगदान असेल, तर ते अजित आगरकरच्या अध्यक्षतेखालील निवड समितीचे. एका मोठ्या स्पर्धेसाठी योग्य संघनिवडही महत्त्वाची असते, हे यंदाच्या टी-२० विश्वचषकात दिसून आले आहे. एप्रिल महिन्याच्या अखेरीस अजित आगरकरने टी-२० विश्वचषकासाठी संघ घोषित केला होता. हा संघ निवडल्यानंतर अनेक प्रश्न उपस्थितही करण्यात आले, पण त्यांची उत्तरंही आगरकरने संघ घोषणेच्या पत्रकार परिषदेत ठामपणे दिली होती.

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ. चित्रलेखा पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ I MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
**■ संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील ■ सल्लागार संचालक : सौ. सुप्रिया पाटील ■ व्यवस्थापकीय संचालक : सौ. चित्रलेखा पाटील ■ कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत* ■ सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर**
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)